सोलापूर तरुण भारत
आसमंत




# युरोप, युक्रेन आणि अमेरिकेच्या संघर्षात भारताला संधी

**अमेरिकेच्या व्हाईट हाऊसमध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युक्रेनचे अध्यक्ष व्होल्दोमीर झेलेन्स्की यांच्यावर केलेली आगपाखड, त्यानंतर झेलेन्स्कींमागे ठामपणे उभा दिसलेला युरोप आणि युरोपीय महासंघाच्या २२ देशांच्या आयुक्तांचा संपन्न झालेला भारत दौरा, अशा गेल्या काही दिवसांतील ठळक आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बदलत्या भूराजकीय समीकरणांचा कानोसा घेणारा हा लेख...**

लक्ष्यवेध
अनय जोगळेकर

अमेरिकेने युक्रेनला दिली जाणारी लष्करी मदत थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी युक्रेनचे अध्यक्ष व्होल्दोमीर झेलेन्स्की डोनाल्ड ट्रम्प यांच्या निमंत्रणावरून त्यांना भेटायला व्हाईट हाऊसमध्ये आले होते. यानिमित्ताने युक्रेन आणि अमेरिकेमध्ये युक्रेनची खनिजसंपत्ती बाहेर काढून तिच्या वाटणीबाबतच्या कराराचाही समावेश होता. डोनाल्ड ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांचा उल्लेख 'हुकुमशहा' असा केल्यानंतर फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी एकापाठोपाठ एक अमेरिकेला भेट दिली. त्यांच्या आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या बैठकीनंतर ट्रम्प यांचा युक्रेनबाबत सूर निवळला होता. त्यामुळे झेलेन्स्की यांच्या अमेरिका दौऱ्यानंतर अमेरिका आणि युक्रेनमधील ताणलेले संबंध पूर्वपदावर येतील, असा अंदाज होता. प्रत्यक्षात मात्र ट्रम्प आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी झेलेन्स्की यांचा माध्यमांसमोर पाणउतारा करण्याची योजना बनवली होती. त्यासाठी अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. वान्स यांना या बैठकीसाठी पाचारण करण्यात आले होते. युक्रेन युद्धामध्ये शांतता कराराला विरोध करून एका प्रकारे झेलेन्स्की जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे ढकलत आहेत, असे सांगून त्यांना अपमानित केल्यास त्याद्वारे रशिया आणि युरोपला योग्य तो संदेश मिळाला असता. या बैठकीच्या सुरुवातीलाच डोनाल्ड ट्रम्प यांनी, तसेच एका पत्रकाराने झेलेन्स्की यांच्या लष्करी गणवेशामध्ये बैठकीला येण्याची खिल्ली उडवली. पण, झेलेन्स्की यांनीही या शाब्दिक अपमानाला जशास तसे उत्तर दिले.

चर्चेमध्ये ते जे. डी. वान्स यांच्याशी युक्रेनला सुरक्षेच्या हमीच्या मुद्द्यावर हुज्जत घालू लागले, तेव्हा अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प स्वतःला थांबवू शकले नाहीत. त्यांच्यात आणि झेलेन्स्की यांच्यामध्ये उडालेली शाब्दिक चकमक सगळ्या जगाने थेट पाहिली. वान्स यांनी झेलेन्स्कींवर तुम्ही अमेरिकेने केलेल्या मदतीबद्दल कृतज्ञ नसल्याचा



गंभीर आरोप केला. ट्रम्प यांची अपेक्षा होती की, झेलेन्स्की अपमान सहन करतील आणि अमेरिकेसोबत खनिजसंपत्तीबाबत करार करतील. पण, झेलेन्स्की यांनी आपला मुद्दा न सोडल्याने त्यांना ही बैठक सोडून जायला सांगण्यात आले. या बैठकीच्या थेट प्रसारणाने युरोप हादरला. झेलेन्स्की यांनी वॉशिंग्टनहून थेट लंडनला प्रयाण केले. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी त्यांना भेटीचे निमंत्रण दिले होते. लंडनच्या लोकांनी झेलेन्स्की यांचे रस्त्यात स्वागत केले. स्टार्मर यांनी दि. २ मार्च रोजी युरोपीय देशांच्या नेत्यांची बैठक बोलावली होती. या बैठकीमध्ये युरोपीय देशांची एक आघाडी उघडण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. ही आघाडी अमेरिकेसोबत बोलणी करून युक्रेनमध्ये युरोपीय देशांचे सैन्य तैनात करण्याचा विचार करेल, असे सांगण्यात येत आहे. दुसरीकडे अमेरिकेने संयुक्त राष्ट्र तसेच 'नाटो'मधून माघार घ्यावी, असे वक्तव्य एलॉन मस्क यांनी केले आहे. लवकरच डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेच्या काँग्रेसला संबोधित करणार असून, त्यात मोठ्या घोषणा केल्या जाण्याची शक्यता आहे.

झेलेन्स्कींना दिलेल्या वागणुकीमुळे उडालेला धुरळा अजून खाली बसायला तयार नाही. या प्रसंगामुळे युरोपीय नेत्यांची झोप उडाली आहे. त्यांचा समज होता की, अमेरिकेशी कितीही मतभेद झाले, तरी समान सांस्कृतिक धाग्यामुळे, तसेच 'लोकशाही' आणि 'कायद्याचे राज्य' यांसारख्या संकल्पनांवरील विश्वासामुळे अमेरिका आपल्याला कधीही अंतर देणार नाही. डोनाल्ड ट्रम्प यांनी पहिल्याच महिन्यात दाखवून दिले की, त्यांच्यासाठी अमेरिकेच्या हितसंबंधांपलीकडे दुसरे-तिसरे काहीही नाही. या हितसंबंधांसाठी पुतीनशी मैत्री करायला किंवा युक्रेनला वाऱ्यावर सोडायला, त्यांची कोणतीही हरकत नाही.

'नाटो'ची स्थापना झाली, तेव्हा जगावर शीतयुद्धाची छाया होती. आज अमेरिका रशियाला सगळ्यात मोठा धोका म्हणून बघत नाही. आज सोव्हिएत रशियाची जागा चीनने घेतली आहे. सोव्हिएत रशिया राजकीय आणि लष्करीदृष्ट्या बलाढ्य असला, तरी आर्थिकदृष्ट्या कायमच कमकुवत होता. चीनचे तसे नाही. चीन लष्करी आणि आर्थिक महासत्ता असून, त्या जोरावर आफ्रिका आणि आशियातील विकसनशील देशांवरील आपला प्रभाव सातत्याने वाढवत आहे. युरोपसाठी चीन हा मोठा धोका नसल्यामुळे ते रशियाचा बागुलबुवा उभा करून अमेरिकेला रशियाविरुद्ध गुंतवून ठेवत आहेत. अमेरिकेला हे परवडण्यासारखे नाही. चीनला रोखण्यासाठी अमेरिकेला आपली सगळी शक्ती पणाला लावावी लागणार आहे. त्यासाठी दुसर्या महायुद्धानंतर सोव्हिएत रशियाला केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आलेली जागतिक व्यवस्था मोडावी लागली, तरी अमेरिकेची त्याला तयारी आहे. यापूर्वीही बराक ओबामा आणि जो बायडन यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या काळात रशियाने युक्रेनचा लचका तोडल्यानंतर (पान ४ वर)

**दक्षिण आशियातील देशांवर आपली हुकूमत असावी, हे चीनचे मनसुबे लपून राहिलेले नाहीत. मात्र, दक्षिण आशियातील अनेक देश चीनच्या विस्तारवादी महत्त्वाकांक्षेने त्रस्त आहेत. अशावेळी या देशांना दक्षिण चिनी समुद्रात, चीनच्या अरे ला कारे करण्यासाठी भारताच्या 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्राची गरज भासत आहे. याच माध्यमातून भारताने देखील चीनला शह दिला आहे.**




# भारताचे 'ब्रह्मास्त्र'

वेधक
पार्थ कपोले

भारताने २०२३ साली झालेल्या 'जी२०' शिखर परिषदेमध्ये, 'ग्लोबल साऊथ'चे नेतृत्व करण्याची घोषणा केली. केवळ घोषणा करून नव्हे, तर 'ग्लोबल साऊथ'सोबत सर्व प्रकारचे सहकार्य करण्यासही भारताने प्रारंभ केला आहे. 'ग्लोबल साऊथ'साठी सुद्धा ही घडामोड अत्यंत महत्त्वाची ठरत असून, या भागात आपले वर्चस्वाचे फास आवळण्यास सज्ज असलेल्या चीनलाही यामुळे, त्यांच्या धोरणामध्ये बदल करण्यास भाग पडणार आहे. भारताने या भागात, प्रामुख्याने आपल्या ब्रह्मोस या क्षेपणास्त्राद्वारे चीनला शह देण्याची तयारी केली आहे.

'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र प्रणाली, भारतात तयार केलेले अत्यंत यशस्वी शस्त्र म्हणून उदयाला येत आहे. त्यांना जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी आहे आणि भारत त्यांची निर्यातही करत आहे. 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र भारत आणि रशिया यांच्यातील संयुक्त उपक्रम म्हणून, विकसित करण्यात आले आहे. 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र, रशियाच्या 'पी-८०० ओनिक्स' क्षेपणास्त्र प्रणालीवर आधारित आहे. मात्र, त्या रशियन क्षेपणास्त्राच्या तुलनेत, 'ब्रह्मोस'च्या क्षमतेत लक्षणीय सुधारणा झाली आहे. यात काही नवीन फीचर्सही जोडण्यात आले आहेत. हे मध्यम पल्ल्याचे, रॅम्जेटवर चालणारे सुपरसॉनिक क्षेपणास्त्र आहे. 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्राची रचना जमीन, समुद्र आणि आकाशातून प्रक्षेपित करण्यासाठी करण्यात आली आहे. 'ब्रह्मोस'चा वेग २.८ मॅक असून, त्याची रेंज ८०० किमी आहे. मात्र, क्षेपणास्त्र तंत्रज्ञान नियंत्रण व्यवस्थेच्या निर्बंधांमुळे, निर्यात केलेल्या 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्रांची व्याप्ती २९० किमीपर्यंत मर्यादित करण्यात आली आहे. २००७ सालापासून, या क्षेपणास्त्राच्या अनेक प्रकारांचा भारतीय लष्कराच्या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्रबोवो सुबियांतो हे २०२५ साली भारताच्या प्रजासत्ताक दिन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे होते. 'ब्रह्मोस' सुपरसॉनिक क्षेपणास्त्र प्रणालीच्या करारावर महत्त्वाची चर्चा करणे, हा देखील सुबियांतो यांच्या भारत दौऱ्याचा एक महत्त्वाचा उद्देश होता. फिलीपिन्स आणि व्हिएतनामनंतर हे क्षेपणास्त्र खरेदी करणारा, इंडोनेशिया हा आग्नेय आशियातील तिसरा देश आहे. या देशांना विशेषतः 'ब्रह्मोस'च्या जमीन आणि जहाज आधारित, एन्टी-शिप व्हेरियन्टमध्ये रस आहे. या देशांना वाटते की, दक्षिण चीन समुद्रात त्यांच्या नौदल मोहिमांमध्ये चीनच्या हस्तक्षेपाचा प्रतिकार करण्यासाठी, हे क्षेपणास्त्र खूप उपयुक्त ठरू शकते. या क्षेपणास्त्राने अनेकदा आपली क्षमता सिद्ध केल्यामुळे, फिलीपिन्सने भारताकडून हे क्षेपणास्त्र घेतले आहे. 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्राच्या संभाव्य करारावर, व्हिएतनाम आणि इंडोनेशियाबरोबर चर्चा सुरू आहे. तथापि, चीनच्या परिसरात विशेषतः त्याच्या वादग्रस्त सागरी प्रदेशात, 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्राच्या समावेशामुळे चीनची चिंता वाढली आहे.

चीनसाठी त्याच्या शेजारी आणि विशेषतः वादग्रस्त सागरी क्षेत्रांमध्ये 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र तैनात होणे, हे एक मोठे आव्हान असणार आहे. 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्राच्या प्रगत वैशिष्ट्यांची, चीनला पूर्ण माहिती आहे. 'ब्रह्मोस'मध्ये रडारला चकवा देण्याची क्षमतादेखील आहे. मार्गदर्शन प्रणालीदेखील हे क्षेपणास्त्र अतिशय अचूक आहे. हे क्षेपणास्त्र 'इनर्शल नेव्हिगेशन सिस्टम' (आयएनएस) आणि 'सेन्सर नेटवर्क सिम्युलेटर' (पान ४ वर)

# 'बोफोर्स'च्या तोफेला पुन्हा बत्ती!

**मोदी सरकारने काँग्रेसला पुन्हा एकदा तोफेच्या तोंडी देण्याचा निर्णय घेतला आहे. 'बोफोर्स' तोफांच्या खरेदीतील दलालीचे हे प्रकरण इतक्या वर्षांनंतर पुनरुज्जीवित करण्यामागे मोदी सरकारचा दीर्घकालीन डावपेच असू शकतो. या प्रकरणातील दलाली कोणाला आणि कशी देण्यात आली, याची नवी माहिती बाहेर आल्यास ती गांधी परिवारासाठी अडचणीची ठरू शकते, हे खरे!**


सत्ताकारण
राहुल बोरगांवकर

प्रदीर्घ काळानंतर 'बोफोर्स' तोफा खरेदीतील दलालीसंदर्भात महत्त्वाची माहिती मिळविण्यासाठी केंद्र सरकारने अमेरिकेला विनंती केली आहे. इतक्या वर्षांनंतर केंद्र सरकारला या प्रकरणी अचानक जाग आल्याचे पाहून काहीजणांच्या भुवया उंचावल्या असतील. या दलालीचे प्रकरण तसे संपुष्टात आल्यात जमा आहे.तरीही आता डोनाल्ड ट्रम्प अध्यक्षपदी निवडून आल्यानंतर मोदी सरकारने केलेली ही नवी राजकीय खेळी गांधी परिवाराला अस्वस्थ करून सोडेल, यात शंका नाही. स्वीडनच्या 'बोफोर्स' कंपनीच्या १५५ मिमी तोफांच्या खरेदी प्रकरणाने १९८७ साली तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या सरकारवर प्रचंड मोठा आघात केला होता, तोपर्यंत



राजीव गांधी यांना 'मिस्टर क्लीन' म्हणून संबोधले जात होते. कारण, राजकारणात तुलनेने नवखे असलेल्या राजीव गांधी यांच्यावर भ्रष्टाचाराचे कोणतेही आरोप तोपर्यंत नव्हते. एकतर राजबिंड्या रूपाचे राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. त्यांनी सत्तेवर येताच आसाम आणि पंजाबमधील आंदोलनकर्त्यांशी करार करून त्या राज्यांतील अशांतता संपुष्टात आणली होती. ते नेहमी २१व्या शतकाच्या गोष्टी करीत. त्यांच्या पक्षाला भारताच्या इतिहासातील 'न भूतो न भविष्यती' असे बहुमत मिळाले होते. ५४५ जागांच्या लोकसभेत काँग्रेस पक्षाचे तब्बल ४१३ खासदार निवडून आले होते. १९८४ सालच्या लोकसभा निवडणुकीत अटलबिहारी वाजपेयी यांच्यासारख्यांनाही पराभव पत्करावा लागला होता आणि भाजपला केवळ दोन जागी विजय मिळाला होता. राजीव गांधी हे तेव्हा भारताचे अनभिषिक्त राजेच होते. त्यांच्या या प्रतिमेला 'बोफोर्स' तोफा खरेदी कराराने मोठे भगदाड पाडले.

या तोफांच्या खरेदीत फार मोठा भ्रष्टाचार झाला असून, त्यासाठी सरकारमधील उच्चपदस्थांना कोट्यवधी रुपयांची दलाली देण्यात आल्याचा आरोप स्वीडनमधील रेडिओने केला होता. रेडिओवरील या बातमीने स्वीडनमधील सरकारही अडचणीत आले होते. या दलालीचा थेट संबंध राजीव गांधी आणि त्यांच्या परिवाराशी जोडला जात होता. त्यामुळे राजीव गांधी यांच्या प्रतिमेला तडा तर गेलाच, पण काँग्रेसमध्येही अंतर्गत फूट पडली. त्या सरकारमधील संरक्षणमंत्री व्ही. पी. सिंह यांना पंतप्रधानपदाची महत्त्वाकांक्षा होती. पण, ती त्यांनी दडवून ठेवली होती. त्यांनीच आतून या दलालीच्या आरोपांना अनुकूल अशी माहिती प्रसार माध्यमांना



पुरविली होती. पुढे त्यांनीच 'एचडीडब्ल्यू' या जर्मन बनावटीच्या पाणबुड्यांच्या खरेदीतही दलाली देण्यात आल्याचा आरोप केला होता. त्याचा राजकीय लाभ सिंह यांना मिळाला आणि पुढे ते औट घटकेसाठी का होईना, देशाचे पंतप्रधान बनले. पण, अशी दलाली दिल्याचे विश्वासार्ह पुरावे दर्शविणारी कागदपत्रे अमेरिकेतील मायकल हर्षमन यांनी प्रसिद्ध केली होती. 'फेअरफॅक्स' नावाच्या एका खासगी गुप्तचर संस्थेचे हर्षमन हे प्रमुख होते. स्विस बँकांतील 'मॉन्ट ब्लॅन्क' नावाच्या एका खात्यात दलालीचे हे पैसे भरल्याची माहिती हर्षमन यांनी उघड केल्यावर राजीव गांधी त्यांच्यावर भडकले होते, असे हर्षमन यांनी अलीकडेच सांगितले. तत्कालीन सरकारने आपल्या अखत्यारीतील सर्व संस्थांच्या मदतीने या प्रकरणाच्या तपासात विघ्न आणल्याचा दावाही त्यांनी केला आहे. असे असूनही आजचे काँग्रेसचे नेते मोदी सरकारवर 'ईडी', 'सीबीआय'चा दुरुपयोग केल्याचा आरोप करतात, हे पाहून आश्चर्य वाटते. असो. खरे तर मोदी सरकारने गतवर्षी ऑक्टोबरमध्येच दिल्लीतील न्यायालयापुढे ही माहिती मिळविण्यासाठी अर्ज केला होता. कारण, हर्षमन यांनी यासंदर्भात त्यांच्याकडे असलेली माहिती व पुरावे सरकारला देण्याचे कबूल केले होते. 'बोफोर्स' प्रकरणी १९९९ आणि २००० या दोन वर्षांमध्ये आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. त्यात सोनिया गांधी यांच्याशी जवळीक असलेल्या ऑक्टोव्हियो क्वात्रोची या दलालासही आरोपी करण्यात आले होते. पण, नंतर हा खटला न्यायालयात पडून राहिला. २००४ साली न्यायालयाने त्यातून राजीव गांधी यांचे नाव बाद केले. पुढे २००५ साली दिल्ली उच्च न्यायालयाने 'सीबीआय'तर्फे दाखल करण्यात आलेला हा खटलाच रद्द केला. २०११ साली तर क्वात्रोचीचे नावही गाळण्यात आले आणि त्याला इंडोनेशियातील खात्यातील त्याचे लक्षावधी डॉलर्स काढण्यासही मुभा देण्यात आली. एकंदरीत 'बोफोर्स' तोफा खरेदीतील लाच प्रकरणावर एक प्रकारे पूर्ण पडदा पाडण्यात आला. असे असताना आता सरकारने या खटल्याला, अंशतः का होईना, पुनरुज्जीवित करण्याचे ठरविले आहे, असे दिसते. यामागे काय कारण असावे, यावर तज्ज्ञांमध्ये आणि राजकीय निरीक्षकांमध्ये चर्चा सुरू आहे. काहींच्या अंदाजानुसार निदान या प्रकरणी लाच दिली गेली होती इतके जरी दिसून आले, तरी त्यामुळे काँग्रेसवरील भाजपचे आरोप काही प्रमाणात तरी सिद्ध होतील, असे भाजपला वाटते. ही लाच नक्की कोणाला देण्यात आली होती, ही गोष्ट आता सिद्ध करणे जवळपास अशक्य आहे. ही लाच कोणाला आणि कशी देण्यात आली, त्याची माहिती हर्षमन यांच्याकडून सरकारला मिळेल, असे (पान ४ वर)

राष्ट्ररक्षा

ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

# मराठी साहित्य आणि भारताची सुरक्षा;

## चिनी हायब्रिड वॉर, ग्रे झोन वॉर, अनरिस्ट्रिक्टेड युद्धावर मराठी साहित्य जरुरी

नवी दिल्ली येथील ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. साहित्य संमेलनाच्या स्मरणिकेकरिता मला 'मराठी साहित्य आणि भारताची सुरक्षा' या विषयावर लेख लिहिण्यात सांगण्यात आला. लेखाचा पहिला भाग खालील प्रमाणे होता.

**सांस्कृतिक संरक्षण आणि संवर्धन**


राष्ट्रनिर्मितीमध्ये साहित्य महत्त्वाची भूमिका बजावते. राष्ट्राची ओळख, संस्कृती आणि एकसंधता विकसित करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण मार्गांनी योगदान देते. साहित्य परंपरा, चालीरीती, लोककथा आणि ऐतिहासिक कथांचे दस्तऐवजीकरण करून देशाच्या सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्यास मदत करते. साहित्य लोकांच्या सामूहिक स्मृती जिवंत ठेवते आणि भविष्यातील पिढ्यांपर्यंत पोहोचवते. मराठी साहित्यामध्ये शरीरात वीरश्री निर्माण करणारी वीरगीते, कविता, पोवाडे यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. अनेक पोवाडे आणि वीर गीते ऐकून मनामध्ये देशभक्तीची भावना निर्माण होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांची अनेक वीरगीते जसे की-'हे अधम रक्त रंजिते। सुजन-पूजिते। श्री स्वतंत्रते... यशोयुतां वंदे... जयस्तुते' आणि अनेक इतरांचे देशभक्ती जागृत करणारे पोवाडे अजूनसुद्धा आपल्याला आठवतात.

**राष्ट्रीय ओळख निर्मिती**

साहित्य हे एक महत्त्वाचे शैक्षणिक साधन आहे जे भाषाकौशल्य, टीकात्मक विचार आणि सृजनशीलता समृद्ध करते. साहित्य राष्ट्राशी संबंधित असणे म्हणजे काय हे परिभाषित करण्यास मदत करते. लेखक अनेकदा राष्ट्रीय अस्मिता, इतिहास आणि मूल्ये या विषयांचा शोध घेतात, ज्याने राष्ट्र निर्मितीमध्ये मदत मिळते, राष्ट्रीय एकात्मता वाढवू शकते.

**सार्वजनिक भावनांना प्रतिबिंबित करणे, आकार देणे**

साहित्य हे राष्ट्राची प्रचलित मनःस्थिती, आशा आणि चिंता प्रतिबिंबित करते. लोक त्यांच्या राष्ट्राचा भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य कसे पाहतात यावर प्रभाव टाकून ते सार्वजनिक भावनांना आकार देऊ शकते. साहित्यिक लिखाण अनेकदा प्रेरणा देतात, लोकांना उत्तेजित करू शकतात, त्यांना चांगल्या भविष्यासाठी प्रयत्न करण्यास आणि राष्ट्रीय विकासासाठी एकत्रितपणे कार्य करण्यास प्रोत्साहित करतात. साहित्य हे देशभर जागतिक स्तरावर राष्ट्राचे प्रतिनिधित्व करते. अनुवादित कृती आणि त्याच्या लेखकांच्या आंतरराष्ट्रीय ओळखीद्वारे एक राष्ट्र आपली संस्कृती, मूल्ये, इतिहास आणि कथा जगासमोर मांडू शकते, आंतरराष्ट्रीय आदर वाढवू शकते. अनेक शूर सेनापती आणि शूर सैनिक यांच्यावर मराठीमध्ये अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. यामध्ये महाराष्ट्रातले १९४७ नंतरचे अनेक शूरवीर आहेत. अनुराधाताई गोरे यांनी सैनिकांच्या शौर्यगाथांवर लिहिलेली अनेक पुस्तके वाचनीय आहेत. साहित्य हे केवळ राष्ट्रीय जीवनाचे प्रतिबिंब नसून ते घडवण्याचे एक शक्तिशाली साधन आहे. सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यात



साहित्याचे योगदान आहे. आपल्या बहुआयामी भूमिकांद्वारे साहित्य राष्ट्रनिर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देते. साहित्य हे वेगवेगळ्या कालखंडातील लोकांच्या जीवनातील अनुभवांची अंतर्दृष्टी प्रदान करते. साहित्य देशाचा जागतिक प्रभाव आणि सॉफ्ट पॉवर वाढविण्यातदेखील भूमिका बजावते. अनेक मराठी लेखकांनी युद्धावरील प्रसिद्ध इंग्रजी पुस्तकांचा मराठीत अनुवाद केला. उदाहरणार्थ, फील्ड मार्शल सॅम माणेकशॉ यांच्यावर इंग्रजी पुस्तकांचा उत्तम अनुवाद भगवान दातार यांनी केला आहे. त्यांचे 'ऑपरेशन ब्लू स्टार'वरसुद्धा उत्तम पुस्तक आहे. ही पुस्तके या विषयाला नक्कीच न्याय देतात.

**राष्ट्रीय सुरक्षेच्या विविध पैलूंबद्दल...**

राष्ट्रीय सुरक्षेच्या विविध पैलूंबद्दल नागरिकांना माहिती आणि शिक्षित करण्यात साहित्य महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. विविध शैली आणि कथनशैलींद्वारे साहित्य जागरूकता वाढवू शकते, समज वाढवू शकते आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्यांवर चर्चा करण्यास प्रोत्साहन देऊ शकते. ऐतिहासिक कादंबऱ्या, भूतकाळातील संघर्ष आणि सुरक्षा आव्हानांना संदर्भ देते. युद्धे, क्रांती आणि राजकीय उलथापालथ यासारख्या घटनांच्या विषयी लिहून, साहित्य वाचकांना सुरक्षा समस्यांचे मूळ समजून घेण्यास मदत करते. देशाला असलेल्या धोक्यांबाबत जागरूकता साहित्य राष्ट्रीय सुरक्षेसाठी विविध धोके, दहशतवाद आणि हेरगिरीपासून सायबर युद्ध आणि पर्यावरणीय आव्हानांपर्यंत प्रकाश टाकू शकते. चरित्रकथा आणि कथनकांद्वारे, साहित्य राष्ट्रीय सुरक्षा निर्णयांशी संबंधित नैतिक आव्हाने शोधून काढते. साहित्यामुळे प्रभावित झालेल्या व्यक्तींचे अनुभव आणि दृष्टिकोन यावर लक्ष केंद्रित करून सुरक्षा समस्यांचे वैयक्तीकरण आणि मानवीकरण करते. कादंबऱ्या आणि लघुकथा संघर्षात अडकलेल्या सैनिक, निर्वासित आणि नागरिकांचे जीवन दर्शवू शकतात. देशाची सुरक्षा हा आता सर्व नागरिकांचा विषय झालेला आहे. यामुळे असे पण वाटते की, 'देशाची सुरक्षा' हा विषय शाळा आणि महाविद्यालयीन स्तरावर सुरू केला जावा.

**राष्ट्रीय सुरक्षा समस्या समजून घेण्यास मदत**

साहित्य धोरणकर्त्यांना आणि जनतेला राष्ट्रीय सुरक्षेच्या विविध पैलूंबद्दल माहिती देऊ शकते. साहित्य हे शैक्षणिक सेटिंग्जमध्ये शैक्षणिक साधन म्हणून काम करते. विद्यार्थ्यांना आणि भविष्यातील नेत्यांना राष्ट्रीय सुरक्षा समस्या समजून घेण्यास मदत करते. आज महाराष्ट्रातील अनेक महाविद्यालयांमध्ये 'डिफेन्स अँड स्टॅटेजिक स्टडीज' हे विषय शिकवले जातात. वेगवेगळ्या विषयांवर लिहिलेले पीएचडीचे शोधनिबंध उपलब्ध आहेत.

**देशभक्ती हायलाईट करणे**

साहित्य शौर्य आणि देशभक्तीच्या कथा कथन करू शकते, नागरिकांना प्रेरणा देऊ शकते. राष्ट्रीय अभिमान आणि एकतेची भावना वाढवू शकते. साहित्य हे राष्ट्राच्या सुरक्षिततेबद्दल चालू असलेल्या संवादामध्ये एक आवश्यक साधन आहे. साहित्य भारताच्या इतिहासाबद्दल आणि त्याच्या विकसित होत असलेल्या राष्ट्रीय सुरक्षेच्या चिंतांसंदर्भात अंतर्दृष्टी प्रदान करू शकते. वेगवेगळ्या कालखंडातील कादंबऱ्या आणि ऐतिहासिक भूतकाळातील घटना, युद्धे आणि संघर्षांवर प्रकाश टाकू शकतात; ज्याने देशाच्या सुरक्षा परिदृश्याला आकार दिला आहे. ऐतिहासिक संदर्भ समजून घेणे वाचकांना भारतासमोरील आव्हाने आणि कालांतराने धडे शिकवू शकतात. प्रत्येक विद्यार्थ्याला दरवर्षी 'देशाची सुरक्षा' या विषयावर प्रकाशित झालेल्या पुस्तकाचे 'बुक रिव्ह्यू' लिहिणे अनिवार्य केले जावे. कारण पुस्तके लिहिणे हा एक भाग आहे, परंतु जास्त महत्त्वाचा भाग आहे की, लिहिलेली पुस्तके वाचणे आणि त्या पुस्तकात जे काही मुद्दे पुढे आले आहेत, त्यांचा भविष्यात देशासमोर असलेल्या आव्हानांचा मुकाबला करताना कसा वापर करता येईल, यावर लक्ष केंद्रित करणे. राष्ट्रीय सुरक्षेसाठी सैनिक, गुप्तचर अधिकारी आणि इतर व्यक्तींनी केलेले बलिदान अधोरेखित करून साहित्य वाचकांमध्ये कर्तव्य आणि जबाबदारीची भावना निर्माण करू शकते. छत्रपती शिवाजी महाराज, पेशव्यांचा इतिहास विषयावर अनेक अभ्यासपूर्ण पुस्तके मराठ्यांचा इतिहास, छत्रपती शिवाजी महाराज, पेशव्यांचा इतिहास या विषयावर अनेक अभ्यासपूर्ण पुस्तके लिहिण्यात आलेली आहे आणि अजूनसुद्धा लिहिली जात आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. मुंजे यासारख्या लेखकांनी दुसऱ्या महायुद्धावर भरपूर लिखाण केलेले आहे.

प्रसिद्ध युद्धतज्ज्ञ आणि इतिहासकार क्लॉजविट्झ यांचे जगप्रसिद्ध पुस्तक 'युद्धावर - कार्ल फॉन क्लॉजविट्झ' या गाजलेल्या ग्रंथाचे चिकित्सक रूपांतर मराठी लेखक दि. वी. गोखले यांनी 'युद्ध मीमांसा' या आपल्या पुस्तकात केले आहे. ज्याला 'युद्धकले'वर अभ्यास करायचा आहे त्यांनी हे पुस्तक जरूर वाचावे. 'दुसऱ्या महायुद्धातले युद्ध नेतृत्व' ज्यामध्ये चर्चिल, हिटलर, रूझवेल्ट आणि स्टॅलिन सामील आहे, हे दि. वी. गोखले यांचे हे पुस्तक अतिशय वाचनीय, विश्लेषण केलेले आहे. '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे पुस्तक अजरामर आहे. सावरकर यांचे 'सहा सोनेरी पाने' हे भारतीय इतिहासातील सहा महत्त्वपूर्ण घटनांचे ऐतिहासिक वर्णन आहे. त्यांच्या ज्वलंत कथनाद्वारे आणि धोरणात्मक विचार, स्वावलंबन आणि धैर्य यांच्या महत्त्वावर भर देऊन सावरकर वाचकांमध्ये कर्तव्याची भावना आणि राष्ट्रीय सुरक्षेबद्दल जागरूकता निर्माण करतात.

बाबासाहेब पुरंदरे यांचे 'राजा शिव छत्रपती' हे छत्रपती शिवाजी महाराजांचे एक विस्तृत चरित्र आहे; जे महाराष्ट्रातील एक महान योद्धे आणि सामरिक कौशल्य आणि राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक आहे. हे कार्य छत्रपती शिवाजींच्या लष्करी धोरणांवर प्रकाश टाकते. हिंदवी साम्राज्य मजबूत करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आणि त्यांच्या लोकांचे रक्षण करण्यासाठी त्यांचे अथक समर्पण, राष्ट्रीय सुरक्षा आणि नेतृत्वाच्या महत्त्वावर तरुणांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शक म्हणून काम करते. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

---

संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे

# संतांचा सामाजिक संवेदनशीलता विचार



**संत वाङ्मयातील संवेदनशीलता मूल्य**

संतांचा समाजातील लोकांविषयी कळवळा हा नेहमीच भूतदयेचा विचार करतो. **प्रत्येकामध्ये परमेश्वराचा अंश पाहतो. बुडती हे जन न देखावे डोळा। म्हणून कळवळा येत असे ॥** समाजातील दुःखी लोक पाहून त्यांचे अंतःकरण दुःखाने भरून जात असे. आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून ते भोळ्याभाबड्या लोकांना दुःखाचे कारण आसक्ती आहे, असे सांगत असत. दुःखाची निवृत्ती व परमसुखाची प्राप्ती करण्यासाठी सदाचार आवश्यक आहे, अशी शिकवण ते समाजाला देत असत. लोकांना सन्मार्ग दाखविणे हेच आपल्या जीवनाचे परम कर्तव्य आहे, असेही सांगत. आपल्या जन्माचे ध्येय काय? या जगामध्ये येण्याचे कारण काय? याबद्दल ते सांगतात.

लोककल्याण व लोकांना सन्मार्ग दाखविणे हेच जीवनाचे ध्येय आहे. या संसारातील जीव कसे अज्ञानाच्या, अंधकाराच्या दुःखात बुडून गेलेले आहेत. ते पाहून सहृदयी तुकारामांचे मन हेलावून जाते. लोकांना मोलाचा संदेश देताना ते सांगतात **उपकारासाटी बोलो हे उपाय । येणेंविण काय आम्हां चाड ॥ बुडती हे जन न देखवे डोळा । म्हणवुनी कळवळा येतसे ॥ तुका म्हणे माझे देखतिल डोळे। भोग देते वेळे येईल कळो ॥ समाजामध्ये जीवन जगताना परोपकार करा. तोच खरा मानवधर्म आहे, अशी शिकवण त्यांनी समाजाला दिली. पाप आणि पुण्याची अगदी साधी व्याख्या त्यांनी सांगितली आहे. पुण्य परोपकार पाप ते परपीडा । आणिक नाही जोडा दुजा यासी ॥ सत्य तोचि धर्म असत्य ते अकर्म । आणिक हे वर्म नाही दुजे ॥ गति तेचि मुर्खी नामाचे स्मरण । अधोगती जाण विन्मुखता ॥ संतांचा संग तोचि स्वर्गवास । नरक तो उदास अनर्गळा ॥ तुका म्हणे उघडे आहे हित घात । जया जे उचित खरा तैसे ॥** (तु. गा. २३२)

सामान्य माणसांना कठीण वाटणारी पाप आणि पुण्याची संकल्पना त्यांनी इतक्या सोप्या पद्धतीने मांडली व एवढे गहन असे तत्त्वज्ञान अगदी साध्या शब्दात लोकांसमोर मांडले. परोपकाराने वागा यासारखे दुसरे पुण्य नाही. परोपकारी वृत्तीच तुमचे पुण्य वाढवेल. त्यासाठी कर्मकांड, पूजा-अर्चा करण्याची गरज नाही, असे तुकोबा म्हणतात. संतांनी आपल्या पारमार्थिक जीवनसाधनेमध्ये परोपकारी वृत्तीला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले आहे. देहभान विसरून ते सर्वांशी परोपकारी वृत्तीने वागतात. त्यासाठी त्यांनी 'सर्वाभूती भगवंत' या दिव्य अनुभवाचा आनंद प्राप्त केला. हेच त्यांच्या भक्तिसाधनेचे परमोच्च शिखर आहे. परोपकारही असा की, ज्याचा आपल्याशी अर्थार्थी काहीही संबंध नाही, अशा व्यक्तींवरही दया दाखवून उपकार करणे होय. धन्यवादाच्या साध्या दोन शब्दांचीही त्यांनी अपेक्षा न ठेवता गरजवंताची काया-वाचामनाने सेवा करणे होय, असा दया व परोपकार या जीवनमूल्यांचा संदेश ते आपल्या कृतीतून अभंगाद्वारे देतात.

**संत एकनाथांनीसुद्धा जीवनात आवश्यक असणाऱ्या भूतदयेचा व परमार्थाचा समन्वय मांडला आहे. सद्भावो जोडल्या सर्वभूती । तेणे प्रगटे माझी चौथी भक्ती ॥ जीच्या पोची चारी मुक्ती । सदा लागती स्वानंदे ॥**

संत तुकारामांच्या वृत्तीने भूती भगवद्भाव ठेवून परोपकार सेवेतून चौथ्या भक्तीची साधना साध्य केली होती. म्हणूनच त्यांची सामाजिक जीवनातील वाटचाल ही सामान्याकडून असामान्याकडे झाली होती. या परोपकाराच्या साधनेमुळेच ते सामाजिक जीवनात संतत्वाला पोहोचले होते. सामान्य माणसाला, संसारामध्ये गुरफटलेल्या स्वार्थी जीवाला ते कदापि शक्य नसते. त्यासाठी त्यांचा स्वार्थ आडवा येतो. त्यामुळे आज जी स्वार्थी वृत्ती समाजामध्ये बोकाळलेली आहे, त्या वृत्तीवर संत तुकोबांची कृती व त्यानंतर त्यांनी केलेली अभंग वाङ्मयाची उक्ती समाजामध्ये परोपकार धर्म जीवनमूल्य रुजविण्यासाठी एक आदर्श जीवनमार्ग आहे.

संत तुकारामांच्या परोपकार सेवेचा नामनिर्देश त्यांच्या अभंगातून दिसत नाही. त्यांच्या प्रसिद्धीपराङ्मुख वृत्तीला त्याचा उल्लेख करणे योग्यही वाटले नसावे. त्यामुळे त्यांच्या परोपकारी वृत्तीसाठी महिपतबाबांनी दिलेल्या रसाळ ओव्यांचा खुलासा प्रमाण मानतात. जे का रंजले गांजले आपल्या अवतीभवती जे कोणी सुखाने रंगलेले असतील, दुःखाने गांजलेले असतील त्या सर्वांना जो 'आपले आहेत' असे म्हणतो, तोच खरा साधू आहे, असे ओळखावे आणि अशांच्या जवळच देव असतो, असे जाणावे. लोणी जसे आतून-बाहेरून मऊ असते, अगदी त्याचप्रमाणे संताचे चित्तदेखील मऊ असते. ज्यांना कोणीही आश्रय न देता झिडकारतात अशा अनाथांना ते आपल्या हृदयात स्थान देतात. जे प्रेम ते स्वतःच्या मुलांवर करतात. तशाच प्रकारचे प्रेम ते दास व दासींवर करतात. संत तुकोबा म्हणतात, अशाबद्दल काय सांगावे, ते साक्षात परमेश्वरच आहेत. **जे का रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले ॥ तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥ अणुरेणुपर्यंत जाणा भूतमात्रा धारतस करुणा। हिंसा घडे ते कर्म जाणा सहसाही मना नावडे ॥ उष्णकाळी झालीया उबारा । कीर्तनामाजी घालीतसे वारा ॥ अन्न न मिळता क्षुधातुरा । प्रयत्ने मेळवूनी दे त्यासी ॥ घागर भरोनी सत्वर । मार्गावर ने तेथे ॥ उषःकाळी जीवन वाटेवर । नसता उपाय करीतसे थोर ॥ पांथस्थासि व्याधी मार्गी होत । जवळी नसता सुहृद आप्त ॥ तयासि राहवोनि देउळात । ओषध पथ्य करवीतसे ॥**

संत परोपकार सेवेचा नामनिर्देश त्यांच्या अभंगातून दिसत नाही. त्यांच्या प्रसिद्धीपराङ्मुख वृत्तीला त्याचा उल्लेख करणे योग्यही वाटले नसावे. त्यामुळे त्यांच्या परोपकारी वृत्तीसाठी महिपतबाबांनी दिलेल्या रसाळ ओव्यांचा खुलासा प्रमाण मानतात. ज्यासि आपंगिता नाही । त्यासि धरी जो हृदयी ॥ दया करणे पुत्रासी । ते चि दासा आणि दासीं ॥ तुका म्हणे सांगू किती । तो चि भगवंताची मूर्ती ॥ संत तुकारामांनी प्रस्तुत अभंगातून खऱ्या साधूची ओळख पारखण्याची कसोटी सांगितली आहे. परोपकारी वृत्ती ज्याच्या अंतःकरणामध्ये भरलेली आहे. सुखाने ज्याचे हृदय उचंबळून जाते. दुःखाने ज्याचे हृदय हेलावून जाते. तोच इतरांच्या भावनेशी समरस होऊ शकतो. त्यालाच फक्त साधू समजावे व त्याच्याजवळच भगवंताचा वास असतो, असे समजावे.

(पान ६ वर)

---

**गेल्या सहा महिन्यांमध्ये जर्मनीमध्ये घडलेल्या राजकीय घडामोडी पाहता सत्तांतर अटळ होते. अमेरिकेप्रमाणेच तिथेही स्थलांतराचा मुद्दा प्रचाराच्या केंद्रस्थानी आला होता. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीमध्ये प्रथमच कडव्यांचे सरकार सत्तेवर येत असले, तरी या सरकारला तडजोडी करणं अपरिहार्य दिसते. आता जर्मनीचे चान्सेलर होऊ घातलेल्या फ्रेडरिक मर्झ यांना आघाडी करण्यासाठी अन्य पक्षांशी जुळवून घ्यावे लागणार आहे.**

सत्ताकारण

आरिफ शेख

# जर्मनीमध्ये सत्तांतर; पण आव्हाने कायम



जर्मनीमध्ये अलिकडे पार पडलेल्या संसदीय निवडणुकीत कॉन्झर्व्हेटिव्ह आघाडीला सर्वाधिक मते मिळाली. फ्रेडरिक मर्झ आता जर्मनीचे चान्सलर बनणार आहेत; मात्र त्यांच्या आघाडीला बहुमत मिळालेले नाही. सरकार स्थापन करण्यासाठी ५० टक्क्यांहून अधिक जागा मिळणे आवश्यक आहेत. तेथील कोणत्याही पक्षाला वा आघाडीला त्या मिळालेल्या नाहीत. दुसऱ्या महायुद्धानंतर देशात कट्टरतावाद्यांची सत्ता येणार असली, तरी त्याची सुरुवात सहा महिन्यांपूर्वी झालेल्या विविध राज्यांच्या निवडणुकीत एक राज्य जिंकून कट्टरतावाद्यांनी आपली चुणूक दाखवली होती. बेकायदेशीर स्थलांतरित आणि सीरियन निर्वासितांचा प्रश्न हा या निवडणुकीतील सर्वात मोठा मुद्दा होता. इस्लामच्या नावाखाली पसरवल्या जात असलेल्या कट्टरतावादामुळे हैराण झालेल्या जर्मन जनतेला केवळ 'एएफडी'च जर्मनीला वाचवू शकते, असे वातावरण तयार करण्यात आले होते. 'एएफडी' म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून ड्यूशलँडसाठी उजव्या विचारसरणीचा पर्याय आहे. सध्याच्या सरकारच्या धोरणांविरोधात जनतेमध्ये रोष आहे. याचाच परिणाम म्हणजे देशातील सार्वत्रिक निवडणुकीमध्ये उजव्या विचारसरणीच्या पक्षाला सर्वाधिक मते मिळाली. जर्मनीमध्ये उजव्या विचारसरणीच्या अल्टरनेटिव्ह फॉर ड्युशलँडने निवडणुकीत मिळविलेल्या आघाडीमुळे सामान्य जर्मन मतदार इस्लामिक कट्टरतावाद आणि सध्याच्या सरकारच्या इस्लामबद्दलच्या उदारमतवादी धोरणांविरुद्ध संतप्त असल्याचे दिसून आले आहे; मात्र उजव्या विचारसरणीच्या पक्षाला अजूनही स्वबळावर बहुमत मिळविता आलेले नाही.

सरकार स्थापनेसाठी त्यांना युतीची गरज आहे. अलिकडेच निवडणूक निकाल समोर आल्यानंतर सीडीयू/सीएसयू उमेदवार फ्रेडरिक मर्झ यांनी सत्ताधारी आघाडी स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. निवडणुकीमध्ये त्यांना सुमारे २९ टक्के मते मिळाली. मर्झ म्हणाले, आता आम्ही जर्मनीमध्ये शक्य तितक्या लवकर सरकार स्थापन करण्याची गरज आहे. आम्ही युरोपमध्ये वेगळे स्थान निर्माण करू शकतो, याची खात्री आहे. दरम्यान, एएफडी पक्षाच्या चान्सलर पदाच्या उमेदवार एलिस विडेल यांनी निकालाबाबत आनंद व्यक्त केला. हा आमच्यासाठी ऐतिहासिक निकाल आहे. असे असले तरी आघाडी अपरिहार्य असल्याने त्यांना चान्सलर होता येणार नाही. सरकार स्थापनेचा मार्ग सोपा होणार नाही. कारण बहुतांश प्रमुख पक्ष अजूनही 'एएफडीला' पाठिंबा न देण्यावर ठाम आहेत. 'एएफडी' पक्ष अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा समर्थक मानला जातो. ट्रम्प यांनी जर्मनीतील नवीन निवडणूक निकालाचे कौतुक केले. ते म्हणाले, अमेरिकेप्रमाणेच जर्मनीचे लोकही ऊर्जा आणि इमिग्रेशनच्या अजेंड्यामुळे कंटाळले आहेत. 'एएफडी'चा विजय हा जर्मनीसाठी मोठा दिवस आहे. आता आपण 'नाटो'सोबत राहू शकतो का, हे पाहावे लागेल. कारण संरक्षणाच्या बाबतीत युरोपला अमेरिकन प्रभावापासून मुक्त करून मजबूत करण्याला माझे प्राधान्य आहे. ६९ वर्षीय मर्झ यांना सरकार चालवण्याचा अनुभव नाही; परंतु त्यांनी देशाला चांगले नेतृत्व देण्याचे आश्वासन दिले आहे. ओलाफ शुल्झ यांनी पराभव स्वीकारला आहे. त्यांनी मर्झ यांचे विजयाबद्दल अभिनंदन केले. शुल्ट्झ यांच्या नेतृत्वाखालील युती गेल्या नोव्हेंबरमध्ये तुटली. त्यामुळे नियोजित वेळेच्या सात महिने आधी निवडणुका घ्याव्या लागल्या. आता निवडणूक निकालानंतर मर्झ यांना बहुमत मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागेल, कारण सर्वाधिक जागा जिंकूनही त्यांच्या आघाडीला बहुमतासाठी आवश्यक असलेली ५० टक्क्यांहून अधिक मते मिळालेली नाहीत. तत्पूर्वी जर्मनीच्या संसदेचे कनिष्ठ सभागृहाचे ६३० सदस्य निवडण्यासाठी ५९ दशलक्षाहून अधिक मतदारांनी मतदान केले. जर्मनीच्या संसदेत ६३० जागा आहेत; त्यापैकी २९९ थेट मतदारांद्वारे निवडल्या जातात. ३३१ जागांचे वाटप पक्षीय मतांच्या आधारावर केले जाते. येथे मतदार दोन मते देतात. पहिले मत स्थानिक उमेदवाराला तर दुसरे मत राजकीय पक्षाला दिले.

कनिष्ठ सभागृहातील जागांचे वाटप दुसऱ्या मताच्या आधारे प्रमाणात केले जाते. जर्मनीमध्ये निवडणूक प्रचारात अवैध स्थलांतरितांचा मुद्दा गाजला. बेकायदेशीर स्थलांतरितांनी देशात अनेक हल्ले केले आहेत. अर्थव्यवस्थेतील मंदीचा मुद्दाही निवडणुकीमध्ये वरचढ ठरला. जर्मनी हा २७ राष्ट्रांच्या युरोपियन महासंघातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. तो 'नाटो'चा प्रमुख सदस्य आहे. तो युक्रेनचा अमेरिकेनंतर दुसरा सर्वात मोठा शस्त्र पुरवठादार आहे. जर्मन राजकारणात ट्रॅफिक लाईट म्हणजे 'सोशल डेमोक्रेटिक पार्टी', 'फ्री डेमोक्रॅटिक पार्टी' आणि 'ग्रीन्स पार्टी' यांची युती आहे. या पक्षांच्या चिन्हांना अनुक्रमे लाल, पिवळा आणि हिरवा या रंगांची नावे देण्यात आली आहेत. अलिकडेच झालेल्या या निवडणुकीमध्ये कॉन्झर्व्हेटिव्ह आघाडीला सर्वाधिक मते मिळाली आहेत; मात्र त्यांनाही बहुमत मिळू शकले नाही. सरकार स्थापन करण्यासाठी ५० टक्क्यांपेक्षा जास्त जागा मिळणे आवश्यक आहे, तर या उजव्या विचारसरणीच्या आघाडीला ३० टक्के मते मिळाली आहेत; मात्र आता फ्रेडरिक मर्झ हे जर्मनीचे नवे चान्सलर होणार, हे निश्चित झाले आहे.

(पान ६ वर)

# अपेक्षांची सवारी, कधी तारी-कधी मारी!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

१. पाचव्या शतकातील गोष्ट. विद्योत्तमा नावाच्या एका राजकुमारीने, जो तिला शास्त्रार्थात हरवेल, त्याच्याशीच लग्न करायचे ठरवले होते. राज्यातील सर्व विद्वानांना तिने हरवले. तिचा सूड उगवण्यासाठी ज्यांना तिने हरवले होते अशा काही विद्वानांनी एकत्र येऊन अशी योजना केली की, राज्यातील सर्वात मूर्ख व्यक्तीचा शोध घेऊन, त्याला जिंकवून तिचा विवाह त्या मूर्खाशी लावून देऊ. त्यांनी शोधलेल्या त्या मूर्ख माणसाला पटवले की, तू जर अगदी आम्ही सांगू तसे केलेस तर तुझे लग्न आम्ही राजकुमारीशी लावून देऊ. तो तयार झाला. मग त्याला सांगण्यात आले, तिने तुला कुठलाही प्रश्न विचारला तरी काहीच न बोलता फक्त हातवारे करायचे. आम्ही सांगू की, तुझे मौन व्रत असल्यामुळे तू बोलणार नाही. तुझ्या हातवाऱ्यांचा आम्ही असा अर्थ सांगू की, तिच्यावर तुझा प्रभाव पडेल. त्यांच्या योजनेत ते यशस्वी झालेत व विद्योत्तमेचे लग्न त्याच्याशी झाले. पण लवकरच आपली फसवणूक करण्यात आल्याचे तिला लक्षात आले. तेव्हा तिने तिच्या नवऱ्याचा तू मूर्ख आहेस म्हणून अपमान केला. नवऱ्याला खूपच वाईट वाटले व तो तिच्या राजवाड्यातून निघून गेला. तिनेसुद्धा त्याला थांबवायचा प्रयत्न केला नाही. त्यानंतर त्याने खूप परिश्रम केले. स्वत:चा खूप विकास केला आणि आपल्यावरचा मूर्ख हा शिक्का काढून टाकला. त्यांनी अस्ती, कश्चित् आणि वाग् या शब्दांनी सुरू होणारी तीन संस्कृत महाकाव्ये रचली. ती काव्ये म्हणजे कुमारसंभव, मेघदूत आणि रघुवंश. आज संपूर्ण जग त्यांना महाकवी कालिदास म्हणून ओळखतं. त्यांच्या साहित्यात तीन नाटके, दोन खंडकाव्ये आणि दोन महाकाव्यांचा समावेश होतो.

२. अंदाजे इसवी सन ९६८ सालची गोष्ट. इराण आणि तुराण या दोन राज्यांच्या मध्ये असलेल्या आपल्या आवडत्या जंगलात रुस्तम शिकारीला गेला. तो इराणजवळच्या जाबुलिस्तान या छोट्या राज्याचा राजा होता. शिकार करताना थकवा आला म्हणून आपल्या आवडत्या घोड्याला चरायला सोडून तो झोपी गेला. त्याच वेळी सामानगण राज्याच्या सैनिकांना तो सुंदर घोडा एकटाच चरताना दिसला. त्यांनी तो घोडा पकडून आपल्या राजाला भेट म्हणून द्यायचे ठरवले. रुस्तम झोपेतून उठल्यावर त्याला घोडा दिसला नाही, पण काही अंतरावर त्याने केलेल्या संघर्षाच्या खुणा दिसल्या. घोड्याच्या टापांच्या ठश्यावरून माग काढत तो सामानगण राज्याच्या हद्दीत पोहोचला. त्या काळात रुस्तम एक अजोड व प्रचंड शक्तिशाली योद्धा म्हणून सुप्रसिद्ध होता. इराणचा राजा त्याच्या संरक्षणामुळेच सुरक्षित होता. थोड्याच वेळात चिडलेला महान योद्धा रुस्तम आपल्या राज्यात पोहोचलाय हे तेथील राजाला कळले व त्याने रुस्तमला आदराने राजवाड्यात आमंत्रित केले. तुमचा घोडा सापडेपर्यंत तुम्ही आमचा पाहुणचार घ्या म्हणून सामानगणच्या राजाने जाबुलिस्तानचा राजा रुस्तमला आग्रह केला. मिळालेल्या सन्मानाने आनंदित होऊन रुस्तमसुद्धा पाहुणचार घेत काही दिवस थांबला. या दरम्यान त्याच्या पराक्रमाच्या अनेक कथा ऐकून भाळलेल्या तेथील राजकन्या तेहमिनाने त्याच्याशी लग्न करण्याची इच्छा प्रकट केली व राजाच्या मर्जीने त्यांचे लगेच लग्नसुद्धा पार पडले. या दरम्यान त्याचा घोडा त्याला परत मिळाला. आणखी काही महिने तेथेच घालवल्यावर तेहमिना गरोदर असल्याचे सर्वांना कळले. सर्वांना खूप आनंद झाला. या दरम्यान इराणला युद्धात मदत करण्यासाठी रुस्तम तिला तेथेच सोडून युद्धावर गेला. जाण्यापूर्वी त्याने तिला सांगितले की, जर आपल्याला मुलगा झाला तरच मला कळव व त्याच्या दंडावर बांधायला हा हिरेजडीत बाजूबंद बांध आणि मुलगी झाली तर तिच्या केसात घालायला हा दागिना घाल, एवढे बोलून रुस्तम जड अंत:करणाने सर्वांचा निरोप घेऊन युद्धावर व पुढे आपल्या जाबुलिस्तान राज्यात परतला. यथावकाश तिला रुस्तमसारखाच धिप्पाड शरीरयष्टीचा मुलगा झाला. त्याचे नाव सोहराब ठेवण्यात आले. मुलगा मोठा होताना त्याने अनेकदा विचारूनसुद्धा त्याचे वडील कोण व ते कुठे राहतात त्याला कळू दिले नाही. केवळ तो १४ वर्षांचा असतानाच वडिलांसारखाच धिप्पाड व अतिशय कुशल व अजेय योद्धा झाल्यावर त्याला त्याच्या वडिलांचे नाव रुस्तम असून आजोबांचे 'झाल' व एकूणच त्याचे घराणे किती सुप्रसिद्ध




आहे, ते त्याला सांगितले. हे कळल्यावर त्याला खूप आनंद झाला. एक आदर्श व अजेय योद्धा म्हणून त्याला रुस्तमचे नाव आधीच सुपरिचित होते. पण तेच आपले वडील असल्याचे ऐकून त्याला खूप गौरवान्वित वाटले. मग त्याने तू इतके दिवस माझ्यापासून का लपवलेस, असे त्याच्या तेहमिनाला विचारले. तेव्हा त्याचे वडील त्याला मोठा योद्धा होण्यासाठी कठोर प्रशिक्षण देऊन त्रास देतील व युद्धावर सोबत घेऊन जातील म्हणून लपवले, असे आईने त्याला सांगितले. हे सर्व कळल्यावर आपल्या प्रसिद्ध वडिलांना भेटायच्या ओढीने व अपेक्षेने सोहराब तुराणचा राजा अफ्रासय्यबच्या मदतीने सैन्य जमवून वडिलांना शोधायला निघाला.

इराणच्या राजाला हरवून माझ्या वडिलांना म्हणजे रुस्तमलाच इराणचा राजा बनवतो अशा महत्त्वाकांक्षेने भारून त्या कोवळ्या पण बलदंड सोहराबने इराणच्या सैन्याची दाणादाण उडवली. त्याला थोपवणे कठीण झाल्यावर इराणच्या राजाने मदतीसाठी नेहमीप्रमाणेच रुस्तमला तातडीने बोलावणे पाठवले. रुस्तम स्वत: जाबुलिस्तानचा स्वतंत्र राजा असल्यामुळे त्याला असे तडकाफडकी बोलावलेले आवडले नाही. शेवटी रुस्तम चार दिवसांनी इराणला आला. त्याने यायला उशीर केला म्हणून इराणच्या काएकैस राजाने रुस्तमचा अपमान केला. पण नंतर माफी मागून लढण्यासाठी रुस्तमचे मन वळवले. ज्यांनी सोहराबला प्रत्यक्ष पाहिले त्यांना तो रुस्तमचाच मुलगा आहे लगेच कळले होते. पण पुढे मुलगा व बाप एक होऊन इराणचे राज्य घेतील या भीतीने त्यांनी ही गोष्ट लपवून ठेवली. युद्धात सगळे योद्धे शिरस्त्राण व चिलखत घालून एकमेकांसमोर उभे असल्यावर चेहरा नीट दिसत नसल्यामुळे दोघांनाही एकमेकांना ओळखणे शक्य नव्हते.

रुस्तमला वडिलांना ओळखता यावे म्हणून त्याचा मामा सोबत आला होता, पण युद्धात तो आधीच मारला गेला. युद्धात अनेकांचे जीव घेण्यापेक्षा द्वंद्व युद्धाद्वारे निर्णय करण्याचे दोन्ही राज्यांनी ठरवले. जिवंतपणीच त्यांच्या शौर्यामुळे दंतकथा नायक ठरलेले वडील रुस्तम आणि त्यांना शोभणारा तेवढाच पराक्रमी त्यांचाच मुलगा सोहराब, शेवटी शत्रू म्हणून समोरासमोर उभे ठाकले. दोघांनाही एकमेकांचं त्यांचं नातं माहीत नव्हतं. सोहराब आपल्या वडिलांच्या शोधात असल्यामुळे त्याने रुस्तमला तुम्ही रुस्तम आहात का? असे स्पष्ट विचारले. पण रुस्तमने तो लढाईतील बुद्धीचा डाव समजून मुद्दाम आपली ओळख दिली नाही व म्हटल की, रुस्तम फार मोठा योद्धा आहे त्या मानाने मी कुणीच नाही, असे सोहराबला गाफील करण्यासाठी सांगितले.

पहिल्या दिवशीच्या युद्धात दोघेही खूप लढले व शेवटी सोहराबने रुस्तमला हरवले. पण त्याला रुस्तमला पाहून सारखी वडिलांची आठवण येत होती, त्यामुळे संधी मिळूनसुद्धा त्यांचा जीव घेण्याचा प्रयत्न सोहराबने केला नाही. रुस्तमला आपल्याला मुलगा आहे हेच माहीत नव्हते. त्यामुळे एका प्रबळ शत्रूला कसेही करून हरवायचेच, असा विचार करून दुसऱ्या दिवशी युद्धात रुस्तमने एक विषाने भिनलेली कट्यार सोहराबला धोका देऊन त्याच्या छातीत खुपसली. आपण आता मरणार हे कळल्यावर सोहराब म्हणाला, माझ्या हत्येचा बदला माझे वडील घेतील. त्यावर रुस्तमने विचारले, कोण आहेत तुझे वडील? तेव्हा सोहराब म्हणाला, सुप्रसिद्ध महान योद्धा रुस्तम हेच माझे वडील आहेत. हे ऐकून रुस्तमला प्रचंड धक्का बसला. तो म्हणाला, हे शक्यच नाही. मला तर मुलगी आहे. जर मुलगा झाला असता तर तेहमिनाने मला कळवले असते, हे ऐकून मरणाच्या दारात असलेल्या सोहराबला आईचे नाव ऐकून हेच आपले वडील असल्याची ओळख पटली. रुस्तमचा विश्वास बसण्यासाठी सोहराबने चिलखताखालून आईने बाबांची आठवण म्हणून दिलेला आपला बाजूबंद रुस्तमला दाखवला. तो बाजूबंद बघून रुस्तमला लगेच खूण पटली व आपण काय करून बसलो म्हणून त्याला अवर्णनीय पश्चात्ताप झाला. पण आता खूप उशीर झाला होता. त्याने अतिशय प्रेमाने व दु:खाने मुलाला मिठी मारली व म्हणाला, हो रे बाळा, अरे मीच तुझा दुर्दैवी बाप रुस्तम आहे. तुझ्या आईने मुलगा होऊनसुद्धा माझ्यापासून का लपवले? तेव्हा सोहराबने सांगितले की, मला योद्धा बनवण्यासाठी तुम्ही मला कडक शिक्षण देऊन माझे हाल कराल, युद्धात लढायला सोबत न्याल या भीतीने, माझे रक्षण करण्याच्या अपेक्षेने तिने तुम्हाला सांगितले नाही. नंतर तो म्हणाला, बाबा आता शेवटी का होईना तुम्ही भेटलात याचे मला समाधान आहे. त्याचवेळी अशी जखम बरी करण्याचे औषध इराणच्या राजाजवळ आहे, हे रुस्तमला आठवले. म्हणून सोहराबचा प्राण वाचवण्यासाठी ते औषध आणण्यासाठी रुस्तम धावत गेला; तेवढ्या वेळात सोहराबचा प्राण गेला. इकडे तेहमिना सोहराब आपल्या वडिलांना घेऊन घरी येणार म्हणून त्यांच्या स्वागताची तयारी करीत होती, पण तिला वडिलांच्या हातूनच मुलाचा वध झाल्याचे कळल्यावर ती वेडी झाली आणि एक वर्षातच मरण पावली. कालांतराने रुस्तमसुद्धा मरण पावला. नवऱ्याकडून ठेवलेल्या नकारात्मक अपेक्षेने व चुकीच्या मानसिकतेने सोहराबची आई तेहमिनाने मुलगा झाला, हे सत्य त्याचे वडील रुस्तम यांच्यापासून लपवले खरे; पण यामुळेच सोहराबचा वडिलांच्याच हातून बळी गेला.

३. त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण घेणे कठीण होते. एकदा शिक्षकांनी त्याला चिडून म्हटले, तू दगड आहेस, दगड. तू आयुष्यात काहीही करण्याच्या लायकीचा नाहीस. तुझ्या जीवनाला काही अर्थ नाही. हे ऐकून त्या मुलाला मोठा धक्का बसला. तो निराशेत एका तळ्याजवळ गेला. तेव्हा त्याला काठावर काही दगड दिसले. पाण्याच्या प्रभावामुळे त्यावर शेवाळ वाढले होते. त्याने विचार केला. दगडावरसुद्धा शेवाळ वाढू शकते तर



मीसुद्धा काहीतरी करून मोठा होऊ शकतो. त्याला एकदम हुरूप आला. मग त्याने शाळेचा अभ्यास सोडून जगात इतर कोणत्या गोष्टी मी शिकू शकतो, याचा विचार करायला व शोध घ्यायला सुरुवात केली आणि त्याला मार्ग सापडला. आज ते एक यशस्वी मीडिया किंग आहेत. ते म्हणजे झी टीव्हीचे जनक सुभाषचंद्र गोएंका!

**शिकायचे काय?**

**कुठल्याही कारणाने किंवा अपयशामुळे जर लोकांनी तुमची अवहेलना केली व तुमच्याकडून नकारात्मक अपेक्षा केली तरी निराश होण्याची गरज नाही. सकारात्मक विचाराने प्रयत्न चालू ठेवा, यश नक्की मिळेल.**

(लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत)



## सावळाच वाली । वैष्णवांचा ।।

साजिरा गोजिरा । विठ्ठल सावळा ।।
आत्म्याचा जिव्हाळा । विटेवरी ।।१।।

संसाराची माया । मोहात सापडे ।।
दु:खाचेच कडे । भोवताली ।।२।।

स्वार्थाचे लिंपन । वृत्तीस फासले ।।
तीने नासवीले । उभ्या जन्मा ।।३।।

भजनी कीर्तनी । रमले ना मन ।।
आता आले भान । कृपा झाली ।।४।।

पंचमहाभूते । दिंडीत नाचली ।।
सावळाच वाली । वैष्णवांचा ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## शीळ वसंताची

या वसंताने शीळ अशी यातली
वसुंधरा पानोपानी शहारली
सोनेरी शालू नेसूनी सजली
नव स्वप्न चाहुलीने हरखली
निरभ्र निळ्या गगन मंडपी बाई
सृष्टीला हळद लागली कोकिळेची मंजुळ
शहनाई आनंदाने ताल धरू लागली
पळसाने बांधल्या जागोजागी मोहक केशरी तोरण
पताका गुलमोहराने अंथरला गालिचा
वेग आला सूर्यरथाच्या चाका
उष्ण वाऱ्याने धाडल्या पत्रिका धुंद रातराणीने
शिंपला सडा चाफ्याने रेखियली रंगावली
रानी वाजतो बाई सनई चौघडा

अपर्णा कुळकर्णी

## चंद्र भाकरीचा...

आयुष्य सांधण्या, खूप केले यत्न मनस्वी प्रयत्न, रात्रंदिस...
पोटासाठी सदा, भटकंती दूर सोबतीला पूर, समस्यांचा...
रस्त्याच्या कडेला, उघडा संसार कुटुंबाचा भार, डोईजड...
महागाईमुळे गुदमरे श्वास जीवन प्रवास, खडतर... विझलेली
सदा, पालातील चूल अर्धपोटी मुलं, झोपतात... उगवेल कधी
किरण सूर्याचा चंद्र भाकरीचा, जीवनात...

दादाराव अवचार

## सल्ला...

विचारल्याशिवाय देऊ नये कुणाला सल्ला नाही तर
ठरलेलेच असते होणे भावना दुखावल्या म्हणून हल्ला..
आवडत नाही कुणाला मारणे त्याच्या भाव विश्वावर डल्ला
ज्याला त्याला गाठू द्यावा म्हणूनच साक्षीभावाने बघत
ज्याचा त्याचा पल्ला

आशिष देव

---



# सोने-भत्त्याला धार; कर्जफेडीला आधार

अर्थोद्योग
महेश देशपांडे

अर्थनगरीमध्ये गेल्या आठवड्यामध्ये संमिश्र बातम्यांची वर्दळ राहिली. सर्वप्रथम धक्का दिला तो सोन्याच्या वाढत्या किमतीने. त्यापाठोपाठ निवृत्तीनंतरच्या गुंतवणुकीकडे कल कसा वाढत आहे, हे स्पष्ट करणारा एक अहवाल समोर आला. दरम्यान, मुदतपूर्व कर्जफेडीवरील भुर्दंडातून सामान्यांची मुक्तता होणार असल्याचे समोर आले. याच वेळी केंद्रीय कर्मचाऱ्यांना होळीपूर्वी महागाई भत्ता मिळणार असल्याचे स्पष्ट झाले.

अर्थनगरीमध्ये गेल्या आठवड्यामध्ये संमिश्र बातम्यांची वर्दळ राहिली. सर्वप्रथम समस्त भारतीयांनी डोळे टवकारून दखल घेतलेली बाब म्हणजे सोने सामान्यांच्या आवाक्याबाहेर जाणे. त्यापाठोपाठ निवृत्तीनंतरच्या गुंतवणुकीकडे कल कसा वाढत आहे, हे स्पष्ट करणारा अहवाल समोर आला. दरम्यान, मुदतपूर्व कर्जफेडीवरील भुर्दंडातून सामान्यजनांची मुक्तता होणार असल्याचेही समोर आले. याच वेळी केंद्रीय कर्मचाऱ्यांना होळीपूर्वी महागाई भत्ता मिळणार असल्याचे स्पष्ट झाले. गेल्या काही महिन्यांपासून भारतात सोने आणि चांदीच्या दरामध्ये सातत्याने चढउतार दिसून येत आहेत.

सोन्याचे दर दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. सोन्याचा १० ग्रॅमचा दर ९० हजार रुपयांच्या आसपास घोटाळत आहे. जीएसटीसह हाच दर ९२ हजार १८५ रुपयांवर जातो. गेल्या सव्वा महिन्यामध्ये सोने १० ग्रॅममागे तब्बल १३ हजार २८५ रुपयांनी महागले. वर्षाच्या पहिल्याच दिवशी सोन्याच्या दरवाढीने सराफ बाजाराची सुरुवात झाली होती. जानेवारीच्या पहिल्याच दिवशी सोने तोळ्यामागे १८५४ रुपयांनी महाग झाले होते, तेव्हापासून सोन्याच्या दराचा चढता आलेख दिसून येत आहे. १ जानेवारीला सोन्याचा दर प्रतितोळा ७८ हजार ८८० रुपये होता. त्यानंतर या दरात सातत्याने एक ते दोन हजार रुपयांची वाढ होत राहिली. आता लग्नसराई सुरू होत असल्याने खरेदी करणाऱ्यांची संख्या काही अंशी वाढली असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.



सोन्याच्या दरातील चढउतार गेल्या चार महिन्यांपासून सुरू आहे; मात्र सोने खरेदी करणाऱ्यांची संख्या आजही तेवढीच आहे. लग्नसराईच्या तोंडावर सोने आणखी महाग होत आहे. १५ मार्चपर्यंत सोन्याचा भाव एक लाख रुपये तोळा होण्याची शक्यता आहे. चांदीचा भावही ७०० रुपयांनी वाढून १ लाख ३०० रुपये प्रतिकिलो झाला आहे. अशीच एक दखलपात्र बातमी म्हणजे देशात लोक निवृत्ती नियोजनाबाबत जागरूक होत आहेत. भारताचे 'पेन्शन असेट अंडर मॅनेजमेंट' गुंतवणुकीतील रक्कम २०३० पर्यंत ११८ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. त्यात 'नॅशनल पेन्शन सिस्टिम' (एनपीएस) चा वाटा सुमारे २५ टक्के असू शकतो.

एका अहवालातून ही माहिती समोर आली आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये 'एनपीएस' मधील गुंतवणूक २२७ टक्क्यांनी वाढून २ लाख ७८ हजार १०२ कोटी रुपये झाली आहे. पूर्वी ती ८४ हजार ८१४ कोटी रुपये होती. 'डीएसपी पेन्शन फंड मॅनेजर्स'च्या अहवालात म्हटले आहे की, २०५० पर्यंत भारतातील वृद्ध लोकसंख्या अडीच पट वाढण्याची अपेक्षा आहे. तसेच, निवृत्तीनंतर आयुर्मान दर सरासरी २० वर्षांनी वाढेल. सध्या भारताचे पेन्शन मार्केट खूपच लहान आहे. ते जीडीपीच्या अवघे तीन टक्के आहे. अहवालात म्हटले आहे की, भारतीय किरकोळ गुंतवणूकदार बाजाराशी संबंधित गुंतवणुकीकडे पारंपरिक बचत पद्धतींपासून दूर जात आहेत. गेल्या दशकात रोख आणि बँक ठेवींवरील अवलंबित्व ६२ टक्क्यांवरून ४४ टक्क्यांवर घसरले आहे. दुसरीकडे नवीन 'एनपीएस' नोंदणीमध्ये २०२० आणि २०२४ दरम्यान मजबूत वाढ दिसून आली आहे. पुरुष सदस्यांमध्ये ६५ टक्क्यांची तर महिला सदस्यांमध्ये ११९ टक्क्यांची वाढ झाली आहे. सरकारने सप्टेंबर २०२४ मध्ये सादर केलेल्या 'एनपीएस' वात्सल्य योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्याकडे ८६ हजारांहून अधिक सदस्य आकर्षित झाले आहेत. 'डीएसपी पेन्शन फंड'चे व्यवस्थापक राहुल भगत म्हणाले, आमचा विश्वास आहे की, भारताची पेन्शन बाजारपेठ जलद वाढीसाठी तयार आहे. दरम्यान, बँकांसह इतर वित्तीय संस्थांकडून 'फ्लोटिंग रेट' कर्जाच्या मुदतपूर्व परतफेडीवर कोणताही पूर्व-पेमेंट दंड किंवा 'फोरक्लोजर' शुल्क आकारले जाणार नाही, असे रिझर्व्ह बँकेतर्फे जाहीर करण्यात आले आहे. व्यक्तींबरोबरच हे आता सूक्ष्म आणि लघु उद्योगांना (एमएसई) देखील लागू होईल. रिझर्व्ह बँकेने हा प्रस्ताव दिला आहे. रिझर्व्ह बँकेने या प्रस्तावाबाबत एक मसुदा पेपर जारी केला आहे. त्यावर २१ मार्च २०२५ पर्यंत भागधारकांकडून सूचना मागवण्यात आल्या आहेत. रिझर्व्ह बँकेने मसुद्यात म्हटले आहे की, संस्थांनी कर्जदाराशी केलेल्या करारात ठेवलेल्या काही प्रतिबंधात्मक प्रस्तावांमुळे ग्राहक स्वस्त कर्जाचा लाभ घेऊ शकणाऱ्या इतर कर्जदारांकडे जाऊ शकत नाही किंवा चांगल्या सेवा प्रदान करणाऱ्या कर्जदात्याकडे कर्ज बदलवू शकत नाही. रिझर्व्ह बँकेने मसुद्यात स्पष्ट केले आहे की, बँक किंवा इतर वित्तीय संस्थांना कोणत्याही 'लॉक-इन'



कालावधीशिवाय कर्जाचे पूर्व-पेमेंट किंवा 'फोरक्लोजर' करण्याची परवानगी द्यावी लागेल. त्यासाठी बँक किंवा वित्तीय संस्था कोणतेही शुल्क किंवा 'फोरक्लोजर' शुल्क वसूल करू शकणार नाहीत. रिझर्व्ह बँकेने मसुद्यात म्हटले आहे की, कर्जदारांकडून कोणत्याही परिस्थितीत, नियमन केलेल्या संस्थांद्वारे पूर्वी माफ केलेल्या आणि कर्जदाराला आगाऊ माहिती न दिलेली कर्जे 'फोरक्लोजर' किंवा पूर्व-पेमेंटच्या वेळी पूर्वलक्षी प्रभावाने कोणतेही शुल्क आकारू नये. या वळणावर केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांना होळीपूर्वी एक चांगली बातमी मिळू शकते.

१४ मार्च रोजी होळी आहे आणि सरकार होळीपूर्वी केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात (डीए) वाढ जाहीर करू शकते. या वाढीमुळे कर्मचाऱ्यांच्या पगारात आणि पेन्शनधारकांच्या पेन्शनमध्ये लक्षणीय वाढ होऊन महागाईपासून दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे. सातव्या वेतन आयोगांतर्गत महागाई भत्ता (डीए) वर्षातून दोनदा वाढविला जातो. पहिली वाढ १ जानेवारीपासून तर दुसरी १ जुलैपासून लागू करण्यात आली आहे. २०२५ ची पहिली वाढ जानेवारीपासून मिळणार असली तरी ती किती आहे, याची घोषणा अद्याप झालेली नाही. आता मार्चमध्ये अधिकृतपणे घोषणा केली जाऊ शकते. कर्मचारी संघटनांच्या म्हणण्यानुसार, यावेळी केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांच्या महागाई भत्त्यात दोन ते तीन टक्क्यांनी वाढ होऊ शकते. यामुळे एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याचे मूळ वेतन १८ हजार रुपये असल्यास ५३ टक्के महागाई भत्त्यानुसार त्याचा 'डीए' ९५४० रुपये असेल. 'डीए'मध्ये दोन टक्के वाढ झाल्यास त्याचा नवीन महागाई भत्ता ९,९०० रुपये म्हणजेच ३६० रुपये अधिक असेल. त्याच वेळी 'डीए'मध्ये तीन टक्के वाढ झाल्यास, महागाई भत्ता १० हजार ८० रुपयांपर्यंत पोहोचेल. त्यामुळे ५४० रुपयांचा अतिरिक्त लाभ मिळेल. ही वाढ सरकारी कर्मचाऱ्यांसह पेन्शनधारकांनाही दिली जाणार आहे. यावेळी एक कोटींहून अधिक सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांना त्याचा लाभ मिळणार आहे. महागाई भत्ता कर्मचाऱ्यांसाठी आहे तर पेन्शनधारकांसाठी याला महागाई सवलत (डीआर) असे म्हणतात. मार्च २०२४ मध्ये महागाई भत्त्यात चार टक्क्यांनी वाढ करण्यात आली होती. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सरकारने 'डीए' तीन टक्के वाढवल्यामुळे ५३ टक्के झाला होता. त्याअगोदर मार्च २०२४ मध्ये 'डीए'मध्ये चार टक्के वाढ करण्यात आली होती. अखिल भारतीय ग्राहक किंमत निर्देशांक (एआयसीपीआय) च्या आधारावर महागाई भत्ता निर्धारित केला जातो.

सरकार मागील १२ महिन्यांमधील सरासरी एआयसीपीआय डेटा लक्षात घेऊन 'डीए' आणि 'डीआर'चे दर ठरवते. सरकारने आठवा वेतन आयोग मंजूर केला आहे. आठवा वेतन आयोग १ जानेवारी २०२६ पासून लागू होण्याची शक्यता आहे. आठवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या पगारात ४० ते ५० टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

कुंभमेळा, भारतात भरणारं जगातलं सर्वात मोठं धार्मिक संमेलन. कुणीही आवताण न देता लाखो भारतीय भाविक हिंदू हजारो वर्षांपासून भारतात चार ठिकाणी भरणाऱ्या कुंभच्या मेळ्यात येत गेलेले आहेत. जेव्हा दळणवळणाच्या काहीही सुविधा नव्हत्या तेव्हासुद्धा लोक हजारोंच्या संख्येने काही आठवडे पायपीट करत कुंभमेळ्याला हजेरी लावायचे. आज प्रवास सोपा झालेला आहे पण कुंभ मेळ्यात येणाऱ्या भाविकांची आस्था मात्र तशीच, सनातन आहे. ह्यावर्षी उत्तरप्रदेशमध्ये प्रयागराजला महाकुंभ भरला होता. त्याचाच एक भाग म्हणून परमार्थ निकेतन, प्रसिद्ध लेखक शंतनू गुप्ता आणि मी असे मिळून कल्चर कुंभ ह्या नावाखाली एका तीन दिवसीय परिषदेचे आयोजन केले होते.

# जनांचा प्रवाहो चालिला...



नोंद

शेफाली वैद्य

फेब्रुवारीच्या तीन तारखेला मी प्रयागराजला पोचले. सरत्या माघाचे दिवस होते तरी थंडी फारशी नव्हती. विमान उतरताना वरून संगमाचं दृश्य मोठं अनुपम दिसतं. मी प्रयागराजला उतरले तेव्हा दुपार होत होती. घ्यायला आलेली गाडी शहरात शिरली, तर वाटेत सर्व प्रमुख सार्वजनिक इमारती, पुलांचे खांबे, रस्त्यांच्या भिंती अतिशय सुंदर चित्रांनी सुशोभित केलेल्या. वेगवेगळ्या भारतीय लोकशैलीत काढलेली चित्रे आणि त्यातून दिसणारे भारताचे सांस्कृतिक आणि लोकजीवन. एकूणच पूर्ण शहरच मेळ्यासाठी सज्ज झालेले आणि सुशोभित असे दिसत होते.

यमुनेवरचा जुना पूल ओलांडून आम्ही अरेल घाटाकडे गेलो. आमचा मुक्काम अरेल घाटावरच्या परमार्थ निकेतन मध्ये होता. नदीच्या काठावर छोटे छोटे तंबू उभारले होते. व्यवस्था अतिशय चोख आणि स्वच्छ. त्यादिवशीच्या प्रवासाने थकून गेले होते त्यामुळे तंबूत जाऊन लवकरात झोपी गेले. दुसऱ्या दिवशी पहाटे उठून मला कुंभ स्नानाला जायचं होतं. पहाटे चार वाजताच जाग आली कारण बाहेरून कुठल्या तरी आश्रमाची छोटी मिरवणूक भजन करत चालली होती. उठून सगळी आन्हिकं उरकली आणि बाहेर पडले.

आश्रमातली चहा-नाश्त्याची व्यवस्था अजून सुरू व्हायची होती म्हणून बाहेर एका छोट्या टपरीवर जाऊन बसले. तिथे एक भगवी लुंगी नेसलेला, दाढी-बिडी वाढलेला साधुबोवा चहा बनवत होता. अजून पूर्णपणे पहाट व्हायची होती. नदीवर मखमली अंधाराची गोधडी पसरली होती. चांगलीच थंडी होती हवेत. त्या वातावरणात त्या चहाच्या शेगडीवर हात शिकायला मजा वाटत होती. तो साधूबोवा चहा बनवत असताना माझ्याशी बोलत होता. म्हणाला 'हम तो हर कुंभ में जाते हैं दीदी, लेकिन ऐसा कुंभ कभी पहले न देखा, न सुना'. त्याच्या छोट्या दुकानामागेच एक राहुटी टाकून तो राहात होता. मस्त आलं टाकून त्याने बनवलेल्या कडक, वाफाळत्या चहाचा कुल्हड हातात घेऊन मी नदीकडे निघाले. नदीपात्रात जाण्यासाठी चांगलं ३०० मीटरचं वाळवंट तुडवत जावं लागलं, पण सगळीकडे कमालीची स्वच्छता दिसत होती. अजून सूर्य उगवला पण नव्हता, पण सफाई कर्मचारी झाडू घेऊन त्यांच्या कामाला लागले देखील होते.

संगमापाशी न्यायला एक छोटीशी बोट ठरवून मी बोटीत बसले. बोट चालवणारा खिवैय्या मोठा बोलका होता. म्हणाला, 'हमरेही पुरखोंने रामजी को सरजूपार लगाया'. तोही परत तेच सांगायला लागला की कुंभची अशी व्यवस्था ह्याआधी कधीच झाली नव्हती. संथपणे नाव संगमापाशी आली. पांढरट सायबेरियन गल्सचे थवेच्या थवे आभाळात उडत होते. त्यांचं खाणं विकणाऱ्या नावा पाण्यात ये जा करत होत्या. नुकताच सूर्योदय होत होता तरी संगमावर बऱ्यापैकी गर्दी होती. प्रयागराजचा हा संगम म्हणजे निसर्गाचं एक कौतुकच.

डावीकडून संथ वहात येणारा यमुनेचा विस्तीर्ण काळसर शांत प्रवाह आणि उजवीकडून आपलं जेडच्या रंगाचं पाणी मोठ्या डौलात मिरवत वेगात येणारी गंगा. यमुना काळीसावळी, तिच्या लाडक्या कृष्णसख्याच्या रंगात बुडून गेलेली. आपल्याच विचारात गढलेली शालीन प्रौढा. उगाच नाही दुर्गाबाई भागवतांसारख्या विदुषीने यमुनेला दुःखकालिंदी म्हटलंय. गंगा मात्र कायमच अवखळ रुपगर्विता, उत्तराखंडाच्या हिमशिखरांमधून दौडत येणारी चपला. प्रयागराजला यमुनेला भेटल्यानंतरच गंगा थोडी गंभीर आणि शांत होते आणि दोघींचा प्रवाह पुढे गंगा म्हणूनच काशीला विश्वनाथ शंकराच्या भेटीला जातो. प्रयागराजला ह्या दोघींच्या मिलनाच्या सीमारेषेवर उभी असलेली लाकडी बोटींची काळी कुळकुळीत चारकोलने काढल्यासारखी जाड ओळ. त्यातल्याच एका बोटीवर मी उभी, अस्तित्व आणि विनाश ह्यांच्या सीमेवर उभी असल्यासारखी. माझ्या मागे यमुनेच्या तीरावर स्नानासाठी भक्तांचा महासागर लोटलेला, पुढेही तशीच गर्दी. स्त्रिया, मुलं, तरुण, म्हातारे सगळे गुडघाभर पाण्यात खांद्याला खांदा भिडवून उभे. काहींचे डोळे मिटलेले. काहींच्या हातात ओंजळभर पाणी, उगवत्या सूर्याला अर्घ्य देण्यासाठी. तर काही हात जोडून तसेच मूकपणे उभे. आतल्या त्या अनामिक 'स्व' शी अबोल संवाद साधत.

प्रयागराजच्या कुंभमेळ्याचं हे दृश्य काही आजचं नव्हतं. अनेक शतकांपासून गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वती ह्यांच्या संगमावर प्रयागराजचा हा कुंभ भरतो. लाखो लोक कुणीही न आवताण धाडता ह्या पवित्र संगमाच्या ठिकाणी येतात आणि नदीच्या पात्रात स्नान करतात. भारतात ज्या सनातन परंपरा अखंड सुरू आहेत, त्यातील एक परंपरा म्हणजे कुंभमेळा. पौराणिक कथेनुसार देव आणि दानव ह्यांच्या समुद्रमंथनातून अमृताने भरलेला सुवर्णकुंभ बाहेर निघाला.

दानवांच्या हातात तो कुंभ लागून ते अमर होऊ नयेत म्हणून देव आणि दानवांमध्ये युद्ध झाले. त्या वेळी गरुडाने राक्षसांच्या हाती पडू नये म्हणून अमृतकुंभ आकाशमार्गे दूर नेला. त्या उड्डाणात चार ठिकाणी अमृताचे थेंब कुंभातून हिंदकळून खाली नदीत पडले. एक थेंब हरिद्वारमध्ये गंगा नदीत, दुसरा थेंब उज्जैन येथे क्षिप्रा नदीत, तिसरा थेंब नाशिकला गोदावरी नदीत आणि चौथा थेंब प्रयागराजच्या गंगा, यमुना सरस्वती नद्यांच्या संगमावर पडला. त्यामुळे ही चार स्थळे तीर्थक्षेत्रे म्हणून प्रसिद्ध झाली. या चार ठिकाणी कुंभमेळा भरतो. त्यातही प्रयागराजचा कुंभ खूप प्रसिद्ध आहे. प्रयाग म्हणजे दोन नद्यांच्या संगम. उत्तराखंड मध्ये जिथे गंगेच्या उपनद्या एकमेकींना भेटतात तिथे कर्णप्रयाग, रुद्रप्रयाग इत्यादी संगम प्रसिद्ध आहेत. पण प्रयागराजला गंगा आणि यमुना ह्या दोन मोठ्या नद्या एकमेकींना भेटतात आणि भाविकांची अशी श्रद्धा आहे की शुभ्र प्रवाहाची सरस्वती ही गुप्त रूपाने इथे तिच्या ह्या दोन्ही बहिणींना येऊन मिळते. अश्या ह्या त्रिवेणी संगमावर वसलेले शहर म्हणजे सर्व संगमांचा राजा म्हणून ह्या शहराचे नाव प्रयागराज.

मुघल काळात अकबराने ह्या शहराचे नाव बदलून अलाहाबाद केले होते पण योगी आदित्यनाथ ह्यांच्या सरकारने ते नाव बदलून परत प्रयागराज केले. दर तीन वर्षांनंतर एकदा अश्या पद्धतीने बारा वर्षांतून एकदा उज्जैन, नाशिक, हरिद्वार आणि प्रयागराज या चार वेगवेगळ्या तीर्थक्षेत्री पूर्ण कुंभमेळे भरत असतात. त्याशिवाय दर सहा वर्षांनी हरिद्वार व प्रयागराज येथे अर्धकुंभमेळा भरतो. यंदाचा कुंभमेळा हा १४४ वर्षांत एकदाच होणारा महाकुंभ असल्यामुळे पूर्ण पर्व काळात तब्बल ६५ कोटी लोकांनी कुंभस्नान केले असे उत्तर प्रदेश सरकारचे आकडे आहेत.

कुंभमेळा म्हणजे भक्तांची मांदियाळी. कोणतेही औपचारिक निमंत्रण नसताना देशभरातले हिंदू भाविक या सोहळ्याला उपस्थित राहतात. मिळेल त्या वाहनाने, प्रसंगी पायी लाखो लोक कुंभस्नानाला येतात. शांतपणे आपापले स्नान उरकून आपापल्या गावी परत जातात. इतके मोठे धार्मिक संमेलन जगात दुसरीकडे कुठेच नाही. म्हणूनच युनेस्कोने कुंभमेळ्याला' जागतिक सांस्कृतिक वारसा' म्हणून घोषित केले आहे. प्रयागराजला संगमावर कुंभस्नानाची परंपरा आजची नाही. कॉमन ईराच्या सातव्या शतकात राजा हर्षवर्धनाच्या कारकिर्दीत चिनी प्रवासी हुएनत्सांग भारताच्या प्रवासावर आला होता. आपल्या प्रवासवर्णनात त्याने लिहून ठेवले आहे की 'पोरोग्या' ह्या ठिकाणी दोन नद्यांच्या संगमावर हजारो भाविक आणि साधू पवित्र स्नानासाठी जमले असताना राजा हर्षवर्धनाने त्यांना दान देण्यासाठी म्हणून आपली तिजोरी खाली केली होती. प्रयागराजच्या कुंभमेळ्याचा हा आज ज्ञात असलेला पहिला ऐतिहासिक उल्लेख, पण मेळ्याची आणि संगमस्नानाची परंपरा ह्याहूनही जुनी. कुंभमेळ्याला स्नान करणाऱ्या लोकांची संख्या दर कुंभागणीक वाढतेच आहे. हा महाकुंभ तर सर्वार्थाने एकमेवाद्वितीय होता.

जानेवारीमध्ये मकर संक्रांतीला पहिल्या शाही स्नानाने सुरु झालेला ह्या महाकुंभाची सांगता महाशिवरात्रीच्या महास्नानाने झाली. आठ आठवड्यांच्या ह्या कालावधीत अगदी भारताच्या पंतप्रधानांपासून ते भूतानच्या राजापर्यंत अनेक महनीय व्यक्ती स्नान करून गेल्या. वेगवेगळ्या साधूंचे आखाडे येऊन शाही स्नान करून गेले. त्याशिवाय परदेशी पर्यटक, हिंदू भाविक, शहरी हौशे, नवशे गवशे असे करोडो लोक गेल्या दोन-अडीच महिन्यात प्रयागराजची वारी करून गेले तेही फारश्या दुर्घटना न घडता. योगी आदित्यनाथ ह्यांच्या उत्तरप्रदेश सरकारने मेळ्याची व्यवस्था इतकी उत्तम केली होती की तक्रारीला कुठेच जागा नव्हती. ह्यावर्षीच्या कुंभमेळ्याची सगळ्यात मोठी खासियत होती ती म्हणजे डोळ्यात भरणारी स्वच्छता. पंतप्रधान मोदींच्या लाडक्या स्वच्छ भारत अभियानाचा भाग म्हणून ह्या वर्षीच्या प्रयागराजच्या कुंभमेळ्यात न भूतो अशी स्वच्छता प्रशासनाने ठेवली होती. संगमाजवळ जी मेलासिटी उभारली होती त्यात सरकारने भाविकांच्या निवासासाठी म्हणून चार हजाराहून अधिक तंबू उभारले होते. त्याशिवाय ज्यांना तंबूत राहणं परवडत नाही अश्या लोकांसाठी मोठमोठ्या डॉर्मिटरीज होत्या.

अत्यंत माफक दरात तिथे राहण्या-खाण्याची सोय होती. मेळा परिसरात एक लाख वीस हजाराहून जास्त पोर्टेबल स्वच्छता गृहांची व्यवस्था केली होती त्यातही पुरुष आणि स्त्रियांसाठी वेगळी व्यवस्था होती. स्नान करून आलेल्या स्त्रियांना कपडे बदलायला वेगळ्या चेंजिंग रूम होत्या. जलपोलिसांची नजरेत भरेल अशी गस्त ठिकठिकाणी होती. त्याशिवाय पोलिसांच्या टेहेळणी पथकाच्या जीप्स सगळीकडे फिरत होत्या. माझ्या प्रयागराजच्या तीन दिवसांच्या वास्तव्यात मी एकटीच खूप ठिकाणी भटकले. पण कुठेही मला अजिबात असुरक्षित वाटलं नाही.

एका रात्री मी अशीच नदी किनाऱ्यावर एकटीच फिरताना पोलिसांची एक जीप थांबली. आतल्या पोलिसाने अत्यंत नम्रतेने मला विचारले, ''आप ठीक है ना? आपको कहीं जाना है तो हम छोड देंगे।'' त्या अधिकाऱ्यांचे आभार मानत मी त्याच्याशी थोडा वेळ बोलले. इतकी चांगली व्यवस्था (पान ६ वर)

पान१ वरून

## युरोप, युक्रेन आणि अमेरिकेच्या संघर्षात

सैन्य पाठवण्यास नकार देऊन युरोपीय देशांना हा इशारा दिला होता. त्यांनी जॉर्ज सोरोससारख्या लोकांना हाताशी धरून युक्रेन आणि भूतपूर्व सोव्हिएत देशांमध्ये लोकशाहीवादी क्रांतीतून सत्तांतर घडवून आणून, त्यांच्या माध्यमातून रशियातील पुतीनची राजवट उलथवण्याचा प्रयत्न केला. डोनाल्ड ट्रम्प यांनी त्या धोरणात १८० अंश बदल करून थेट रशियाशीच संधान बांधण्याचा प्रयत्न चालवला आहे. रशिया-युक्रेन वादात रशियाला हवे ते देऊन जर त्याला चीनपासून वेगळे काढता आले, तर ते डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी सर्वांत मोठे यश ठरेल. पण, ज्याप्रकारे झेलेन्स्की यांना अपमानित करण्यात आले, ते पाहता अमेरिकेचा यातून फायदा झाला का तोटा ते पाहावे लागेल.

चीन आणि रशियातील हुकुमशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील मर्यादा आणि मानवाधिकारांचे हनन, यामुळे त्यांच्या तुलनेत अमेरिकेतील लोकशाही आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य जगभरातील लोकांना आकृष्ट करते. पण, चीन असो किंवा रशिया, आपल्या मित्रदेशांच्या पाठी खंबीरपणे उभे राहतात. आज पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय स्तरावर कोणीही उभे करत नसले, तरी पाकिस्तानच्या नेत्यांना शी जिनपिंग आवर्जून भेटतात. अमेरिकेच्या बाबतीत तिचे मित्रदेश असे म्हणू शकत नाहीत. अमेरिका आणि आखाती देशांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असताना, अरब राज्यक्रांत्यांच्या वेळेस अमेरिकेने बघ्याची भूमिका घेतली. युक्रेनला बायडन सरकारने शेकडो अब्ज डॉलर्सची शस्त्रास्त्रे आणि मदत पुरवली. अमेरिका सरकारच्या या प्रयत्नांना तेव्हा विरोधात असलेल्या रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनीही पाठिंबा दिला होता. आता ट्रम्प यांनी भूमिका बदलल्यावर या नेत्यांनीही आपली भूमिका बदलली. ट्रम्प यांनी जे युक्रेनसोबत केले, ते आपल्यासोबतही होऊ शकते, अशी भीती हिंद-प्रशांत महासागरीय क्षेत्रातील फिलीपिन्स, इंडोनेशिया आणि व्हिएतनामसारख्या देशांच्या मनात निर्माण झाल्यास आश्चर्य वाटणार नाही. भारत स्वसंरक्षणासाठी अमेरिकेवर अवलंबून नसला, तरी अमेरिकेच्या नादी लागून आपण चीनसोबत वैर घेऊ शकत नाही, याची पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्रमंत्री डॉ. जयशंकर यांना जाणीव आहे. या घटनांमुळे ती जाणीव दृढ झाली असावी. या घटनांमुळे युरोपला मोठा धक्का बसला आहे. अनेक युरोपीय देशांची अर्थव्यवस्था मंदीच्या विळख्यात आहे. महागाई आणि बेरोजगारी नियंत्रणाबाहेर वाढली असून, बेकायदेशीररित्या स्थलांतरितांचा प्रश्नही उभा आहे. अशा परिस्थितीत देशाच्या संरक्षणावरील खर्च मोठ्या प्रमाणावर वाढवण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. नुकतेच युरोपीय आयुक्तालयाच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डर लेयेन यांच्या नेतृत्त्वाखाली युरोपीय महासंघाच्या २२ देशांचे आयुक्त भारतात येऊन गेले. आज त्यांना भारताचे महत्त्व समजले असून, भारतासोबतचे मतभेद मिटवून संबंध सुधारण्याला त्यांचे प्राधान्य आहे. भारतासाठीही ही मोठी संधी आहे.

## भारताचे 'ब्रह्मास्त्र'

(एसएनएस) आणि 'अनामलस प्रॉपगेशन' (ए/पी) यांसारख्या रडार घटकांसह सुसज्ज आहे. शिवाय, त्याची हस्तक्षेपविरोधी क्षमता, 'ब्रह्मोस'ला एक विश्वासार्ह आणि 'फायर-अ‍ॅण्ड-फॉर्गेट' पल्लूयाचे क्षेपणास्त्र बनवते. चिनी तज्ज्ञांनी 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्राची क्षमता आणि अग्निशक्तीमुळे त्याचे वर्णन, संभाव्य 'आंतरराष्ट्रीय सुरक्षेसाठी समस्या निर्माण करणारे' असे केले आहे. २०२१ साली भारताने, गलवान खोऱ्यातील चकमकीनंतर प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ अर्थात एलएसीजवळ 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र तैनात केले होते. त्यानंतर चीनने याकडे चिथावणीखोर आणि द्विपक्षीय चर्चेतील अडथळा असल्याचा कांगावा केला होता. मात्र, भारताने त्याकडे दुर्लक्ष केले.

'ब्रह्मोस'बद्दल चीनला तीन प्रमुख चिंता आहेत. प्रथम, भारताला फिलीपिन्स आणि इतर आग्नेय आशियाई देशांमध्ये, 'ब्रह्मोस' निर्यात करण्याची परवानगी दिल्याबद्दल चीन रशियावर नाराज आहे. रशिया आपल्या राष्ट्रीय सुरक्षेच्या चिंतांकडे दुर्लक्ष करत असल्याचे चीनला वाटते. दुसरे म्हणजे, 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र दक्षिण-पूर्व आशियामध्ये तैनात केल्याने, दक्षिण चीन समुद्राची स्थिरता धोक्यात येऊ शकते, असे चिनी विद्वानांचे मत आहे. यामुळे या प्रदेशात शस्त्रास्त्रांची स्पर्धा सुरू होऊ शकते आणि सध्या तणावपूर्ण असलेल्या भागांवरून, तणाव आणि संघर्ष वाढू शकतो. तिसरे, किनारपट्टीवरील संरक्षण आणि जहाजविरोधी मोहिमांसाठी, व्हिएतनाममध्ये 'ब्रह्मोस'ची संभाव्य तैनाती चीनसाठी अधिकच त्रासदायक आहे. यामुळे दक्षिण चीन समुद्राच्या पश्चिम भागावर दबाव निर्माण होईल, असे चीनचे मत आहे.

चीनच्या मते, भारत त्याच्या 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र करारांद्वारे अनेक उद्दिष्टे साध्य करत आहे. यामध्ये चीन-भारत संबंधांविरुद्ध मजबूत आघाडी तयार करणे आणि स्वतःला एक प्रमुख आणि विश्वासार्ह शस्त्रास्त्र निर्यातदार म्हणून स्थापित करणे, यांचा समावेश आहे. याशिवाय, भारत आग्नेय आशियातील आपली सागरी भागीदारीही मजबूत करत आहे. असे केल्याने, चीनबरोबरच्या सीमा विवादांच्या बाबतीत भारत, सागरी क्षेत्रात आपल्या नौदलाच्या उपस्थितीचा लाभ घेऊ शकतो. याव्यतिरिक्त, फिलीपिन्स आणि व्हिएतनाम हे देश, भारतीय नौदलाच्या मोहिमांसाठी रिले बेस म्हणून काम करू शकतात. इंडोनेशिया, मलेशिया आणि इतर देशांशी भविष्यातील क्षेपणास्त्र करारांमुळे, जागतिक स्तरावर शस्त्रास्त्र निर्यातदार म्हणून भारताची प्रतिमा आणखी मजबूत होईल. 'ब्रह्मोस' करार हा निश्चितच भारताच्या भविष्यातील शस्त्रास्त्रांच्या विक्रीसाठी एक आदर्श ठरू शकतो. या धोरणामुळे दक्षिण आशियातील चीन आणि त्याच्या शस्त्रास्त्र पुरवठादारांच्या वर्तनात प्रभावीपणे समतोल राखण्यास मदत होईल. अशा परिस्थितीत, दक्षिण पूर्व आशियाई देशांसोबतच्या संरक्षण भागीदारीमुळे, या प्रदेशात भारताची प्रतिष्ठा आणि प्रभाव आणखी वाढेल.

## 'बोफोर्स'च्या तोफेला पुन्हा बत्ती!

आणीबाणीप्रमाणेच 'बोफोर्स' तोफा खरेदीतील लाच प्रकरणाचा कलंक काँग्रेसच्या कपाळावर लागला तो कायमचाच. तसे पाहता, काँग्रेसच्या पांढर्‍या कुर्त्यावर भ्रष्टाचाराचे अनेक डाग यापूर्वीही लागले असून, त्यामुळे हा कुर्ता होळीचे रंग पडल्यागत रंगीबेरंगी झाला आहे. त्यात आता आणखी एका डागाची भर पडल्याने पक्षावर फारसा परिणाम होणार नाही. पण, ही गोष्ट गांधी परिवाराला महाग पडू शकते. कारण, 'काँग्रेस म्हणजे गांधी परिवार' हे समीकरण आता दृढ झाले आहे. तसेच, राजीव गांधी पंतप्रधान असतानाही लाच देण्यात आल्याने त्या पैशाचे खरे लाभार्थी गांधी परिवारच असेल, तिला या नव्या माहितीमुळे दुजोरा मिळेल. 'नॅशनल हेराल्ड' या वृत्तपत्राच्या मालकी खटल्यात राहुल गांधी, सोनिया गांधी, प्रियांका गांधी हे प्रमुख आरोपी असून, ते सध्या जामिनावर तुरुंगाबाहेर आहेत. पण, 'बोफोर्स' तोफांच्या दलालीशी संबंधित प्रकरणात नवी माहिती पुढे आल्यास तिचा राजकीय वापर केला जाईल, यात शंका नाही. त्यामुळे गांधी परिवारावर आणखी एक तलवार टांगती राहील, हे निश्चित!

पर्यटन

ज्योती पुजारी

# वाढदिवस आणि कोकण


समोर पसरलेला अथांग सागर, उसळणाऱ्या लाटा, अस्ताला जाणाऱ्या सूर्याच्या किरणांची सोनेरी आभा सागरलाटांवर पसरलेली. लोहाराच्या भट्टीतून काढल्यासारखा सूर्याचा रसरशीत तांबडा गोळा हळूहळू समुद्रात उतरतो आहे. सूर्यास्त पाहताना वाटलं अस्तही इतका देखणा असू शकतो. अस्त म्हणजे शेवट. सूर्याचा अस्त होत असला, तरी त्याचा उदयही होतोच आणि सूर्योदयही तेवढाच देखणा नयनरम्य असतो.

अस्ताला जाणारा सूर्य मनाला हूरहूर लावून जातो. कोकणातल्या नांदगावच्या सागरकिनारी सूर्यास्त पाहात असलेल्या माझ्या मनात अनेक विचार भरतीच्या लाटांसारखे येत होते. आज माझा वाढदिवस. तो कोकणात साजरा करायचा म्हणून आम्ही कोकणात आलेलो. निसर्ग सौंदर्याची लयलूट असलेल्या कोकणात फिरणं हा एक वेगळाच आनंद आहे. सागरतीरी उभं राहून सूर्योदय आणि सूर्यास्त पाहायला अनेकांना आवडतं; त्या अनेकांपैकी आम्ही आहोत. कोकणातले एक गाव नांदगाव. नांदगावला लाभलेला समुद्राचा सहवास; तसा तर कोकणात कुठेही गेलात तरी समुद्र असतोच सोबतीला. इतर शहर-गाववासीयांना जशी वाहनांच्या कर्कश आवाजाची सवय झालेली असते, तशी, मला वाटत, कोकणवासीयांना समुद्राची गाज सवयीची झाली असणार. कारण कोकणवासींच्या जगण्यात हा समुद्र भरून राहिला आहे.

निसर्गाचा वरदहस्त लाभलेल्या कोकणच्या सान्निध्यात रमायला आवडणारे रसिक कोकणात जायला नेहमीच उत्सुक असतात. मुलांच्या शाळा-कॉलेजला दिवाळीच्या सुट्ट्या लागल्या की, आम्ही कोकणाकडे धाव घेतो. यावेळी कोकणात जाण्याचं निमित्त माझा वाढदिवस हे होते. वाढदिवस कोकणात करायचा असं मुलांनी ठरवलं आणि आम्ही दोघांनी मम म्हणत त्यांच्या बेताला संमती दिली. कोकणात जायचं तर तिथल्या स्थानिक कोकणवासीयाकडे मुक्काम करायचा, हेही ठरलं.

कोकणातली घरं, कोकणी भाषा, त्यांचे खाद्यपदार्थ याबद्दल मला कुतूहल आहे. ते जवळून बघायचं होते. कोकणी घरात शिजणारे तिथले खास पदार्थ जसे तांदळाचे घावण, उकडीचे मोदक याची मजा औरच असणार नं! दरवेळी कोकणात जायचं. समुद्रावर सागरलाटांशी खेळण्याचा आनंद घ्यायचा. मनसोक्त सागर दर्शन आणि लाटांचा खेळ पाहिला तरी मनाला पुन्हा सागर किनाऱ्यावर जाण्याची ओढ लागलेली असायची. म्हणूनच एखाद्या कोकणवासीयाच्या घरात राहायचं ठरवलं. उल्हासचा एक परिचित रोहन देशपांडे; नोकरीमुळे पुण्यात राहात असला, तरी मूळचा कोकणातल्या नांदगावचा राहणारा. त्याच्याकडे होम स्टेची सोय असल्याचं कळले.

आम्ही त्याच्या घरी मुक्काम करायचं ठरवलं.वसंतागमनाच्या सुमारास कोकणात गेलो तर वसंताच्या पाऊलखुणा उमटलेल्या दिसतात. आम्रतरूवर मधुमासाचा मोहर फुललेला असतो. मोहराचा गंध हवेत मिसळलेला असतो. कोकिळेला कंठ फुटलेला असतो. डोळ्यांनी कोकणचा हिरवा गारवा मनात साठवत आम्ही रोहन देशपांडेंच्या घरी पोहोचलो. समोरची खोली, माजघर, देवाची खोली, प्रशस्त स्वयंपाकघर, सुखदायी शय्यागृहे, परसातली माडा-पोफळीची झाडं खास कोकणातलं ते घर पाहून मन प्रसन्न झालं. कोकणातली काही काही घरं माड- पोफळीच्या उंच उंच झाडामध्ये लपंडाव खेळताना एखाद्या चिमुरडीनं दारामागे लपून आम्ही कुठं म्हणावं तशी ही घरे नारळा-सुपारींच्या बागांमध्ये दडून बसलेली असतात. बहुतेक घरांच्या समोरच्या व्हरांड्याला लाकडी जाळी असते आणि बहुतेक घरांच्या परसात आकाशाच्या मांडीवर डोकं ठेवून निवांत झालेले माड वाऱ्याशी हितगूज करीत असतात. देशपांडेंच्या घराच्या परसात बसलो असताना समोर नारळ-सुपारींच्या बागेतील हिरवाई डोळ्यांना शीतल सुखद वाटत होती. समुद्रावरून येणारा वारा बागेतल्या झाडांभोवती पिंगा घालत आम्हाला विंझणवारा घालत होता.



वाऱ्याची शीतल झुळूक अंगाला स्पर्श करून जात होती. जिकडे नजर जाईल तिकडे हिरवा निसर्ग उभा होता. परस ओलांडून पाऊल पुढं टाकायचं तर ते थेट माडा-पोफळीच्या बागेतच जाणार इतकी ती बाग परसाला खेटून होती. परसातली नारळाची झाडं आभाळाची उंची मापायला निघालेली तर घराच्या डाव्या बाजूला सोनचाफा, हिरवा चाफा, मोगरा आपल्या गंधकुप्या वाऱ्यावर उधळायला सज्ज झालेले. या गंध मैफिलीत अबोली जरा एका बाजूला शांत उभी. गंध नसला तरी रंगाचं लेण लाभलेली अबोली त्या सगळ्यात वेगळी वाटत होती. शांत स्तब्धशी. बागेच्या एका कोपऱ्यात खोल विवरासारखी; अथांग पाणी पोटात साठवलेली विहीर ऐसपैस बसलेली.

सगळ्या झाडावेलींची तहान भागवणाऱ्या या विहिरीनं देशपांडेच्या अनेक पिढ्या पाहिल्या असतील. कोकणातले अनेक पावसाळे स्वत:त सामावून घेतले असतील. कोकणातला पाऊस एक वेगळंच प्रकरण आहे. उशाला पर्वतरांगा अन् पायथ्याला समुद्र घेऊन पसरलेल्या कोकणच्या चिंचोळ्या किनारपट्टीत पाऊस भरपूर प्रमाणात. अगदी धो धो पडता पडता पाऊस ही विहीर स्वत:मध्ये सामावून घेत निसर्गातल्या कितीतरी बदलांची ती साक्षीदार राहिली असेल. विहिरीवर रहाट बसवलेला आहे. आपल्याकडे विहिरीला खिराडी बसवतात. कोकणात असतो तो रहाट रहाटगाडगमधला रहाट. खूप दिवसांनी अशी पाण्यानं लबालब भरलेली विहीर पाहिली. विहिरीच्या पाण्यात आकाशाचं प्रतिबिंब पडलेलं होतं. कोकण संस्कृतीला आपलेपणाचा गंध आहे. कोकणची माणसं बोलायला स्पष्ट आणि तिखट असतात असं ऐकलेलं, पण तसा काही अनुभव आला नाही. रोहनची आई, काकू, मावशी सगळी प्रेमळ स्वागतशील आहेत. नव्याचा मुलामा दिलेल्या तरी जुन्याचा हात न सोडलेल्या घरात आम्ही आपल्या घरात वावरत असल्यासारखे वावरलो. जेवणात सोलकढीचा आस्वाद घेतला. इलो कोकण तुमचो असा, अशी कोकण पर्यटनाची जाहिरात केली जाते. आम्ही विदर्भवासीयांनी कोकणाला आपलसं केलं. वाढदिवसाला कोकणचा सागर किनारा साक्षी होता; नारळी, पोफळी फणस, हिरवा चाफा, सोनचाफा हजर होता. रात्री चांदण्यांनी भरलेलं तबक घेऊन गच्चीवरचं आभाळ शुभेच्छा द्यायला सज्ज होतं. जवळच असलेल्या सिद्धिविनायकाचे आशीर्वाद सोबत होते. शांत-निवांत वाटत होतं.

निसर्गात रमण्यासारखा दुसरा आनंद नाही. किनाऱ्यावर आदळणाऱ्या सागरलाटांची गाज ऐकत लाटांचं नर्तन पाहात निवांत बसावं. पौर्णिमेच्या रात्री चंद्राला स्पर्श करू पाहणाऱ्या सागरलाटांचा खेळ पाहावा. पूर्वी वाढदिवसाचं फारसे प्रस्थ नव्हते. आता सर्वांचेच वाढदिवस मनवायला लागले, सेलिब्रेशन व्हायला लागले.

**संस्कृत ही आपली प्राचीन भाषा असून 'देववाणी' म्हणून तिचा गौरव केलो जातो. एवढेच नव्हे तर जगातील भाषांपैकी सर्वात प्राचीन म्हणूनही तिचे स्थान आहे. संस्कृत भाषेतील साहित्य हा भारतीयांचा ऐश्वर्य ठेवा आहे. संस्कृत काव्ये आणि नाटकं, कवी आणि नाटककार यांच्या साहित्यकृतीने भारतीय संस्कृतीला समृद्ध-संपन्न केलेले आहे. संस्कृत नाटककारांमध्ये 'भास' यास 'आदि नाटककार' मानले संस्कृतीला समृद्ध-संपन्न केलेले आहे. संस्कृत नाटककारांमध्ये 'भास' यास 'आदि नाटककार' मानले संस्कृतीला समृद्ध-संपन्न केलेले आहे. संस्कृत नाटककारांमध्ये 'भास' यास 'आदि नाटककार' मानले जाते. त्याची १३ नाटकं प्रसिद्ध आहेत. त्या नाट्यचक्रातील 'प्रतिमा' आणि 'अभिषेक' अशी दोन नाटकं रामकथेवर आधारित आहेत. ही दोन्ही सुखान्त नाटकं रामराज्याभिषेकाने समाप्त होतात. रामायणाचे एक वेगळे साहित्यदर्शन या नाटकातून घडते.**

लेखांक ६१

# प्रतिमा नाटक, अभिषेक नाटक

## आद्य नाटककार 'भास' याची रामकथेवरील दोन नाटकं

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५



संस्कृत भाषेची थोरवी अगाध आहे. संस्कृत विश्वातील सर्वात प्राचीन भाषा असून अनेक भाषांची जननी आहे. संस्कृत काव्यग्रंथ, संस्कृत नाटके यांची स्तुती, प्रशंसा देशोदेशीच्या विद्वान रसिक अभ्यासक व संशोधकांनी केलेली आहे. जर्मन कवी 'गटे', महाकवी कालिदासाचे 'शाकुंतल' ने एवढा वेडा झाला होता की, ते संस्कृत नाटक डोक्यावर घेऊन तो नाचला होता असे म्हणतात. विदेशांमध्ये असे अनेक 'गटे' आहेत की जे संस्कृत काव्य, नाटकांनी, ज्ञान ठेव्याने प्रभावित झालेले आहेत. संस्कृत वर्णमाला जगातील सर्वाधिक वैज्ञानिक आणि शास्त्रीय वर्णमाला आहे. संस्कृतला 'देववाणी' तसेच 'अमरभाषा' म्हटले जाते. संस्कृत भाषेतील 'ऋग्वेद' ग्रंथाला जगातील पहिल्या साहित्यरचनेचा मान आहे. विद्वान अभ्यासक मॅक्समुलर याने महाराणी एलिझाबेथला जगातील पहिला, सर्वाधिक प्राचीन ग्रंथ म्हणून 'ऋग्वेद' चा गौरवाने परिचय करून दिलेला होता. भारतातील सनातन हिंदू, जैन, बौद्ध या धर्मांचे मुख्य धर्मग्रंथ संस्कृत आहेत. संस्कृत साहित्यवर्णन विविधतापूर्ण आहे. जगातील पहिली ज्ञानभाषा म्हणून संस्कृतचा गौरव करावा तेव्हढा थोडा आहे.

संस्कृत काव्य परंपरेप्रमाणे 'संस्कृत नाटकां'ला प्रदीर्घ परंपरा आहे. कवीकुलगुरू कालिदास, बाण, भवभूती, शूद्रक, राजशेखर, विशाखादत्त, हर्षवर्धन या थोर नाटककार परंपरेचा नाटककार 'भास' हा मेरूमणी, शिरोमणी आहे. 'भास'ला संस्कृत नाट्यसृष्टीचा जनक मानले जाते. 'भास' या शब्दाचा अर्थ तेज आहे. तेजोनिधी म्हणूनच सूर्याला 'भास्कर' म्हणतात. हा बंडखोर कवी भास कुठला? त्याचे माता-पिता, गुरू कोण? नेमका कार्यकाळ व स्थळ कोणते? हे सारे प्रश्न इतिहासात आजही अनुत्तरीत आहेत. कोणी त्याला इसवीसन पूर्व काळातील मानतात, तर कोणी चक्क इसवीसनाच्या सातव्या शतकातील मानतात. आश्चर्य म्हणजे इ.स.१९१३ पर्यंत या जगविख्यात आदि नाटककाराचे एकही नाटक-संहिता उपलब्ध नव्हती. कालिदास आदी थोर कवीकुलगुरुंनी 'भास'याची प्रशंसा केलेली होती. त्यामुळे याचे आद्य नाटककार म्हणून नाव सर्व परिचित होते. पण त्याच्या नाटकाच्या संहिता केरळ मधील एका विद्वानास इ.स.१९०९ मध्ये सापडल्या आणि एक अपूर्व ऐतिहासिक अक्षरठेवा साहित्यविश्वाला लाभला.

एवढ्या मोठ्या थोर नाटककारांची नाट्यसंपदा- संहिता, केरळच्या माणसाला कशा सापडल्या त्याची आश्चर्यकारक कथा थक्क करणारी आहे. केरळ मध्ये सांस्कृतिक सोहळ्यामध्ये मेळ्यामध्ये नाटककार भासच्या नाटकातील निवडक अंक 'च्याकर' नावाचे लोककलाकार अनेक वर्षे अनेक पीढ्या सादर करीत होते. पण ही नाटकं 'भास' याची आहेत हे त्यांना ज्ञातच नव्हते. कारण त्या नाटकाच्या संहितावर नाटककाराचे नाव नव्हते.

इ.स.१९१२ साली थोर विद्वान व्यासंगी टी.गणपतीशास्त्री यांना संस्कृत भाषेतील पण मल्याळम् लिपीत लिहिलेली ३०० वर्षे जुनी ताडपत्रे-हस्तलिखिते सापडली. त्या ३०० ताडपत्रामध्ये १३ नाटकाच्या संहिता होत्या. ती अभ्यासल्यावर गणपतीशास्त्रींना ही सर्व नाटकं एकाच नाटककाराची आहे हे लक्षात आले. त्यामध्ये एक नाटक 'स्वप्नवासवदत्ता' होते.

९ व्या शतकातील नाटककार राजशेखर याने 'स्वप्नवासवदत्त' हे 'भास'याचे नाटक असल्याचा उल्लेख केलेला होता. त्यावरून ही सारी सापडलेली १३ नाटके नाटककार भास यांची असल्याचे सिद्ध झाले. आणि एक दुर्मिळ साहित्यठेवा हाती लागला. या अपूर्व कार्याबद्दल टी.गणपतीशास्त्री यांचा जर्मनमधील विद्यापीठाने डॉक्टरेट किताब देऊन गौरव केला. प्रिन्स ऑफ वेल्स यांनी सुवर्णपदक देऊन गौरवले. भारतीय विद्वत परिषदेने त्यांना 'महामहोपाध्याय' पदवीने सन्मानित केले.

भासाची १३ नाटके आहेत. १) स्वप्नवासवदत्ता २) प्रतिमा ३) अभिषेक ४) पंचरात्र ५) मध्यामव्यायोग ६) दूत घटोत्कच ७) कर्णभार ८) दूतवाक्य ९) उरूभंग १०) बालचरित ११) चारूदत्त १२)अविमारक १३) प्रतिज्ञायौगंधरायण यातील नाटकांचा मुख्यविषय 'रामायण', 'महाभारत' कथा आहेत.

या १३ पैकी पाच नाटके एक अंकी आहेत. तेरा पैकी दोन नाटके 'प्रतिमा' आणि 'अभिषेक' ही रामकथेवर आधारित आहेत. 'प्रतिमा' नाटक करूणरस प्रधान सात अंकाचे नाटक आहे तर 'अभिषेक' हे वीररस प्रधान नाटक असून ६ अंक आहेत. 'प्रतिमा' नाटक स्त्रीप्रधान असून माता कैकई त्यातील मुख्य पात्र व विषय आहे. तर 'अभिषेक' नाटकामध्ये तीन राज्याभिषेक आहेत.

पहिला सुग्रीवाचा 'किष्किंधाराज' म्हणून राज्याभिषेक आहे, दुसरा, बिभिषणाचा लंकेच्या राजपदी राज्याभिषेक आहे तर तिसरा आणि मुख्य राज्याभिषेक सोहळा श्रीरामाचा अयोध्येचा राजा म्हणून आहे. 'प्रतिमा' नाटकात रामाचा वनवास ते राज्याभिषेक असा कथा भाग आहे तर 'अभिषेक' नाटक वालीवधापासून सुरू होते व रामराज्याभिषेकाच्या सोहळ्यानी त्या नाटकाचा सुखान्त होतो. दोन्ही नाटके सुखात्मिका आहेत. 'प्रतिमा' नाटकातील भास हा कैकई चा पक्षधर आहे.

कैकई ही कुटिल खलनायिका नसून पती दशरथ आणि सावत्र पुत्र राम या दोघांचे वचनभंगाच्या पापापासून रक्षण करणारी, रामाचे प्राण वाचवणारी विचारी व धाडसी स्त्री आहे. या नाटकाचे मराठीत श्री.द.ग.गोडसे यांनी 'धाडिला राम तिने का वनी' असे नाट्यरूपांतर केलेले प्रसिद्ध आहे.

नाटककार 'भास' हा वत्स राजाच्या उदयन राजाच्या दरबारी कलारत्नांपैकी एक आहे. वत्स राजाची राजधानी कौशांबी येथे त्याचे वास्तव्य होते. 'अग्निमित्र' म्हणूनही 'भास' ओळखला जात होता. थोर कवी जयदेव यांनी भासाचा 'कविता कामिनी' असा गौरव केलेला आहे. तसेच बाणभट्ट, कालिदास अशा सर्व संस्कृत कवी -महाकवींनी 'भास'चा गौरव करीत वंदन केलेले आहे. 'स्वप्नवासवदत्ता' ही भासाची सर्वश्रेष्ठ नाट्यकृती मानली जाते.

॥ जय श्रीराम ॥

# अर्थसंकल्पानंतरची गुंतवणूक

वेधक
चन्द्रशेखर टिळक
भ्र. ९८२०२९२३७६




२८ फेब्रुवारी २०२५ च्या संध्याकाळी आपल्या मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स हा लोकप्रिय निर्देशांक ७३१९८ आहे तर राष्ट्रीय शेअरबाजाराचा निफ्टी हा निर्देशांक २२१२४ आहे. एके काळी सेन्सेक्स १,००,००० च्या पार जाईल अशी चर्चा असताना, अगदी आत्ता आता हा निर्देशांक ८३००० च्या पलिकडे असताना, तो ७३००० च्या थोड्याच वरच्या पातळीवर इतक्या झपाट्याने घसरलेला पाहणे तसे धक्कादायकच असते. पण त्याचे खापर पूर्णपणे १ फेब्रुवारी २०२५ रोजी आर्थिक वर्ष २०२५- २६ सालासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेला सादर केलेल्या अर्थसंकल्पावर फोडणे हे सोयीचे आणि सोपे असले तरी ते सार्थ नाही.

गेली सलग ३९ वर्षे केंद्रीय अर्थसंकल्पाचे मी विश्लेषण करत आहे. १९८८ ते २०२० अशी सलग ३२ वर्षांची माझी व्यावसायिक कारकिर्द मुंबई शेअरबाजार, सेबी, एक दलाली संस्था आणि एनएसडीएल अशी भारतीय भांडवल बाजारातील अग्रगण्य संस्थात घडली आहे. त्या अनुभवाच्या आधारे या विषयाकडे मी बघू इच्छितो. मुळात केंद्रीय अर्थसंकल्प सादर होणे हा अलिकडच्या काळात आपल्या देशात एक Event झाला आहे. मी अनेकदा त्याचे वर्णन अर्थकारणाचा कुंभमेळा असे करतो.

आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम आपल्या देशात अंमलात आणायला सुरुवात झाल्यापासून आता तब्बल ३५ वर्षांचा काळ उलटून गेला आहे. त्यामुळे आता ज्या धोरणाचा अस्तित्वकाळ ( shelf life अशा अर्थाने) फक्त एक वर्षाचा आहे. त्याच्याकडून नेमक्या काय काय आणि किती अपेक्षा ठेवायच्या याला मर्यादा आहेत.

आर्थिक स्वातंत्र्याची ऐन दुपार अपेक्षित असताना एखादा अर्थसंकल्प एखाद्याला काही देईल ही अपेक्षाच एक नागरिक म्हणून स्वतःला दुबळे समजणारी आहे. हे म्हणजे पाश्चिमात्य कादंबरीकार आर्थर कोसलर म्हणतो तसे Darkness at Noon असे झाले. केंद्रीय अर्थसंकल्प हे केंद्र सरकारचे खर्च आणि उत्पन्न ( याच क्रमाने ) नियोजन करणारे साधन आहे.

अर्थव्यवस्था हे त्यातले एक (एकमेव नाही) समीकरण आहे. गिरीश कुबेरी प्रभाव- प्रभावळ- परिणाम याच्या पलीकडे जात विचार करायचा असेल तर लक्षात येईल की गेल्या ३५ वर्षात विविध राजकीय रंगसंगतीची सरकारे- पंतप्रधान- अर्थमंत्री- अगदी रिझर्व्ह बँक गव्हर्नर आपल्या देशात येऊन- होऊन गेले तरी आर्थिक धोरणात फारसा फरक पडलेला नाही.

निदान कोणत्याही आर्थिक धोरणात घुमजाव घडलेले नाही. त्यातून तयार झालेला किंवा शेअर बाजाराने स्वतःच तयार केलेला आकृतीबंध असा आहे. की केंद्रीय अर्थसंकल्प सादर झाल्यावर आपल्या देशाचे निर्देशांक सहसा वाढत नाहीत.

यंदाही तेच झाले आहे. त्या त्या वेळची कारणे एकवेळ वेगवेगळी असतील; परिणाम नाहीत हा आकृतीबंध पुढे चालवणारा असाच यंदाचा अर्थसंकल्प आहे. याबाबत लक्षात घ्यावी लागणारी सर्वकालिक गोष्ट म्हणजे शेअर बाजारात घोषणेवर बदल घडतात; प्रत्यक्ष घटनेवर बाजार स्थिरावतो किंवा खाली येतो. अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी आपल्या देशात सालाबाद प्रमाणे अर्थसंकल्प- पूर्व अपेक्षांची पतंगबाजी होत होती. तेंव्हा बाजार निर्देशांकात बदल होत होते. यातले काही पतंग या अर्थसंकल्पात बदले; अनेक पतंग कापले गेले.

अर्थसंकल्प सादर झाल्यावर आपला शेअरबाजार खाली आला यात अर्थसंकल्पीय तरतूदी हे एक निमित्त आहे; एकमेव कारण नाही. तरीही या अर्थसंकल्पाने अधोरेखित केलेली एक गोष्ट म्हणजे स्थानिक किंवा राष्ट्रीय परिस्थिती लक्षात ठेवत आंतरराष्ट्रीय राजकारण व अर्थकारण याला उत्तर देणारा असा हा अर्थसंकल्प आहे. हे अनेकांना (आपल्या देशात आणि देशाबाहेरही) अनपेक्षित असे आहे. निदान असावे. त्यामुळे काही प्रमाणात जोरकस धक्का जोरकसपणे बसला आहे का याचा विचार केला पाहिजे.

असा विचार करत असताना लक्षात येणारी पाहिली गोष्ट म्हणजे वैयक्तिक आयकरात देण्यात आलेली १२ लाख ७५ रुपये पर्यंतच्या उत्पन्नाची कर न लागण्याची तरतूद ही दुधारी तलवार ठरते आहे. एकीकडे ही सवलत जाहीर झाली आहे. पण त्याची अंमलबजावणी ही १ एप्रिल पासून सुरू होईल. त्यामुळे आजमितीला तरी त्याचा अर्थ भावी उत्पन्नावर भविष्यात सवलत अशी आहे. एका मर्यादित अर्थाने त्याचा फायदा हा आत्ता तरी बाजारात तुरी... असाच आहे. यातला बाजार हा शब्द सर्वार्थाने घेण्यास हरकत नाही. हा पैसा आत्ता हातात आलेला नाही. त्यामुळे ३१ मार्च पर्यंत तो वस्तू- सेवा बाजारातील खरेदीत परिवर्तित होणार नाहीये. त्यामुळे त्यांच्या मागणीत वाढ होत नाहीये याकडे व्यावसायिक जग आणि पर्यायाने शेअरबाजार दुर्लक्ष करू शकत नाहीये.

शेअर बाजार आता खाली येण्याचे हे कारण आहे. याचाच दुसरा अर्थ असा की मार्च २०२५ च्या दुसऱ्या पंधरवड्या पासून शेअर बाजारात सुधारणा होऊ शकते. कारण बाजारात नेहमीच म्हणले जाते की Market always discounts the future. या १२ लाख ७५ हजार रुपयेवाल्या आयकर बदलाचा अजून एक पैलू आवर्जून लक्षात घेण्याजोगा आहे. ही सारी सवलत फक्त नवीन आयकर प्रणाली ( New Income Tax System) तच लागू होणारी आहे.


आयकरात सवलत देणारी म्हणजे Tax Savings Schrmes ला वाव देणारी पद्धतच नवीन आयकर प्रणालीत अस्तित्वातच नाही. त्यामुळे पुढच्या वर्षी म्युच्युअल फंड आणि बँकांच्या Tax Savings schemes येणार नाहीत हे आत्ताच बाजाराने गृहीत धरले आहे आणि असावे. हा निव्वळ अंदाज नाही. ही वस्तुस्थिति आहे.

(पान ६ वर)

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग ३७)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२




रवींद्रनाथ रवींद्रनाथांना आपण एक महान साहित्यिक म्हणून ओळखतो. त्यांनी वाङ्मयाचे सर्व प्रकार हाताळले. परंतु तरी त्यांना असे वाटत होते की, आपल्याला जे जे जाणवते किंवा ज्याची आपण अनुभूती घेतो त्या सर्व गोष्टी केवळ शब्दांच्या माध्यमातून व्यक्त करणे अशक्य आहे. आपल्या मनात असणारे काहीतरी सांगायचे राहून जाते आहे. साहित्याचे सर्व प्रकार हाताळले तरी आपल्याला आपल्या उभ्या आयुष्यात आपल्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सखोल शोध घेता आला नाही अशा प्रकारची भावना त्यांच्या मनात उतारवयात घर करू लागली होती. त्यासाठी दुसरे कुठले तरी माध्यम हवे आणि चित्रकलेच्या रूपाने ते माध्यम त्यांना गवसले. आतापर्यंत शब्दांच्या माध्यमातून वाचकांसमोर चित्र उभे करणारे रवींद्रनाथ आणखी व्यक्त होण्यासाठी चित्रकलेकडे वळले.

रवींद्रनाथानी सुधीन्द्रनाथ दत्त या कवीला लिहिलेल्या एका पत्रात म्हटले आहे, शब्द मला संतुष्ट करत नाहीत. त्यांचे नियम कडक असतात. माझ्या रेषा मात्र त्यांच्या मनाप्रमाणे हसतात. त्या मला सीमित करत नाहीत. आणखी एका ठिकाणी आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणतात, मला वाटते मला इतर सर्व गोष्टींपासून मुक्तता मिळून केवळ चित्रनिर्मिती करता आली असती तर!

आज मनापासून मला चित्रनिर्मितीची उर्मी दाटून आली आहे. तसे पूर्वीपासून चित्रकलेचे त्यांना आकर्षण नव्हते किंवा ज्ञान नव्हते अशातला भाग नव्हता. परंतु त्यांनी ते माध्यम आतापर्यंत हाताळले नव्हते किंवा त्याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले नव्हते. आपल्याला हे जाणून घेतल्यानंतर आश्चर्य वाटते की ते जेव्हा चित्रकलेकडे वळले त्यावेळी त्यांचे वय होते सुमारे ६५ वर्षे. १९२४ च्या काळात त्यांनी चित्रकलेची आराधना करण्यासाठी सुरुवात केली. आणि एवढ्या उशिरा सुरुवात करूनही त्यात त्यांनी किती प्राविण्य मिळवले हे त्यांनीच लिहिलेल्या एका पत्रावरून लक्षात येते. हे पत्र त्यांनी आपल्या सुनेला १९३० मध्ये लिहिले आहे. प्रतिमादेवी या त्यांचा मुलगा रथींद्रनाथ यांची पत्नी. ते तिला लिहिलेल्या पत्रात म्हणतात...

सूनबाई,

इथल्या नॅशनल गॅलरीने माझी पाच चित्रे स्वीकारली आहेत असे मी ऐकले म्हणजे आता ती पोहोचली आहेत चित्रांच्या अमरावतीला त्यांना किमतीची अडचण होती. पैसा नाही. काय करायचे? मी लिहून दिले की मी ती चित्रे जर्मनीला दान केली आहेत. त्यांचे पैसे नकोत. ते खूष झाले. आणखी बऱ्याच ठिकाणाहून प्रदर्शनासाठी मागण्या आल्या आहेत. स्पेनहून एक मागणी आली आहे. त्यांना नोव्हेंबरमध्ये प्रदर्शन हवे आहे. व्हिएन्नालाही हवे आहे. माझ्या कवी नावाने त्यांनी प्रसिद्धी केली आहे. रवींद्रनाथांच्या चित्रांना किती मागणी होती आणि त्यांचा दर्जा किती उच्च होता ते सांगण्यासाठी हे पत्र पुरेसे बोलके आहे. आपले साहित्य मग ते कविता किंवा नाटक असो, ते लिहिताना त्यांना बऱ्याच वेळा खाडाखोड करावी लागत असे.

सौंदर्याची अंगभूत जाण आणि आवड असलेल्या रवींद्रनाथांना ही खाडाखोड डोळ्यांना खूपत असे. मग त्यातून त्या खाडाखोडीला त्यांनी कलात्मक वळण द्यायला सुरुवात केली. त्यातून आपोआप लक्षवेधी आकृत्या निर्माण होऊ लागल्या. शब्दांचे आकार कलात्मक रूप घेऊ लागले त्यांच्या आकारात लय आणि तालबद्धता साधली जाऊ लागली.

रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक वैशिष्ट्य होते. ते म्हणजे जी जी गोष्ट त्यांना करावीशी वाटली, ती ती त्यांनी मनापासून केली. आपण सर्वसामान्य माणसे हाती घेतलेली एखादी गोष्ट मनापासून करत नाही किंवा त्यासाठी कराव्या लागणाऱ्या कष्टांचा कंटाळा आला की ती सोडून देतो. रवींद्रनाथांचे तसे नव्हते. त्यामुळेच हाती घेतलेल्या प्रत्येक गोष्टीला त्यांना न्याय देता आला. त्यामुळेच वयाच्या उत्तरार्धात सुरुवात करूनही ते आधुनिक चित्रकलेचे प्रणेते ठरले.

रवींद्रनाथ चित्रकलेकडे कसे वळले त्याची कथाही मजेशीर आहे. १९२४ मध्ये ते दक्षिण अमेरिकेत गेले होते. तेथील ब्यूनॉस आयर्स या शहरातील वास्तव्यात ते आजारी पडले. तिथे असणारी स्पॅनिश कवयित्री आणि लेखिका व्हिक्टोरिया उकाम्पू ही रवींद्रनाथांच्या साहित्यावर अपार प्रेम करणारी थोर विदुषी होती. त्यांना बरं वाटावे म्हणून ती त्यांना एका मोठ्या सुंदर उद्यानगृहात घेऊन गेली. तेथील सुंदर वातावरणात रवींद्रनाथ रमले आणि त्यांना बरे वाटले. तेथे त्यांच्या काही कविता जन्माला आल्या. त्या 'पूरबी' कविता संग्रहात प्रकाशित झाल्या आहेत. या कविता लिहीत असताना रवींद्रनाथ सहज म्हणून काही चित्रे काढत. ते अशा रेषांची निर्मिती करीत की ज्या रेषा जिवंत होऊन प्राणी, पक्षी आदींचा आकार घेत.

रवींद्रनाथांमध्ये लपलेला चित्रकार या व्हिक्टोरिया नावाच्या या विदुषीने ओळखला आणि त्यांना चित्रे काढण्यासाठी प्रोत्साहन दिले. एका दृष्टीने हे तिचे रवींद्रनाथांवर आणि पर्यायाने भारतावर देखील मोठे उपकार आहेत. 'पुरबी' च्या हस्तलिखितात या कविता आणि चित्रे आहेत. यातील चित्रे म्हणजे केवळ आकृत्या नसून ताल आणि लयीचे नियम सांभाळून निर्माण झालेल्या रचना आहेत. जिवंत भासणारे डोळे, तीक्ष्ण दात, विविध भाव व्यक्त करणारे मानवी चेहरे, नागमोडी वळवळणारे साप, पक्षी अशा विविध प्रकारच्या कलाकृती या हस्तलिखितात आहेत. हे हस्तलिखित म्हणजे रवींद्रनाथांच्या कल्पना आणि प्रतिभाशक्तीचे द्योतक आहे.

या चित्रांमधील प्राणी आणि पक्षी सर्वस्वी वेगळे आणि रवींद्रनाथांच्या कल्पनेतून निर्माण झालेले आहेत. ते वास्तविक जगातील नाहीत. स्वतः रवींद्रनाथ त्यांच्याबद्दल बोलताना म्हणतात, हे प्राणी म्हणजे ज्यांना या जगातील अस्तित्वच नाकारले आहे, त्यांचे नेमस्त अतिशयोक्तीपूर्ण चित्रण असून या रचनांमधील पक्षी म्हणजे केवळ तुमच्या आमच्या स्वप्नात येऊन आपली झोप उडवणारे भयंकर असे जीव आहेत, ज्यांना त्यांचे घरटे आपण अगत्याने बहाल केलेल्या रेषांद्वारे केवळ कॅनव्हासवर आपल्याला प्राप्त होईल. या चित्रांचा संबंध रवींद्रनाथांच्या बालपणीच्या आठवणींशी, अनुभवांशी, स्वप्नांशी आणि अबोध मनाशी निगडित असावा. त्यांना त्यावेळी जाणवलेल्या अतिमानवी गोष्टी या रेषांच्याद्वारे जिवंत झाल्या असाव्यात.

चित्रकलेत अनेक पद्धती असतात, शैली असतात. त्या प्रत्येकातून काहीतरी शिकण्यासारखे असते. अमुक एक पद्धती चांगली आणि दुसरी वाईट अशा प्रकारचे वर्गीकरण यात करणे योग्य नाही. याबाबत रवींद्रनाथांची भूमिका अशी होती की आपल्या परंपरेतील शाश्वत मूल्यांचा वारसा सांभाळावा आणि जीवनाला सन्मुख राहून तो समृद्ध करावा. त्यातूनच त्यांनी चित्रकलेच्या विविध नव्या-जुन्या शैली पाहिल्या, विविध प्रकारांचे निरीक्षण केले आणि त्या समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच त्यांची चित्रकला विषयक जाणीव अधिकाधिक

# ग्रहसंकेत

## (रविवार, ९ मार्च ते शनिवार, १५ मार्च २०२५)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ९ मार्च-** स्वामी युक्तेश्वर पुण्यदिन, श्री दत्त उत्सव कुर्ली, कलंकी केशव प्रकट दिन बेलगाव ता. बार्शी, जानाईदैवी यात्रा दुसाळे ता.पाटण, सातेरीदेवी उत्सव आखली ✻ **सोमवार, १० मार्च-** ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिन, आमलकी एकादशी, हलसिध्दनाथ भंडारा मेतगे, हरिनाम सप्ताह बालिंगे (करवीर), संत शेख महम्मद यात्रा श्रीगोंदा ✻ **मंगळवार, ११ मार्च-** भौमप्रदोष, छ. संभाजीराजे बलिदान दिन, गोविंद द्वादशी वढु बु।।, गोविंदमहाराज जालनापूरकर पुण्यतिथी, कणकेश्वर यात्रा म्हैसाळ (एस.) ता. मिरज जि.सांगली, नीरवी उरूस ता. शिरुर ✻ **बुधवार, १२ मार्च-** यशवंतराव चव्हाण जयंती, श्रीदेवी करंजेश्वरी शिमगोत्सवारंभ गोवळकोट, रेणुकाचार्य जयंती (वीरशैव) ✻ **गुरुवार, १३ मार्च-** हुताशनी पौर्णिमा (होळी), कुलधर्म, जोमकाईदेवी यात्रा उत्तूर, दत्त महाराज कवीश्वर पुण्यतिथी पुणे ✻ **शुक्रवार, १४ मार्च-** धुलिवंदन (करिदिन), मन्वादि, अन्वाधान, रवि मीनेत (पुण्यकाल १२: ४४ ते सुर्यास्त), कुष्णामाई उत्सव, महाबळेश्वर खग्रास चंद्रग्रहण (भारतात दिसणार नाही), चैतन्य जयंती, धुळोबादेव जन्मकाळ घारेवाडी ता. कराड, अंकलाईदेवी यात्रा शेणोली ता. कराड ✻ **शनिवार, १५ मार्च-** वसंतोत्सवारंभ, अभ्यंगस्नान, आम्रकुसूम प्राशन, जागतिक ग्राहक हक्क दिन, सद्गुरू स्मरण उत्सव कोरोची हातकणंगे, मांगीरबाबा, भानोबा, बालोबा यात्रा देहरे

**मुहूर्त:-** ✻ **साखरपुडा-** १२, १५ मार्च ✻ **डोहाळ जेवण-** ९, १० मार्च ✻ **बारसे-** ९, १०, १५ मार्च (१५ नंतर) ✻ **जावळ-** ९, १० मार्च (८ नंतर) ✻ **गृहप्रवेश-** ९, १० मार्च (८ नंतर), १५ मार्च.

### मेष :- नव्या विचारांना चालना

इथेच कमवायचे आहे, इथेच गमवायचे आहे. माणुसकीचं मोल पैशापेक्षा मोठे आहे. मंगळवारी व्ययस्थानी बुध- शुक्राची युती होत आहे. त्यामुळे पुण्याचा संचय व्हावा. पैश्याला फार महत्त्व देऊ नका. आर्थिक स्थिती चांगलीच राहिल. घाईने निर्णय घेऊ नका. नव्या विचारांना चालना मिळेल. नव्या संधीचे स्वागत करावे. उत्साह, धडाडी वाढेल. चिंता कमी होईल. शुभ ता. १०, १२

### वृषभ:- सुख स्वास्थ लाभेल

कडू औषधे आपण लगेच गिळून टाकतो, गोड चॉकलेट हळूहळू खातो. वाईट क्षण विसरा, चांगल्या क्षणांचा आनंद घ्या. लाभस्थानी बुध- शुक्राची युती होत आहे. पैश्या अभावी रेंगाळलेली कामे आता मार्गी लागतील. आत्मविश्वास वाढविणाऱ्या घटना घडतील. सुख स्वास्थ लाभेल. मोजकेच बोलावे. वादाचे प्रसंग टाळावेत. अनावश्यक खर्च नकोच. शुभ ता. ११, १५

### मिथुन:- अडचणी कमी होतील

कुणाला आपला कंटाळा येईल इतकं जवळ जाऊ नये. कर्मस्थानी होणारी बुध- शुक्राची युती कार्यक्षेत्रात शुभ फलदायी आहे. योजलेली कामे मनासारखी होतील. उत्साहाने अपेक्षित यश प्राप्त करता येईल. नव्या संधीचे स्वागत करावे. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. नवे मित्र पारखून घ्यावेत. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. अडचणी कमी होतील. शुभ ता. ९, ११

### कर्क:- कला -गुणांचा विकास

चांगुलपणाचे ओझे वाटेल इतके चांगले वागू नये. आठवा शनि, बारावा मंगळ प्रतिकूल आहे. सर्व व्यवहारात स्वतः आधिक लक्ष घालावे. नोकरी, व्यवसायात विचाराने रहावे. कला-गुणांचा विकास होईल. अपेक्षित घटना परिश्रमातून घडतील. अनावश्यक खर्च टाळावेत. दगदग टाळावी. प्रकृतीच्या तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. शुभ ता. ११

### सिंह:- अपेक्षित संधी लाभतील

कुणाला गरज नसेल आपली, तिथे रेंगाळत राहू नये. अष्टमात बुध- शुक्राची युती होत आहे. जुने येणे वसूल होईल. ज्ञानदान, बॅंक, विमा अशा क्षेत्रात असणार्यांना विशेष अनुकूल कालावधी आहे. सरकारी कामांसाठी अधिक पाठपुरावा करावा लागेल. अपेक्षित संधी लाभतील. नव्या ओळखी वाढतील. भागीदारीच्या व्यवसायात सामंजस्याने रहावे. शुभ ता. ९, ११

### कन्या:- समाधानकारक घटना

नशिबाने जुळते ती नाती जपावी, पण स्वतःहून तोडू नयेत. सप्तमात होणारी बुध- शुक्राची युती समाधानकारक घटना घडविणार आहे. कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक संधी लाभतील. स्पर्धामध्ये यश मिळेल. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. नव्या विचारांना चालना मिळेल. वैद्यकिय, कृषि, मेकॅनिकल क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. उष्णतेपासून त्रास संभवतो. काळजी घ्यावी. शुभ ता. १०, १२

### तुला:- चिंता करू नका

गोड बोलणे, गोड वागणे कुणास आवघड वाटू देऊ नका. राशी समोर हर्षल आहे. त्यामुळे विचारपूर्वक वाटचाल करावी. कला-गुणांना चांगल्या संधी लाभतील. नव्या योजना विचारपूर्वक राबवाव्यात. वादाचे प्रसंग टाळावेत. येणे रक्कम चिकाटीने वसूल करून घ्यावी. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित घटना घडतील. फार चिंता करू नका. शुभ ता. ११, १५

### वृश्चिक:- कामे मनासारखी होतील

जवळपणाचे बंधन होईल, इतके जवळचे होऊच नये. पंचमात बुध- शुक्राची युती होत आहे. त्यामुळे आर्थिक उन्नतीच्या घटना घडतील. स्थावर प्रश्न विचाराने सोडवावेत. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणींवर मात कराल. घरात शुभ कार्ये घडतील. सरकारी कामे मनासारखी होतील. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. ११, १५

### धनु:- सामंजस्याने रहावे

सहजच विसरून जावे, सारे सल मनात जपू नये. सुख स्थानी बुध- शुक्राची युती आहे. सुखस्वास्थ लाभेल. भागीदारीच्या व्यवसायात कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. नव्या विचारांना चालना मिळेल. पोटाच्या तक्रारींची दखल घ्यावी. वादाचे प्रसंग टाळावेत. अपेक्षित संधी लाभतील. विचाराने रहावे. शुभ ता. ११, १२

### मकर:- अपेक्षित घटना घडतील

जीवनात व्यस्त इतके रहा की, पश्चाताप, भीती. दुःख आणि द्वेषासाठी वेळच मिळाला नाही पाहिजे. अंगिकृत कार्यात समाधानकारक यश मिळेल. आर्थिक चिंता राहिली तरी वेळीच मार्ग निघत जाईल. दूरचे प्रवास घडतील. नव्या योजना मार्गी लावता येतील. अपेक्षित घटना घडतील. जामिन कोणास राहू नका. गुंतवणूक विचाराने करावी. शुभ ता. ९, १०

### कुंभ:- सुख स्वास्थ लाभेल

जीवनात नेहमी रिकामा माणूसच, सर्वात जास्त दुःखी असतो. धनस्थानी बुध- शुक्राची युती होत आहे. आर्थिक कामे मनासारखी होतील. सुख स्वास्थ लाभणार आहे. महत्त्वाच्या संधी लाभतील. वैद्यकिय, कृषि क्षेत्रात प्रगती होईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. शुभ ता. ११, १२

### मीन:- प्रगतीच्या संधी

लोकांचं काय, जोवर स्वार्थ आहे, तोवर ते आपलं म्हणतात. स्वार्थ साध्य झाला की, बदनामी करतात. आपल्या राशीतच मंगळवारी बुध- शुक्राची युती होत आहे. त्यामुळे सुख समाधान लाभेल. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. घरातील वातावरण सामंजस्याचे ठेवावे. अनावश्यक खर्च टाळावेत. नव्या कामांना गती देता येईल. प्रगतीच्या संधी लाभतील. शुभ ता. १०, १५

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

## संतांचा सामाजिक संवेदनशीलता...

संतांचा सर्व प्राणिमात्रांविषयी समभाव लहान-मोठा हा भेद न मानता पौर्णिमेचा चंद्र ज्याप्रमाणे सर्वांना सारखीच शांती देतो. अगदी त्याचप्रमाणे परोपकारी उत्तम अथवा अधम हा भाव मनात न आणता दयार्द्र अंतःकरणाने दुःखितांचे दुःखनिवारण करतो. पाण्याचा स्थायिभाव स्वतःचे अस्तित्व नाहीसे करून आपल्या ओलाव्याने सुकू लागलेल्या गवताचे रक्षण करणे आहे. तद्वत सन्मुख आलेल्या पीडितांचे जो रक्षण करतो. कळवळीने श्रमपरिहार करताना जो आपले सर्वस्व देऊनही काहीच दिले नाही, असे मानतो त्यास साधू समजावे. वाहत आलेले पाणी ज्याप्रमाणे वाटेतील खळगे भरल्याशिवाय पुढे जात नाही, तसेच समोर आलेल्या श्रांत, गरजू जीवाला संतोषित केल्याशिवाय तो पुढे जात नाही. संत तुकारामांच्या भूतदया-परोपकाराचे स्वरूपसुद्धा असेच होते. परंतु, त्यांच्या परोपकारी वर्तनाचे मर्म तत्कालीन समाजाला कळले नाही. त्यांच्या भूतदयेचे कोडे लोकांना उमगले नाही. त्यामुळे लोकांनी त्यांना वेड्यात काढले होते. त्याकडे संतांनी कधीही लक्ष दिले नव्हते.

## जर्मनीमध्ये सत्तांतर: पण आव्हाने...

फ्रेडरिक मर्झ यांचे प्रतिस्पर्धी आणि विद्यमान चान्सलर ओलुफ शुल्झ यांनी ताज्या निवडणुकीमध्ये पराभव स्वीकारला आहे. जर्मनीतील चान्सलर पदासाठीच्या या निवडणुकीत विरोधी कॉन्झर्व्हेटिव्ह अलायन्सला २८.५ टक्के मते मिळाली. या आघाडीमध्ये ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन (सीडीयू) आणि ख्रिश्चन सोशल युनियन (सीएसयू) पक्षांचा समावेश आहे. ही युती निवडणुकीत सर्वाधिक मते मिळविणारी आघाडी ठरली. यानंतर 'अल्टरनेटिव्ह फॉर जर्मनी' (एएफडी) हा 'अल्ट्रा राईट पार्टी' म्हणून ओळखला जाणारा पक्ष दुसऱ्या क्रमांकावर राहिला. या पक्षाला २० टक्के मते मिळाली. 'एएफडी' पक्षाची ही आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे तर सत्ताधारी 'सोशल डेमोक्रॅटिक पार्टी'ला (एसपीडी) केवळ १६.५ टक्के मते मिळाली. जर्मन निवडणुकीमध्ये ३० टक्क्यांपेक्षा कमी मते मिळविल्यानंतर कॉन्झर्व्हेटिव्ह नेते फ्रेडरिक मर्झ नवीन युती सरकार स्थापन करणार आहेत. फ्रेडरिक मर्झ हे ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन (सीडीयू) चे नेते आहेत. निवडणुकीदरम्यान मर्झ यांनी संकटग्रस्त अर्थव्यवस्थेला वळण देण्याचे आणि अवैध स्थलांतरितांना जर्मन सीमा बंद करण्याचे आश्वासन दिले. या आश्वासनांची पूर्तता करणे हे त्यांच्यासमोरील सर्वात मोठे आव्हान असेल तसेच त्याची अंमलबजावणी करण्यालादेखील त्यांचे प्राधान्य असेल. मर्झ यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९५५ रोजी रोमन कॅथोलिक कुटुंबामध्ये झाला. १९८९ मध्ये ते पहिल्यांदा संसदेवर निवडून आले. 'ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन' (सीडीयू)मधील अँजेला मर्केल यांचा कालखंड संपल्यानंतर पक्षाची कमान त्यांच्या हातात आली.



### आजीचा बटवा

नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१

# शीतल कलिंगड



रणरणत्या उन्हात कलिंगडाच्या रसासारखे दुसरे काहीच श्रेष्ठ नाही. असे डॉ. जे. एच. कॅलॉग यांनी म्हटले आहे. आयुर्वेदाच्या मते कलिंगड मधूर, मूत्रगामी, शीतकारक, बलवर्धक, तृप्तीकारक, पौष्टिक व पित्तहारक मानले आहे.

कलिंगडाचे आफ्रिका हे मूळ स्थान आहे. सर्वत्र हे लोकप्रिय फळ असून ते वाळू लावलेल्या वेलीवर येते. एक दीड किलोपासून १०-१२ किलो वजनापर्यंत हे फळ असते. मुंबई. पुण्याकडे घागरी एवढ्या आकाराची कलिंगडे मिळतात. काळ्या कवचाची, वाटोळ्या आकाराची, तसेच पांढर्या सालीची, लांबोड्या आकाराची अशा कलिंगडाच्या मुख्य दोन जाती असल्या तरी आता कलिंगडाच्या विविध जाती तयार केल्या आहेत. शुगर बेटी नावाची जात सर्वत्र आढळते.

**विविध भाषी नावे:-**

कलिंगडास संस्कृत- कालिंग, कृष्णवीच, रक्तबीज, मांसफळ आदी नावे आहेत. हिंदीत- तरबूज, गुजराथीत- तडबूज, लॅटिन - सिट्युलस, लानाडुस, इंग्रजीत- वॉटर मेलन अशी नावे आहेत.

कलिंगड - थंड असून कोवळ्या कलिंगडाची भाजी करतात. कच्चे कलिंगड शीतल, मधूर, तृप्तीकर पुष्टीकर, मलस्तंभक, कफकारक आहे. पिकलेले उष्ण, मधूर, वात, कफ नाशक आहे. पान कडू, रक्त वृध्दीकारक आहे.

कलिंगडामध्ये पाणी-९५.७ टक्के, प्रोटीन- ०.१ टक्के, चरबी ०.२ टक्के. कार्बोदित पदार्थ ३. ८, कॅल्शियम- ०.१. फॉस्फरस ०.0१ टक्के, लोह ०.२ मि. ग्रॅम असते तसेच नियासिन बी १. इत्यादी जीवनसत्वे असतात.

कलिंगड चावून खाता येते तसेच त्याचा रस काढूनही पिता येतो. रसाच्या स्वरूपात ते अधिक प्रमाणात सेवन करता येते आणि त्यामुळे त्याद्वारे शरीराला अधिक पोषक घटक मिळू शकतात.

कलिंगडाच्या रसाने पोटातील अनेक व्याधीमध्ये आराम मिळतो. पोटातील दाह कमी होतो. या फळात मूत्रगामी गूण असल्याने मूत्रपिंड आणि मूत्राशयाच्या रोगामध्ये हे फळ गुणक आहे. या फळांचा मुख्य उपयोग शरीराला व मनाला थंडावा व सुस्थिर करून देण्यासाठी कलिंगडाच्या रसाने शरीरामध्ये असणार्या नवनिर्मितीच्या क्रियेला गती प्राप्त होते.

**औषधी उपयोग:-**

कलिंगडाच्या बियांचा गर वाटून तो गर मगज ५ ग्रॅम, खडीसाखर ५ ग्रॅम एकत्र करू खावा. उन्हाळ्यावर कलिंगडाच्या रसात जिरे, खडीसाखरेचे चूर्ण घालून द्यावे, कलिंगड फार खाण्याने बुद्धिनाश होतो. यावरून कलिंगडाला कुमतिगामी असेही म्हटले आहे. कोरड्या खोकल्यावर कलिंगड खाणे हितकारक आहे.

कलिंगड मूत्रज असल्याने विकृत कफाला मूत्राद्वारे बाहेर फेकते. श्वास व खोकला याची वृद्धि करीत नाही.

वाळंवटी प्रदेशात कलिंगडाचे पाणी लोक मोठ्या आवडीने पितात. या रसाने थकवा दूर होतो. दात नसलेल्या बालकापासून ते दात नसलेल्या वृद्धापर्यंत सर्वांना आवडीचे व सहज खाता येणारे हे फळ आहे. या फळामुळे पोटातील कृमी नष्ट होतात.

कलिंगडाचा गर उशीरा पचतो. त्याचा रस मात्र लवकर पचतो. चर्मरोग, खाज यावर कलिंगडाचा रस चोळावा व नंतर तो शरीराचा भाग धुवून टाकावा. केसामध्ये उवा झाल्यास कलिंगडाचा रस केसांना चोळावा. नंतर केस स्वच्छ धुवावेत. सर्व उवा मरून जातात. कलिंगडाचे उन्हाळ्यात मोठे महत्व आहे.

पान ५ वरून

## अर्थसंकल्पानंतरची गुंतवणूक

हातच्या कांकाणाला आरसा कशाला असे हे आहे. अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख आहे की गेल्या वर्षी भरल्या गेलेल्या आयकर विवरण पत्रकात ( Income Tax Returns) निम्म्याहून जास्त करदात्यांनी नवीन आयकर पद्धतीनुसार विवरणपत्र भरले आहे. अर्थसंकल्पीय भाषणात असाही उल्लेख आहे की सध्या सुरू असलेल्या आर्थिक वर्षासाठी (२०२४-२५) विवरण पत्र भरताना या प्रमाणात वाढ (M) होईल असे आजचे चित्र आहे. हे चित्र खरे आहे हे आपण पाहत आहोतच. करविषयक सवलती देणाऱ्या गुंतवणूक साधनात पैसे गोळा करण्याचा सुगीचा काळ डिसेंबर-जानेवारी- फेब्रुवारी हे महिने आहेत. यावर्षीच्या या तीन महिन्यात गेल्या कित्येक वर्षांच्या तुलनेत म्युच्युअल फंड आणि बँका यांच्या Tax Savings schemes सगळ्यात कमी आल्या हे आवर्जून लक्षात घेण्याजोगे आहे.

त्याचा परिणाम असा आहे की अशा योजनेतून गोळा केलेला पैसा त्यानंतर विशिष्ट काळात शेअर बाजारासहीत विविध साधनात गुंतवला जातो. (अगदी दोन दिवसांपूर्वी आपल्या देशाच्या भांडवल बाजार नियंत्रक असणाऱ्या सेबी या संस्थेने संबंधित नियमात बदल करत असे जाहीर केले आहे की यापुढे किंवा यानंतर म्युच्युअल फंडांनी New Fund Offers च्या माध्यमातून गोळा केलेला सर्वच्या सर्व पैसा ३० दिवसात संबंधित साधनात गुंतवलाच पाहजे.) जानेवारी फेब्रुवारी २०२५ या महिन्यात अशा गुंतवणुकीची प्रक्रिया पार थंडावलेली राहण्यातून शेअर बाजार कोसळला आहे. कारण अशी खरेदी न होण्यातून विदेशी वित्तसंस्थांची विक्री जास्त विपरीत परिणाम जाणवून देत राहिली. हा मुद्दा लक्षात घेताना अजून एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की विदेशी वित्तसंस्था (आपल्या प्रचलित- सराईत- लोकप्रिय भाषेत सांगायचे तर FIIs) आपल्या देशाच्या शेअर बाजारात शेअर्सची विक्री करत आहेत हे निर्विवाद सत्य आहे. पण त्याचे संपूर्ण खापर केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ या घटनेवर फोडता येईल अशी वस्तुस्थिती नाही. मुळात याचवर्षी नव्हे तर कोणत्याही काळात साधारणपणे २५ नोव्हेंबर ते ५ जानेवारी या एक- दीड महिन्यांच्या काळात विदेशी वित्तसंस्थांचा विक्रीचा वेग- आवेग वाढलेला असतो हा अनेक वर्षांचा इतिहास आहे. त्याचे कारण त्यांचे आर्थिक वर्ष जानेवारी ते डिसेंबर असे असल्याने त्यांच्या वार्षिक हिशोबात नफा दाखवणे अत्यावश्यक असते. (नफारूपी विक्रीचे तंत्र या घीसापीट्या शब्द प्रयोगाचा हाही एक अर्थ आहे.) एरवी त्यांचा हा प्रभाव कमी जाणवतो. कारण याच काळात आपल्या देशातील स्थानिक वित्तसंस्था त्यांच्या Tax Savings schemes च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर पैसा गोळा करत असत. हे पैसे बाजारात येत असत. यावेळी विदेशी वित्तसंस्थांनी विक्री तर केली; पण समोरून त्या प्रमाणात स्थानिक वित्तसंस्थांची नवीन खरेदी तर आली नाही. यावेळी केवळ tax Savings schemes आल्या नाहीत असे नव्हे तर mutual fund चे New Fund offers ही या काळात थंडावल्या हेही इथे नक्कीच लक्षात घेण्याजोग आहे. हा यावेळच्या शेअर बाजार घसरणीचा खरा अर्थ किंवा कारणमीमांसा आहे.

विदेशी वित्तसंस्थांनी भारतीय शेअरबाजारात विक्रमी विक्री केली असा डांगोरा पिटला जातो आहे. आकडेवारीच्या प्रमाणावर तो खराही आहे. पण त्याची ही संख्यात्मक बाजू मांडली जात असताना त्याची दर्जात्मक बाजूही लक्षात घेतली पाहिजे. विदेशी वित्तसंस्था शेअर बाजारात ज्या प्रमाणात विक्री करत आहेत. त्या प्रमाणात आपल्या देशाच्या परकीय चलनाच्या साठ्यात (Foerign Exchange Reserves ) घट होत नाहीये हे कोणीही लक्षात का घेत नाहीये? मुळात परकीय चलनाच्या साठ्याचा प्रमाणात अशी घट झालीही नाहीये. यात केवळ निर्यातीचा वाटा नाहीये. याचा खरा अर्थ असा आहे की शेअरबाजारात शेअर्स विकून ज्या प्रमाणात विदेशी वित्तसंस्था पैसे गोळा





करत आहेत. तो सगळाच पैसा ते आपल्या देशाबाहेर नेत नाहीयेत असा आहे. यातला काही पैसा तरी आपाल्या देशातील गुंतवणुकीच्या इतर संस्थात आणि साधनात गुंतवला जातो आहे. व्याजरूपी नियमीत उत्पन्न देणाऱ्या साधनांकडे असा पैसा काही प्रमाणात तरी वळतो आहे. अमेरिकी वित्तसंस्था शेअर्स विकत असतील तर अमेरिकी वित्तसंस्थासहीत इतर काही देशातील (ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, कोरिया, इंडोनेशिया) विदेशी वित्तसंस्था आपल्या देशातील अशा Fixed Income Securities मध्ये काही प्रमाणात तरी पैसे गुंतवत आहेत. गेल्या सात महिन्यात (योगायोगाने मोदी सरकारचा तिसरा कालखंड आहे हा) आपल्या देशातील सरकारी व काही व्यावसायिक कंपन्यांच्या कर्जरोख्यांचा आपल्या देशाच्या आर्थिक इतिहासात पहिल्यांदाच एकापेक्षा जास्त जागतिक कर्जरोखे निर्देशांकात समावेश झाला आहे.

आता तुमच्या- माझ्यासारख्या सर्वसामान्य भारतीय गुंतवणूकदारांनी, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी, सेवानिवृत्ती स्वीकारलेल्यानी, स्वयं- रोजगारीत मंडळींनी, काही प्रमाणात तरी या गुंतवणूक साधानांकडे वळावे म्हणून तर यंदाच्या अर्थसंकल्पात व्याजापासून मिळणाऱ्या उत्पन्नावरील TDS ची मर्यादा वाढवण्यात आलेली नाही ना? अगदी लांबचा आणि वेगळा विचार करायचा तर अशाच उद्देशाने विमा क्षेत्रात १०० टक्के विदेशी गुंतवणुकीला यंदाच्या अर्थसंकल्पात मुभा देण्यात आली असावी का? विमा कंपन्यां वृत्तीने आणि सवयीने आणि व्यावसायिक गरजेने दीर्घकालीन गुंतवणूक आणि ठराविक उत्पन्न साधनात गुंतवणूक करतात हा योगायोग नसतो. या दोन्ही अर्थाने वॉरेन बफे झिंदाबाद असे म्हणावे लागेल. त्यांच्या टाळेबंदात ते विक्रमी रक्कम रोकड स्वरूपात सांभाळून आहेत आणि भारताकडे माझे लक्ष आहे असेही ते म्हणतात याकडे लक्ष ठेवावं लागेल. याच काळात आयुर्विमा योजनेत आरोग्य विमा काही प्रमाणात असला पाहिजे असा आग्रह विमा क्षेत्राची नियंत्रक संस्था धरते हा योगायोग नसतो. येणाऱ्या काळात आजही प्रामुख्याने सरकारी कंपनी असणारे आयुर्विमा महामंडळ (एलआयसी) सरकारी क्षेत्रातीलच सर्वसाधारण विमा कंपन्या पूर्णपणे किंवा काही प्रमाणात खरेदी करेल असा तर त्याचा अर्थ...

यंदाचा अर्थसंकल्प आणि आपले गुंतवणूक क्षेत्र असा विचार करायचा झाला तर स्थानिक क्षमता आणि सामर्थ्य यांचे मूल्यमापन करत आंतरराष्ट्रीय अर्थकारण व राजकारण याला न बोलता उत्तर देण्याचा जोरदार व जोमदार प्रयत्न केला आहे. यावेळी केलेल्या माझ्या अर्थसंकल्पीय भाषणात मी म्हणल्या प्रमाणे यंदाच्या ७२ मिनिटांच्या अर्थसंकल्पीय भाषणांच्या मसुद्यात ज्यांचा उल्लेख आहे त्या गोष्टी तर महत्वाच्या आहेतच; पण ज्यांचा उल्लेख नाही अशाही संरक्षण, तेल, सोने, कोळसा, निर्गुणत्वाणुकीकरण ( Disinvestments ), डॉलर मूल्य, सिक्युरिटीज transactions tax , शॉर्ट टर्म कॅपिटल गेन टॅक्स, लाँग टर्म कॅपिटल गेन टॅक्स या गोष्टीही महत्वाच्या आहेत.

पान ४ वरून

## जनांचा प्रवाहो चालिला...



तर तो हसून म्हणाला, ''मैं सतरा साल से पुलीस में हूँ, इससे पेहले भी मैंने मेला व्यवस्था में काम किया है, लेकीन इस बार जैसी व्यवस्था है, हमने भी आजतक नही देखीं।'' त्याचा निरोप घेऊन मी नदीकिनारी होडया लावलेल्या होत्या, त्यातल्या एका होडीवर निवांत, स्तब्ध बसून राहिले.

माझ्या अगदी पायाशी यमुनेचा शांत प्रवाह आवाज न करता वाहत होता. पलीकडच्या किनाऱ्यावर प्रयागराजच्या किल्ल्याची मजबूत तटबंदी होती. दूर उजवीकडे संगमावर अजूनही लोकांची वर्दळ दिसत होती, पण मी जिथे होते त्या ठिकाणी मात्र शांतता होती.

खालून वाहणाऱ्या यमुनेच्या प्रवाहाकडे बघता बघता माझ्या मनात विचार आला- कितीक काळ ही नदी अशीच वाहतेय, माझ्या देशाच्या संस्कृतीसारखी नित्यनूतन तरीही चिरंतन. आपण असू नसू पण गंगा, यमुना मात्र अशाच अविरत वाहत राहतील आणि त्यांच्याचप्रमाणे लाखो-करोडो भारतीयांच्या भक्तीचा प्रवाहही!

# मूल्ये असावीत सांगाती !

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २५७

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

आपली जीवनमूल्ये आणि आपल्या कृती यांच्यात मेळ घालणे नेहमी जमतेच असे नाही. प्रसंगोपात्त आपल्याला मूल्यांना मुरड घालावी लागते आणि पुढे पाऊल टाकावे लागते. बरेचदा स्वत:साठी काय महत्वाचे आहे, काय अर्थपूर्ण आहे याचाच गोंधळ मनात असतो आणि त्यामुळे एकाचवेळी बरंच काही करावेसे वाटते आणि प्राधान्यक्रम ठरविताना गाडी अडते. लेजेयून आणि लुओमा यांनी २०१९ साली ही गल्लत अधोरेखित केली.

आपल्या व्यक्तिगत आणि व्यावसायिक जीवनात नीतिमूल्यांना अतिशय मानाचे स्थान असते/असावे. काय साधायचंय आणि वाटेत अडथळे आले तरी मार्ग सोडता काम नये हे स्वत:ला बजावणे यासाठी मूल्ये मानाची असतात. तेव्हा मूल्ये म्हणजे काय हे ठरविता आले पाहिजे आणि त्यासाठी काही मार्गदर्शक तत्वे असावीत -

(१) शब्दांपेक्षा वर्तनाला अधिक महत्व- यावरून आपली वाटचाल ठरते.
(२) इतरांच्या प्रभावाचा, मतमतांतराचा किंवा नैतिक वर्तनाचे मानदंड यांचा विचार न करणे
(३) फक्त जीवनहेतू साध्य हा डोळ्यांसमोरचा मर्यादित विचार नसावा तर सदिश प्रयत्न असावेत.

**(अ) नीतिमूल्ये आणि जीवनहेतू -**

स्वत:च्या महत्वाकांक्षा, उत्कट स्वभावविशेष आणि व्यक्तिगत मूल्ये यांची सांगड घालण्यासाठी हा उपक्रम चांगला आहे.

**या प्रक्रियेतील महत्वाचे प्रश्न-**

(१) आयुष्यातील सर्वात महत्वाचे काय?
(२) आयुष्याला अर्थ कशाने येतो?
(३) आनंद, समाधान, कृतार्थता कशाने वाटते?

यावरून आयुष्यातील महत्वाचे कप्पे अधोरेखित करता आले तर मूल्यांचे आपल्या कृतींमधील स्थान पक्के होते.

**कृती आराखडा क्र. १**

पहिला टप्पा- मूल्यांचे प्रतिबिंब

✻ तुमच्यासाठी काय महत्वाचे आहे?
(१) इतरांना तुम्ही कसे दिसता ?
(२) तुमचे आयुष्य कशाचे प्रतीक आहे?
✻ तुमच्या मते कशामुळे आयुष्याला अर्थ प्राप्त होतो?



(१) कशामुळे तुम्हाला उर्जावान वाटते?
(२) कशाचा पाठपुरावा तुम्हाला करण्याजोगा वाटतो?

**✻ कोणत्या गोष्टी तुम्हाला आनंदी, समाधानी आणि कृतार्थ करतात?**

(१) तुम्हाला काय करावेसे वाटत असते?
(२) ते कसे करावे याबाबत मनात काय विचार असतात?

**दुसरा टप्पा- मूलभूत नीतिमूल्ये**

खालील आयुष्याचे काही कप्पे नमूद केलेले आहेत. त्यातील तुमच्या दृष्टीने सर्वात महत्वाचे असे कोणतेही तीन निवडा आणि त्याबद्दल तुमच्या मनातील विचार संक्षिप्तपणे नोंदवा-

(१) विवाह/दांपत्य (उदा. निष्ठा)
(२) पालकत्व (उदा. हळुवारपणा)
(३) कुटुंब (उदा. नातेबंध)
(४) मित्र/सामाजिक जीवन (उदा. इमान, सचोटी)
(५) काम (उदा. प्रामाणिकपणा)
(६) शिक्षण/प्रशिक्षण (उदा. ज्ञान)
(७) मौज /विसावा (उदा. खेळ, सहल)
(८) अध्यात्म (उदा. पावित्र्य)
(९) नागरीकत्व (उदा. पर्यावरण जागरूकता)
(१०) स्वत:ची काळजी- निद्रा, आहार, व्यायाम (उदा.आत्मशांती)

**तिसरा टप्पा- दैनंदिन मूल्ये**

किमान तीन मूल्ये सोदाहरण लिहा आणि त्यांचे दैनंदिन जीवनात पडणारे प्रतिबिंब रेखाटा-

मूल्य क्रमांक एक - (विधान)
उदाहरण-
मूल्य क्रमांक दोन - (विधान)
उदाहरण-
मूल्य क्रमांक तीन- (विधान)
उदाहरण-

अंतिम टप्पा - मूल्याधिष्ठित जीवनहेतू

आपली नीतीमूल्ये आणि आपले जीवनहेतू यांची जोड

वरील तिन्ही टप्प्यांवर आधारीत खालील विधाने करा-

**मूल्य क्रमांक १-**
✻ उद्दिष्ट्य -
**मूल्य क्रमांक २-**
✻ उद्दिष्ट्य -
मूल्य क्रमांक ३-
✻ उद्दिष्ट्य -

**कृती आराखडा क्र २**

**स्वेच्छा, उद्दिष्ट्ये आणि कार्यवाही**

**इथे मार्गात काही अडथळे संभवतात-**

(१) अपयशाचे भय
(२) अनिश्चिततेचे सावट
(३) अति महत्वाकांक्षेच्या आड येणाऱ्या समस्या

**व्यावहारिक नियोजन करायचे असेल तर खालील मुद्दे सुस्पष्ट असावेत-**

१) माझे ध्येय काय? (शक्य तितक्या स्पष्टीकरणासह एक विधान लिहावे. अशी अनेक उद्दिष्ट्ये असू शकतात, पण जास्तीत जास्त पाच आणि कमीत कमी तीन असावीत)
२) कोणत्या निष्ठा या ध्येयाच्या समर्थनार्थ लिहिता येतील? उदा- प्रेम, न्याय, सचोटी, शिक्षण इ.
३) या ध्येयाच्या पूर्तीसाठी काय कृती करण्याचे नियोजन केलेले आहे?
४) या ध्येयपूर्तीच्या प्रसंगी कोणते विचार मनात घोळताहेत, भावना काय आहेत, संवेदना/जाणिवा काय आहेत?
५) अडचणींच्या वेळी मनात नेमके काय विचार/भावना येतील?
६) आवश्यकतेनुसार आपल्या ध्येयाचे वर्गीकरण करण्याची तयारी आणि पद्धती
७) प्रारंभ बिंदू कोणता असेल? त्याची सुरुवात केव्हा असेल?

**कृती आराखडा क्र ३**

**स्वत:ची उद्दिष्ट्ये, हेतू अधोरेखित करणारे संक्षिप्त विधान**

असे विधान केवळ व्यवसायांसाठी किंवा गैर-सरकारी संस्थांनाच लागू पडते असे नसून तितकेच ते व्यक्तींशीही संबंधित असते.

आपले जीवन योग्य मार्गावर आहे की नाही हे चाचपून बघण्यासाठी आणि काय साध्य करावयाचे आहे यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी असे विधान उपयुक्त ठरते. दुर्दैवाने बऱ्याच जणांना आपला भावी मार्ग कसा आहे, बरोबर आहे कां याचे ज्ञान नसते. त्यांना खालील प्रश्नांची उत्तरे देता आली तर वाटचाल सुकर होते.

(अ) माझ्यासाठी महत्वाचे काय? माझे प्राधान्यक्रम काय आहेत?
(आ) मला सर्वात जास्त काय भावते?
(इ) मला कशाचे उत्कट आकर्षण वाटते?
(ई) व्यक्तिगत आणि व्यावसायिक पातळीवर काही लक्षणीय ध्येय आहे कां?
(उ) माझी समाजात काय ओळख आहे- नातेबंध, कर्तृत्व, कारकिर्दीचे पैलू?
(ऊ) माझ्या मित्रांच्या, स्वजनांच्या आणि सहकाऱ्यांच्या मते माझे सगळ्यात मोठे बलस्थान कोणते?
(ए) कोणता वारसा मागे ठेवून जायला तुम्हांला आवडेल? तुमची कोणती अंगीभूत कौशल्ये त्यासाठी मदतीला येतील?


वरील उत्तरांचा उपयोग करून खाली दिल्याप्रमाणे स्वत:चे ध्येय/उद्दिष्ट्ये यांचा समावेश असलेले विधान लिहिता येईल-

मानसशास्त्रात रस असलेल्या समूहासाठी शास्त्रशुद्ध शिक्षण देणारे आणि त्याचा दैनंदिन जीवनात वापर करता येऊ शकणारे पॉडकास्ट तयार करून मी समाजाला मंत्रमुग्ध करीन.

फॉरसिथ आणि एइफर्ट यांनी २०१६ च्या त्यांच्या संशोधनात असं सप्रमाण सिद्ध केलं की जीवनात खराखुरा आनंद असावा यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करता यावी म्हणून दोनच गोष्टी जाणून घेणे महत्वाचे असते-

तुमच्यासाठी सर्वात महत्वाचे काय आणि ते रोजच्या जीवनाचा भाग बनण्यासाठी तुम्ही कोणते मार्ग शोधून काढता?

मूल्याधिष्ठित निर्णय आणि जीवनहेतूंनी प्रेरित जगणे यांच्या मदतीने आपण जीवन अर्थपूर्ण करू शकतो. हे अर्थातच व्यक्तिगत असते कारण हा जीवन जगण्याचा, वर्तनाचा आणि अस्तित्वाचा पाया असतो, तो जितका सखोल, तितकी इमारत ताकदवर. रोजच्या धावपळीतील क्लिष्टता हाताळून त्याजागी सकारात्मकता आणायची असेल तर मूल्याधिष्ठित जगण्याला पर्याय नाही.



# वारी एक परमानंद ॥ (भाग-५०)

साधता संवाद
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८



संसारातील अशाश्वत किंवा नाशिवंत क्षणिक सुखाच्याही पलीकडे अशाश्वत किंवा अविनाशी परम सुख असतं. संसारी सुखात काही काळ देह (इंद्रिये)सुखी होत असेलही पण अंतः करण सुखी होण्यासाठी आत्मिक (परम) सुखी होण्यासाठी वारीसारखं दुसरं माध्यमच नाही असं माझं मत नव्हे ठाम विश्वास आहे. वारीत या परम सुखाचे सामुहिक वाटप होते, आणि त्या सोहळ्याचे आपणही वाटेकरी आहोत, विठ्ठल कृपेस किंवा संत कृपेस आपणही पात्र आहोत ही कल्पनाच मुळात परमानंद देणारी आहे. आत्मिक सुख हेच परम सुख आहे. आणि ते वारी शिवाय इतरत्र कुठे आहे हे समजून प्रयत्न करणे म्हणजे मृगजळाच्या मागे लागण्या सारखे आहे असे वाटते. वारीमध्ये या परम सुखाची मुक्तहस्ते उधळण परब्रह्म परमात्मा पांडुरंग करत असतो. म्हणून तर आषाढी कार्तिकीला देश विदेशातून लाखो लोक वारीला येतात. याचा नुकताच आत्मानुभव आळंदी वारीत आला. त्याचं वर्णन या लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे.

गेल्या चार वर्षांपासून ज्ञानेश्वरी वाचन उपक्रमांतर्गत प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानेश्वरीचे वाचक रोज तीनशे ओव्या वाचन याप्रमाणे एक महिन्याचे ज्ञानेश्वरीचे पारायण करत असतात. आणि त्याची सांगता एखाद्या मंदिरात किंवा कोणी इच्छुक असेल तर त्यांच्या घरी केली जाते. माऊलींच्या कृपेने या उपक्रमाला वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. सहा वाचकांपासून सुरू झालेला हा प्रवास! या प्रवासात आता जवळ जवळ पावने दोनशे वाचक सहभागी झाले आहेत. याचा मनस्वी आनंद आहे. आठवं ज्ञानेश्वरी पारायण पूर्ण झालं. काही जणांच्या मते या पारायणाची सांगता आळंदीला करावी. मी हा विचार वाचकांसमोर मांडला आणि त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. वारीच्या प्रवासातील पहिलाच अनुभव अतिशय सुखद होता. हरिनामाच्या गजरात ही वारी निघाली. दुपारी दीड वाजता आळंदीला माहेश्वरी धर्मशाळेत सर्वांनी भोजन केलं आणि देहूकडे रवाना झालो. सर्वप्रथम जगद्गुरुंच्या रहत्या वाड्यात असलेल्या विठ्ठलाचं दर्शन घेतलं समोर ओसरीवर सर्वजण बसले. अतिशय प्रसन्न वाटत होतं. प्रवासाचा थकवा कुणाला यत्किंचितही जाणवत नव्हता. उलट तुकोबांच्या भेटीने सर्वांचे मन प्रफुल्लित झाले होते. तिथे मला अभंग म्हणण्याचा मोह आवरला नाही. मी लागे आम्हा ध्यान। आता माऊलींचे।। आणि तुकोबांचे वेड मनी।। हा अभंग गायला. वातावरण भक्तिमय झालं. आणि तिथून आम्ही तुकोबांचे मुख्य मंदिर पाहण्यास निघालो. जमेल तसं सर्वांना मी माहिती सांगत होतो. सर्वजण ती एकाग्रतेने श्रवण करत होते. पुढे तुकोबांचे वैकुंठ गमन ठिकाण पाहिले. नंतर आम्ही सर्वजण गाथा मंदिर पाहाण्यास निघालो. वयस्कर असूनही सर्वजण दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करत होते. गाथा मंदिर पाहिल्यानंतर उशीर झाल्याने सिध्द बेटचा कार्यक्रम रद्द करावा लागला. कारण आम्हाला संध्याकळचे जेवण करून प्रवचनाची तयारी करायची होती. म्हणून आमची वारी माहेश्वरी धर्मशाळेकडे निघाली. आठ वाजता प्रमुख पाहुणे ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक आनंद तेलंग यांचे आगमन झाले. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन केले. प्रणिता देशपांडे यांनी अभ्यासपूर्ण असे मनोगत मांडले. ह.भ. प.श्री आनंद तेलंग महाराजांनी ज्ञानेश्वरी वाचन उपक्रमाचे भरभरून कौतुक केले व ज्ञानेश्वरी ग्रंथ कसा व किती श्रेष्ठ आहे, त्याचे वाचन,पारायण, चिंतन,मनन का करावे या विषयी अभ्यासपूर्ण असे सखोल मंत्रमुग्ध करणारे मार्गदर्शन केले. सर्व भाविक भक्त या प्रवचनाने तृप्त झाले. दुसरा दिवस उत्साह आणि मांगल्याची उधळण करत उगवला. ठरलेल्या वेळेप्रमाणे सर्वजण साडेपाच वाजताच माऊलींच्या दर्शनासाठी मंदिरात जमा झाले. तेव्हा प्रत्येकाचे चेहरे आनंदाने उजळून निघाले होते. प्रत्येकाच्या मनातली माऊलींच्या भेटीची ओढ, आतुरता त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होती. गाभाऱ्यात सर्वांनी माऊलींच्या समाधीचे शांतपणे दर्शन घेऊन जेव्हा बाहेर आलो तेव्हा प्रत्येकाच्या चेहऱ्यावर कृतार्थतेचा भाव ओसंडून वाहत होता.

गाभाऱ्याच्या समोर असलेल्या दालनात एका क्षणात आम्ही सर्वजण जमा झालो आणि शिस्तीत स्थानापन्न



झालो. नंतर उर्वरित एकावन्न ओव्यांचे सामुदायिक वाचन केले. त्यानंतर माऊलींच्या समोर दोन शब्द बोलण्याचे भाग्य मला लाभले. मी काय बोललो याचे मलाच भान नव्हते पण प्रवचना नंतर सर्वांचे डोळे पाणावले होते.

सात वाजता आम्ही सर्वजण मंदिराच्या आवारात जमा झालो. माऊली कडे तोंड करून रूप पाहता लोचनी, सुख झाले हो साजनी हा अभंग म्हटला. आणि दोन दोनच्या रांगा करून टाळांच्या गजरात ज्ञानोबा माऊली तुकारामचा जयघोष करत आमची प्रदक्षिणा दिंडी सुरू झाली. खरं सांगु...? कुणीच भानावर नव्हतं. जो तो माऊलीत लीन झाला होता, माऊलीमय झाला होता. पाऊली खेळत खेळत दिंडी हळूहळू पुढे जाऊ लागली नंतर फुगड्यांचा फेर धरून माऊलींच्या भजनात तल्लीन होऊन नाचू लागले. त्याचं, संसाराचं कशा...कशाचं भान राहिलं नव्हतं कुणालाच. सर्व भाविक भक्तांना एकत्रित घेऊन 'नाथ पारा जवळ आलो, सर्वांना त्याचा थोडक्यात इतिहास सांगितला. पुढे सिध्देश्वर मंदिरात आलो तेथील नंदी आणि माऊलींच्या संजीवन समाधीस्थळाचा इतिहास कथन केला पुढे अजान वृक्षाचा इतिहास आणि महत्व सांगितले. पुढे सोन्याच्या पिंपळाचे महत्त्व आणि रूक्मिणी मातेने अतिशय श्रध्देने मारलेल्या सव्वा लाख प्रदक्षिणा आणि त्याचे फलीत म्हणजे पती विठ्ठलपंत परत आले आणि त्यांच्या पोटी तेजःपुंज अशा ज्ञानी चार अपत्यांचा जन्म झाला हा इतिहास सांगितला. सर्वांनीच हा इतिहास एकाग्रतेने श्रवण केला. सर्वांनी माऊलीला साष्टांग दंडवत घातला आणि माहेश्वरी धर्मशाळेकडे निघालो. काही जणांना चतुर्थी असल्याने सर्वांनीच साबुदाणा उसळीचा नाष्टा केला आणि चहा घेऊन प्रवचनाच्या दालनात एकत्र आलो. भजनाला सुरूवात केली. येथे गोवर्धन तयार केला आणि त्यावर भगवान श्रीकृष्ण विराजमान झाले. माऊलींची प्रतिमा, माऊलींची सुंदर मूर्ती, वाचकांचे ज्ञानेश्वरी ग्रंथ मध्यभागी गोवर्धन महिलांनी केलेली फुलांची सजावट, उदबत्ती आणि धुपाचा दरवळणारा मंद सुगंध या सर्वांनी वातावरण अतिशय प्रसन्न झाले होते. ह.भ.प. श्री नरहरी सांगळे महाराजांचे आगमन झाले. आमच्यात एक नंदकुमार सनान्से हा दिव्यांग भक्तही होता. त्यांनी ब्रेल लिपितील ज्ञानेश्वरी सर्वांच्या अगोदर वाचून पूर्ण केली. त्यांचं प्रचंड पाठांतर पाहून सर्वजण चकित झालो. त्यानंतर सांगळे महाराजांच्या प्रवचनाला सुरूवात झाली. सर्व वाचकांचे त्यांनी भरभरून कौतुक केले. मंदिराचे विश्वस्त ह.भ.प.श्री योगी निरंजन नाथजी यांनी आमचे कौतुक केलं. सर्वांनी दुपारच्या भोजनाचा आस्वाद घेतला आणि आमची गाडी सिध्द बेटाकडे निघाली.

सिध्द बेट म्हणजे विठ्ठलपंत व रूक्मिणी आईने थाटलेल्या गाडग्या मडक्याच्या संसाराचं ठिकाण. याच ठिकाणी त्यांच्या अलौकिक अशा चार अपत्यांचा जन्म झाला ते पवित्र ठिकाण म्हणजे सिध्द बेट. सिध्द बेटावरती आल्यानंतर सर्वांनी मनोभावे दर्शन घेतलं. चांगदेवांनी इंद्रायणी पात्रात बांधलेल्या विठ्ठल पंतांच्या समाधीचे दर्शन घेतले. जड अंतःकरणाने माऊलींच्या कळसाला हात जोडले. आणि सर्वजण परतीच्या प्रवासासाठी गाडीत बसलो. येताना माहेराची, ज्ञाना मायची ओढ होती आणि आता... माहेरच्या विरहाची हुरहूरी होती.

॥ राम कृष्ण हरि ॥

# शिवार शेजारी

कथा
माधव शोभणे

नरखेड तालुक्यातील खरसोली हे गाव आजूबाजूच्या इतर गावांच्या मानाने बरंच मोठं. पिठाच्या गिरणीपासून तर माध्यमिक शाळेपर्यंत आणि किराणा दुकानापासून तर आठवडी बाजारापर्यंत जवळ जवळ सर्व आवश्यक सुविधा त्या काळी खरसोली गावात उपलब्ध होत्या आणि म्हणून भोवतालची सर्व खेडी खरसोली गावावर दैनंदिन सुविधांसाठी अवलंबून असायची. या ना त्या कारणाने सकाळपासून तर रात्री उशिरापर्यंत ही मंडळी खरसोलीत रेंगाळत असायची. खरसोली गावाच्या दक्षिणेला तीन किलोमीटर अंतरावर थुगाव (निपाणी) हे पाचपन्नास घराचं छोटंसं एक खेडं होते.

या खेड्यात रामकृष्ण इरपाची नावाचा तीन एकर कोरडवाहू शेती असलेला एक प्रामाणिक शेतकरी होता आणि त्याच्याच शेताला लागून खरसोलीच्या पांडू चिकाटेची ओलिताची सात एकर शेती होती. अडल्या-नडल्याला ते एकमेकांच्या कामी पडायचे. त्यामुळे रामकृष्णा आणि पांडू यांच्यात बऱ्याच दिवसांपासून मैत्रीचं आणि विश्वासाचं एक नातं कायम होते. सालाबादापेक्षा यावर्षी पांडूच्या शेतातील संत्राची बाग चांगलीच बहरली होती. २०-२५ बंड्या संत्रा निघेल अशी अपेक्षा त्याला होती. त्याकरिता तो रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून बागेची हिफाजत करत होता. इकडे मुलीचं लग्न तोंडावर आल्याने त्याचं जरा संत्र्याच्या बागेकडे दुर्लक्ष होतं की काय? असं त्याला वाटत होतं.


आजकाल संत्रा चोरून नेणाऱ्यांचं प्रमाण खूपच वाढलं होतं. त्यामुळे पांडूला रात्री शेतावर जागली जावं लागतं होतं. एकटं शेत सोडता येत नव्हतं. यामुळे लग्नाच्या सर्व कामांचा भार त्याची बायको रखमावर येत होता. तेव्हा कुणाला तरी सोबत घेणं त्याला गरजेचं होतं; पण नक्की कुणाला सोबत घ्यावं, हा मोठा पेच पांडूसमोर होता. तो बराच वेळ विचार करत एका संत्र्याच्या झाडाखाली बसला असताना त्याला एकदम आठवणं झाली ती शिवार-शेजारी रामकृष्णा इरपाचेची. त्यानं कुठलाही वेळ न गमावता थेट थुगावात जाऊन रामकृष्णाची भेट घेतली अन् आपल्या मनातली तगमग त्यानं रामकृष्णाला सांगून टाकली. अगा पांडू भाऊ, मी जाईन ना वावर राखाले. तुह्या संत्र्याची राखन करीन . कारजी करू नगं. आपली कई वर्सा पासूनची दोस्ती आहे! आच्ची थोडीच आहे? अस्या येळी एकमेकाले मदत करावीस लागते नगा. मी जागली करीन. तू जा पोरीचं लगन बिनधास्त होऊन कर...! रामकृष्णाचे हे बोल ऐकून पांडू निश्चिंत झाला व गावाकडे वळला. एवढ्यात चुलीजवळून लगबगीने उठून लक्ष्मी छपरीत आली व म्हणाली... पांडू भाऊजी, जेवून जा. स्वयंपाक तयार आहे...

लक्ष्मीबाईचे जिव्हाळ्याचे शब्द ऐकून पांडू सुखावला. त्याला नाही म्हणता आले नाही. रामकृष्णा भाऊचे शेतावर जागली जाणे सुरू झाले. गेल्या आठ दिवसांत त्याने एकही ठाकी घेतली नाही. रात्री मस्त संत्रा बागेच्या मध्यभागी शेकोटी पेटवून, रेडिओ लावून एफएमवरचे जुने गाणे ऐकत त्याने इमानेइतबारे पांडूच्या संत्रा बागाची राखण केली. या आठ दिवसांत तो रात्रीला जराही झोपला नाही. दिवसा झोपायचा आणि रात्री जागायचा हाच त्याचा नित्यक्रम झाला होता. मुलीचे लग्नकार्य आटोपल्यावर पांडू शेतावर जागलीला जाऊ लागला. शेतावरील संत्र्याची योग्य प्रकारे राखण झालेली पाहून तो मनोमन सुखावला. आठ-दहा दिवसांनी पांडू संत्र्यांनी भरलेली पिशवी घेऊन राम कृष्णाच्या घरी पोहोचला.

रामकृष्णा घरीच होता. रामकृष्णाभाऊ, हे थोडे संत्रं ठेवगा तुह्यासाठी... हातातील पिशवी खाली ठेवत पांडू म्हणाला. बापा..! कायले आणले गा? इकला कां गा बाग? केवढ्यात इकला गा? राम कृष्णा पांडूकडे पाहत म्हणाला. हो...! इकला अठरा हजारात; आता भाय पाखरं तरास दे होते. भिंतीले खेटून बसत पांडू म्हणाला. पण, हे संत्र कायले आणले गा? आणले तुह्या साठी, माह्य मन मनत व्हतं, तुटले बी काही देवाले पायजे. त मग मी आणलो. म्हंजे...! मले राखणदारीचा मोबदला देऊन रायला का गा? तू माह्या एका शब्दानं राखणदारीले तयार झाला. आता माह्या बी काही फर्ज बनते की नाय? रामकृष्णा पांडूच्या बोलण्यानं गोंधळला. पांडूची भावना उपकाराची परतफेड करण्याची होती. त्यात जिव्हाळा होता. कळकळ होती. तो नरमला आणि म्हणाला, मी जागली शेजार धर्माखातीर केली. मोबदल्याखातीर नाही. पण पांडू, तुहा जिव्हाळा, कळकळ पाहून हे ठेवतो. बरं ठीक आहे, हाच इचार माह्या मनात होता. बरा, बरा, तू तुह्या धर्म निभवलास अन् मी माह्या धर्म. आता जेवण करून जा गड्या. आणि दोघेही हसत हसत जेवायला बसले.



# प्रदूषित भूजल बनतेय गंभीर जागतिक समस्या





**प्रदुषित भूजल ही जगभरातील मोठी समस्या बनली आहे. किरणोत्सर्गी पदार्थ आणि जड धातूंच्या वाढत्या प्रमाणामुळे भूजलाची गुणवत्ता खालावली असून मानवी जीवन धोक्यात आले आहे. अभ्यासानुसार, जगातील सुमारे १९४ दशलक्ष लोक प्रती लिटर २५० मिलीग्रॅम पेक्षा जास्त सल्फेट असलेल्या पाण्याच्या संपर्कात आहेत. जागतिक आरोग्य संघटनेनेही हे मान्य केले आहे. या पृष्ठभूमीवर घेतलेला वेध...**

पर्यावरण

**मिलिंद बेंडाळे**

'हाँगकाँग युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी'च्या अभ्यासानुसार भारत, अल्जेरिया, पाकिस्तान, सौदी अरेबिया, इटली, स्पेन, मेक्सिको, अमेरिका, ट्युनिशिया, इराण आदींसह जगातील १५६ देशांच्या भूजलात सल्फेटचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. परिणामी सुमारे सात कोटी लोकांना पोटासंबंधीचे आजार जडले आहेत. अभ्यासानुसार, जगातील सुमारे १९४ दशलक्ष लोक प्रती लिटर २५० मिलीग्रॅमपेक्षा जास्त सल्फेट असलेल्या पाण्याच्या संपर्कात आहेत.

जागतिक आरोग्य संघटनेने हे मान्य केले आहे. अहवालानुसार जगातील १.७० कोटी लोक प्रती लिटर ५०० मिलीग्रॅमपेक्षा जास्त सल्फेट असलेले पाणी पीत आहेत. यातील ८२ टक्के लोक भारत, अमेरिका, मेक्सिको, स्पेनसह १० देशांमध्ये राहतात. सरासरी वापर स्पेनमध्ये २७७.८६ मिलीग्रॅम, अफगाणिस्तानमध्ये १८३.३२, मेक्सिकोमध्ये १७५.०५, पाकिस्तानमध्ये १३५.०१, अमेरिकेत ९७.८५ मिलीग्रॅम तर भारतात ८१.७१ मिलीग्रॅम सल्फेटयुक्त पाण्याचा वापर करत असल्याचे या अभ्यासातून समोर आले आहे. संशोधकांच्या मते सल्फेटयुक्त पाणी आरोग्यासोबतच पर्यावरणासाठीही घातक ठरते. सल्फेटमुळे पाईप गंजतात.

एवढेच नाही, तर ते फॉस्फरससारखे पोषक घटक काढून पर्यावरणाला हानी पोहोचवते. याव्यतिरिक्त हवामान बदल आणि शहरीकरणामुळे सल्फेटचे प्रमाण वाढले असून त्याचा जागतिक स्तरावर पाण्याच्या गुणवत्तेवर गंभीर परिणाम होत आहे. भारतातील बहुतांश लोकसंख्या पिण्याच्या पाण्यासाठी भूजलावर अवलंबून आहे. २०५० पर्यंत पाण्याची मागणी २५ टक्क्यांहून अधिक वाढेल. भूजल शोषणाच्या बाबतीत आपला देश अव्वल आहे, हे सर्वश्रुत आहे. देशाच्या उत्तर गंगेच्या प्रदेशातील भूजल कमी होण्याच्या मार्गावर आहे. देशाची राजधानी दिल्लीसह देशातील अनेक शहरे 'डार्क झोन'मध्ये आहेत. 'एनसीआर'मधील तीव्र पाणीसंकट हा याचा जिवंत पुरावा आहे. भूजलाच्या बाबतीत पंजाबमधील परिस्थिती सर्वात गंभीर आहे. कारण तेथील ९४ टक्के लोक पिण्याच्या पाण्यासाठी भूजलावर अवलंबून आहेत. त्यामुळे भूजलात जड धातू आणि किरणोत्सर्गी पदार्थांची उपस्थिती झपाट्याने वाढली. पंजाबप्रमाणे हरयाणाही मागे नाही. हरयाणामध्ये भूजल उपसा १३७ टक्क्यांहून अधिक आहे, तर देशातील भूजल उपसा ६३ टक्के आहे. देशातील सर्वात मोठे राज्य असलेल्या उत्तरप्रदेशमधील १० महानगरे अतिशोषितांच्या श्रेणीत आहेत. आर्सेनिक, नायट्रेट, सोडियम, युरेनियम, फ्लोराईड इत्यादींच्या अतिरेकामुळे भूगर्भातील पाणी मानवी आरोग्यासाठी तसेच सिंचनासाठी हानिकारक ठरत आहे. आंध्र प्रदेश, राजस्थान, पंजाब, हरयाणा, गुजरात आणि उत्तरप्रदेशमधील १२.५ टक्के भूजल नमुने उच्च सोडियमच्या उपस्थितीमुळे सिंचनासाठी योग्य नसल्याचे आढळले आहे.

देशातील ४४० जिल्ह्यांमधील भूजलातील नायट्रेटच्या वाढत्या पातळीमुळे आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत. एका अहवालानुसार ९.०४ टक्के पाण्याच्या नमुन्यांमध्ये फ्लोराईडची पातळी सुरक्षित मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आणि पाण्याच्या ३.५५ टक्के नमुन्यांमध्ये आर्सेनिक आढळून आले. राजस्थान, कर्नाटक, तामिळनाडूमध्ये ४० टक्क्यांहून अधिक नमुने सुरक्षित मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. पाण्यातील नायट्रेटची पातळी महाराष्ट्रात ३५.७४, तेलंगणात २७.४८, आंध्रप्रदेशमध्ये २३.५ आणि मध्यप्रदेशमध्ये २२.५८ टक्क्यांपेक्षा जास्त नोंदवली गेली आहे तर हरयाणा, तामिळनाडू, आंध्रप्रदेशमध्ये ही पातळी सातत्याने वाढत आहे. हे प्रदूषण पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्य या दोन्हीसाठी हानिकारक आहे. त्यामुळे कॅन्सर, किडनी, हाडे, त्वचा रोगांचा धोका झपाट्याने वाढत आहे. नवजात बाळासाठी ते जीवघेणे ठरले आहे. उद्योगांमधून बाहेर पडणाऱ्या दूषित पाण्यावर प्रक्रिया करण्याची व्यवस्था नसणे, शेतीतून जास्तीत जास्त उत्पादन मिळवण्याच्या हव्यासापोटी खतांचा अंदाधुंद वापर, वाढते शहरीकरण, सांडपाण्याची गळती, घरगुती कचरा आणि कचऱ्याचे डोंगर यामुळे देशातील भूजलाच्या दर्जात झपाट्याने घट होत आहे. जगातील सुमारे एक चतुर्थांश भूजल भारताकडून वापरले जाते. देशाच्या कृषी उत्पादकतेत लक्षणीय वाढ व्हावी यासाठी खते आणि कीटकनाशकांचा व्यापक वापर करण्यात आला.

१९५० च्या दशकापासून भारताने मोठ्या प्रमाणात भूजल उपसण्यासाठी प्रोत्साहन देत अनुदान दिले. त्यामुळे खोदलेल्या कूपनलिकांची संख्या १० लाखांवरून ३ कोटींपर्यंत वाढली. अलिकडच्या वर्षांमध्ये सघन भूजल वापरामुळे जलद औद्योगिकीकरण साध्य झाले आहे. हरित क्रांतीने अन्न सुरक्षेत कमालीची सुधारणा केली. २००६ आणि २०१६ च्या दरम्यान अलिकडील आर्थिक विस्तारामुळे २७१ दशलक्ष लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यास मदत झाली; पण त्यामुळे भूजल पातळीही घसरली. जागतिक बँकेच्या म्हणण्यानुसार, भूजलाची भरपाई होण्यापेक्षा जलद गतीने शोषण केले जात आहे. त्यामुळे भारतातील ६० टक्के जिल्हे दोन दशकांमध्ये भूजल कमी होण्याच्या गंभीर पातळीपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. भारतीय जिल्ह्यांचा आणखी एक अभ्यास दर्शवतो की, त्यापैकी ६० टक्के भूजल आधीच संपलेले, दूषित किंवा दोन्हीही आहे. यामुळे देशातील शेतकऱ्यांपुढे एक गंभीर संकट उभे राहिले आहे. ते भूजलावर अवलंबून आहेत. भारतात वापरल्या जाणाऱ्या भूजलापैकी सुमारे ९० टक्के पाणी पिकांना सिंचनासाठी वापरले जाते. शेतकरी मौल्यवान पाण्याच्या शोधात आणखी खोलवर जात आहेत. तथापि, बहुतेक लहान शेतकऱ्यांसाठी हा एक व्यवहार्य पर्याय नाही. अलिकडच्या वर्षांमध्ये अनेक शेतकऱ्यांनी शहरांकडे स्थलांतर केले आहे.

भूजलतज्ज्ञ डॉ. वीणा श्रीनिवासन यांच्या मते, भारतातील पाण्याचे वाढते संकट हे शहरी भागात मोठ्या प्रमाणावर स्थलांतराचे प्रमुख कारण आहे; परंतु त्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. शहरात नवीन जीवन सुरू करण्यासाठी शेती सोडणाऱ्यांपैकी अनेकांनी आता आपली नोकरी गमावली आहे आणि त्यांना पुन्हा खेड्याकडे ढकलले जात आहे; परंतु प्रश्न असा आहे की, ते आता स्वतःचे पोट कसे भरतील? खेड्यांमध्ये राहणारे सुमारे ७०० दशलक्ष भारतीय दैनंदिन गरजांसाठी भूजलावर अवलंबून असून ८५ टक्के ग्रामीण कुटुंबे भूजलावर अवलंबून आहेत. शहरांमध्ये हे प्रमाण ४५ टक्के आहे. भारताने भूजलाची स्थिती अधिक गांभीर्याने घेण्यास सुरुवात केली पाहिजे. ही केवळ पाण्याची समस्या नाही, तर उपजीविकेची समस्या असून आणखी बिकट होणार आहे. डॉ. वीणा श्रीनिवासन आणि त्यांचे सहकारी तेजस्वी होरा आणि नंदिता बी. बसू यांनी या प्रदेशात संशोधन केले. त्यात दक्षिण भारतातील भूजल गायब होण्यामुळे शेतकरी आत्महत्या करत होते, असे निदर्शनास आले आहे.

भारताने भूजलाची स्थिती अधिक गांभीर्याने घेतली पाहिजे. ही केवळ पाण्याची समस्या नाही, तर उपजीविकेची समस्या आहे आणि ती आणखी बिकट होणार आहे. जागतिक बँक आणि 'नीती' आयोगाने या प्रश्नांकडे लक्ष वेधले आहे. २०५० पर्यंत भारतीयांची संख्या १७० कोटी होऊ शकते. पाणी, अन्न आणि उपभोग्य वस्तूंच्या वाढत्या मागणीबरोबरच प्रदूषण आणि वाया जाणाऱ्या पाण्यामध्येही वाढ होणार आहे. २०५० पर्यंत ४० कोटी लोक शहरांमध्ये स्थलांतरित होतील, असाही संयुक्त राष्ट्रांचा अंदाज आहे. हवामानातील बदलांमुळे भारताला अतिवृष्टी आणि अप्रत्याशित मान्सूनचा धोका निर्माण होईल. भारतातील सध्याच्या भूजलाचा ऱ्हास हा मुख्यतः हवामान बदलामुळे होत नाही; मानवनिर्मित हस्तक्षेप त्याहून अधिक महत्त्वाचा आहे; परंतु हवामान बदलामुळे परिस्थिती आणखी बिघडते आणि त्यामुळे अधिक अप्रत्याशित परिस्थिती निर्माण होते, यावर जोर देणे महत्त्वाचे आहे. जगाच्या ताज्या पाण्यात अंदाजे ३० टक्के वाटा भूजलाचा आहे.

जागतिक लोकसंख्यावाढ, शेतीसाठी वापर, तेल आणि वायू उत्खनन आणि खाणकाम, पोशाख आणि कापड उत्पादन आणि पशुधन यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये पाण्याचा वापर वाढत आहे. भूजलाचे अतिशोषण आणि प्रदूषणाच्या धोक्यांपासून संरक्षण करणे आज आवश्यक आहे.

भविष्यासाठी पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन करण्यासाठी, विशिष्ट ठिकाणी भूजल कुठून येत आहे, त्याची गुणवत्ता काय आहे आणि ते किती लवकर भरले जाते हे समजून घेणे आवश्यक आहे. पाण्याच्या रेणूमधील अणूंची भिन्नता असलेल्या 'आयसोटोप' नावाच्या पाण्याच्या 'फिंगर प्रिंट्स'चे विश्लेषण करून शास्त्रज्ञ असे संशोधन करू शकतात. (लेखक पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)



# तंबाखू आणि युनान

विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**

कोफिलिप मॉरिस ही अमेरिकेतल्या व्हर्जिनिया राज्यात रिचमंड या शहरात असलेली कंपनी आहे. ती जगातली सर्वात मोठी सिगारेट उत्पादक कंपनी आहे. तिचे अनेक ब्रँडस् आहेत. त्या सर्वांवर फिलिप मॉरिस, रिचमंड, व्हर्जिनिया हे शब्द असतातच. संपूर्ण जगभरात, दिवसाच्या चोवीस तासात, प्रत्येक मिनिटाला कुणी ना कुणी व्यक्ती सिगारेट फुंकतच असते आणि ती सिगरेट फिलिप मॉरिसचीच असते.

सन १४९२ साली ख्रिस्तोफर कोलंबस युरोपातून अटलांटिक महासागर ओलांडून अमेरिकेत गेला. तिथल्या टोबॅगो नावाच्या बेटावर त्याने पाहिले की, स्थानिक रहिवासी एका झाडाची पाने गुंडाळी करून तोंडात धरून पेटवतायत. त्याचा धूर तोंडात खेचतायत आणि मग तोच धूर बाहेर सोडतायत. इतर काही लोक तीच पाने चघळतायत. कोलंबसाने आणि त्याच्या सहकारी खलाशांनी अर्थातच हा काय प्रकार आहे म्हणून चौकशी केली. तेव्हा त्यांनाही ती पाने देण्यात आली. ती चघळून आणि पेटवून धूर ओढून पाहिल्यावर त्यांना एकदम तरतरी, किंचित गुंगी आल्यासारखे वाटले.

तेवढ्यात आणखी एक जण एक चूर्ण घेऊन आला. ही त्याच झाडाची पाने वाळवून त्याची केलेली पूड आहे, ही चिमटीने नाकात कोंबायची, असे त्याने सांगितले. तसे केल्यावर कोलंबस आणि त्याचे सहकारी भयंकर शिंकत सुटले. पण मग त्यांना भलतीच तरतरी आली. अशाप्रकारे कोलंबसाला अमेरिकेबरोबरच तंबाखू या झाडाचा आणि त्याच्या बिडी, जर्दा, तपकीर इत्यादी पदार्थांचा शोध लागला. कोलंबसाने ते युरोपात नेले. तिथून पोर्तुगीज खलाशांनी ते आशियात म्हणजे मुख्यतः भारतात आणि चीनमध्ये नेले.

आशियाई देशांमध्ये त्याचे गुडगुडी, हुक्का, चिलिम, बिडी इत्यादी प्रकार बनले तर युरोपात आणि युरोपीय लोकांनी बसवलेल्या उत्तर अमेरिकेत त्याचे सिगार, पाईप असे प्रकार बनले. उत्तर अमेरिका म्हणजे कॅनडा, युनायटेड स्टेटस् आणि क्यूबा. क्यूबाचा हॅवाना सिगार आजही जगभरात प्रसिद्ध आहे. तंबाखू सेवन हे कोणत्याही स्वरूपात वाईटच, पण ते जास्तच घातक करण्याचे उद्योग अमेरिकेने केले. भलेदांडगे सिगार उर्फ चिरूट आणि पाईप हे खिशात बाळगायला अडचणीचे. म्हणून अमेरिकनांनी एक विशिष्ट प्रकारचा कागद, त्याला कडेला गोंद आणि सोबत तंबाखूची पूड अशी पॅकिंग्ज काढली. खिशात बाळगायला एकदम सोपी, तल्लफ आली की ती पूड त्या कागदाच्या चिटोऱ्यावर ओतायची, गुंडाळी करायची नि जीभेने कडा ओली करून चिकटवायची. सिगारच्या या छोट्या आवृत्तीला त्यांनी नाव दिलं सिगारेट. मोठा तो पट्टा, छोटी ती पट्टी; मोठा तो गाडा, छोटी ती गाडी, याच चालीवर मोठा तो सिगार आणि छोटी ती सिगारेट. पहिल्या महायुद्धात अमेरिकन सैनिक युरोपच्या रणभूमीवर लढायला गेले ते खिशात सिगारेटी घेऊनच. पहिल्या महायुद्धाने जगाला मशीनगन हे अतिवेगवान आणि अतिसंहारक शस्त्र दिले, असे म्हटले जाते. ते खरेच आहे. पण त्याच युद्धामुळे सिगारेट या माणसाला हळूहळू ठार करणाऱ्या अतिघातक, विषारी शस्त्राचाही जगभर प्रसार झाला, हे मात्र विसरले जाते. विडी, सिगार यापेक्षा सिगारेट विषारी. कारण तिच्यासाठी वापरला जाणारा विशिष्ट कागद. या कागदाचा धूर तंबाखूपेक्षाही जास्त विषारी असतो.

आज सिगारेट उत्पादनात अमेरिकेच्या फिलिप मॉरिस खालोखाल दुसऱ्या क्रमांकावर चीनच्या युनान प्रांतातली होंगटा ही कंपनी आहे. होंगटा या चिनी शब्दाचा अर्थ लाल रंगाचा पॅगोडा. अमेरिकेच्या व्हर्जिनिया प्रांतातले रिचमंड शहर जसे फिलिप मॉरिसमुळे जगभर प्रसिद्ध आहे तसेच चीनच्या युनान प्रांतातले युक्सी हे शहर होंगटा सिगारेटमुळे प्रसिद्ध आहे. पोर्तुगीज खलाशी आणि व्यापारी यांच्याबरोबर इ. स. १६०० च्या सुमारास तंबाखू चीनमध्ये पोचली. मोठी आश्चर्याची आणि कौतुकाची गोष्ट अशी की, सन १६४३ मध्ये मिंग सम्राट चाँगझेन याच्या दरबारातला एक विद्वान पंडित फँग यिझी याने सम्राटाला सांगितले की, धूम्रपान हे घातक असून त्यामुळे फुफ्फुसे खलास होतात. चाँगझेन हा मोठा प्रजाहितदक्ष राजा असला पाहिजे. कारण फँग यिझीने असे मत दिल्यावर त्याने चीनमध्ये तंबाखू सेवनावर कडक बंदी घातली. माणसाने आपल्या परीने चांगले निर्णय घेतले तरी काळ विपरीत असेल तर काय घडते पहा.

धूम्रपान करणाऱ्या माणसाचे मुंडके उडवण्यात येईल, इतकी कडक बंदी घालणारा सम्राट चाँगझेन यानंतर अल्पकाळातच मरण पावला. त्याच्याबरोबरच तंबाखू बंदीही वाहून गेली आणि आज युनान प्रांतासह संपूर्ण चीन तंबाखू आणि सिगारेट उत्पादनात अमेरिकेखालोखाल आहे. दरवर्षी चीनमधले सिगारेट उत्पादन वाढतेच आहे. २०२४ या वर्षात चीनने २० अब्ज ४० कोटी एवढ्या सिगारेटी निर्माण केल्या. हा आकडा २०२३ पेक्षा ३ टक्के जास्त आहे. म्हणजे २०२४ च्या एकंदर जागतिक उत्पादनातला दोन पंचमांश एवढा वाटा एकट्या चीनचा आहे. अमेरिकेत सिगारेट उत्पादक कंपन्यांची जबरदस्त लॉबी आहे. एकेकाळी हॉलिवूडच्या मोठमोठ्या नटांना हाताशी धरून त्यांनी आपले ब्रँडस् लोकप्रिय केले. आपल्याला आठवत असेल, तर भारतातही हाच प्रयोग झाला. अशोककुमार, देवआनंद आणि प्राण या नटांची लोकप्रियता अफाट होती. त्यात ते सिगरेट कशी शिलगावतात, त्या स्टाईलची नक्कल करण्याचा फार मोठा वाटा होता. प्राणसारखी, चेहऱ्यावर दुष्ट भाव खेळवत, तोंडातून विविध प्रकारे धूम्रवलये काढायची, अशी महत्त्वाकांक्षा अनेक जण शाळकरी वयापासून बाळगून असत. १९७५ नंतर अमेरिकेतल्या या सिगारेट लॉबीवरचा दबाव वाढत गेला. कारण धूम्रपानामुळे फार माणसे मेली.



धूम्रपान हे आरोग्यास घातक आहे, असा इशारा प्रथमच सिगारेट पाकिटांवर आला. तो अधिक मोठ्या नि ठळक अक्षरात आला. मग रेल्वे, बस, कार्यालय इत्यादी ठिकाणी धूम्रपानाला बंदी आली नि ती अधिकाधिक कडक होत गेली. यावर उपाय म्हणून सिगारेट कंपन्यांनीही फिल्टर, डबल फिल्टर, कमी निकोटिनयुक्त अशा सिगारेटी काढल्या. एकंदरीत सिगारेट फुंकण्याचे प्रमाण खरोखरच कमी झालेय की नाही देव जाणे, पण कुठेही भकाभका धूर सोडून इतरांना वायू प्रदूषण करण्याचे प्रमाण कमी झाल्यासारखे निदान भासताय तरी. मुख्य म्हणजे सिगारेट फुंकणे हे काहीतरी मोठ्या मर्दपणाचे काम आहे, ही भावना निश्चितपणे कमी झाली आहे. सातत्याने धूम्रपानाविरुद्ध प्रचार करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचा हा विजयच म्हटला पाहिजे. पूर्वी राजकीय नेते, लेखक-साहित्यिक यांची चित्रे हमखास सिगारेट फुंकत असलेली प्रसिद्ध व्हायची. आता ती तशी होत नाहीत. चित्रपटांमध्येही धूम्रपानाच्या दृश्यांवर भर नसतो. पण चीनमध्ये यातले काहीही अस्तित्वात नाही. होंगटा सिगारेट कंपनी असलेल्या युक्सी शहरात तर एक सिगारेट म्युझियमच आहे. तिथे विशेष म्हणजे माओपासून सर्व मोठ्या चिनी नेत्यांची सिगारेट फुंकत असलेली भव्य छायाचित्रे आहेत. चीनमध्ये आजही साम्यवादी सरकार आहे. ते माओ त्से तुंग किंवा नव्या उच्चारानुसार माओ झेडाँग याने १९४९ साली साम्यवादी क्रांती करून सत्तेवर आणले. १९७६ साली माओ मेला. नंतर सत्तेवर आलेल्या डेंग झियाओ पिंगने चिनी अर्थव्यवस्थेला मोठी गती दिली. आज चीन महासत्ता बनला आहे ते डेंगच्या कर्तबगारीमुळे. त्यामुळे वर्तमान चीन सरकारच्या दृष्टीने माओ आणि डेंग हे महानायक आहेत. चीनमध्ये सिगारेट उत्पादन सुरू केले ते ब्रिटिश-अमेरिकन टोबॅको या पाश्चिमात्य कंपनीने. माओने या कंपनीचे राष्ट्रीयीकरण केले. त्यामुळे आज ती कंपनी काय किंवा होंगटा ही सर्वाधिक उत्पादनवाली कंपनी काय, अखेर सरकारी मालकीच्याच आहेत. शिवाय माओ आणि डेंग हे दोघेही अखंड सिगारेटी फुंकत असायचे. त्यामुळे चीनमधल्या सिगारेट कंपन्या जाहिरातींमध्ये माओ आणि डेंग सिगारेट फुंकताना आवर्जून दाखवतात आणि वर सांगतात की पहा, अखंड सिगारेटी फुंकत राहूनही माओ ८२ वर्षे जगला आणि डेंग तर ९२ वर्षे जगला. याचा परिणाम म्हणजे सिगारेट किंवा एकंदरीत तंबाखू आरोग्याला घातक वगैरे आहे, असे चिन्यांना वाटत नाही. एकंदर चिनी लोकसंख्येतले ५० टक्क्याहून अधिक लोक सिगारेट, जर्दा, तपकीर यापैकी कोणत्या ना कोणत्या मार्गाने तंबाखू सेवन करतात. काही म्हणजे बरेच उत्तम पुरुष असेही आहेत की, जे या तीनही मार्गांनी तंबाखूला न्याय देतात. युरोप-अमेरिकेत स्त्रिया सिगारेट ओढतात, पण सिगार किंवा पाईप ओढत नाहीत. जर्दा चघळणे किंवा तपकीर ओढणे हे तर तिथे स्त्रियाच काय, पण पुरुषही करत नाहीत. कारण स्वच्छतेच्या कल्पना! कल्पना करून पहा, पश्चिमेतली एखादी सुबक बाई नि सुटाबुटातला बुवा एकमेकांना जर्दाची चिमूट देतायत किंवा प्रेमळपणे तपकिरीची चिमूट नाकात कोंबतायत. ठ्यां, ठ्यां करून शिंकून प्रेम वृद्धिंगत करतायात. छेः, असे दृश्य डोळ्यांसमोर येतच नाही. भारतात विशेषतः मुंबई-दिल्लीसारख्या शहरात अशी फॅशन आहे की, कार्यालयातून दुपारच्या जेवणानंतर एक चक्कर मारायला बाहेर पडायचे आणि सिगरेट फुंकायची किंवा कडक जर्दावाले पान खायचे किंवा तळहातावर घासून घासून चढवलेली माव्याची गोळी गालात धरायची. हल्ली मुंबईच्या फोर्ट, नरिमन पॉईंटसारख्या कॉर्पोरेट भागातल्या, नोकरी करणाऱ्या, फाजिल पुढारलेल्या बायकाही दुपारी बाहेर पडून सिगारेटी फुंकतात, पण एकंदर समाज त्यांच्याकडे फाजिल आणि वाह्यात म्हणूनच पाहतो. चीनमध्ये असे नाही. बायका सर्रासपणे सिगारेट, जर्दा आणि तपकीर ओढतात.

ग्रामीण भागात तर हे प्रमाण जास्तच आहे. पूर्वेकडच्या देशांमध्ये वर्षभर वेगवेगळे सण-उत्सव चालूच असतात. या सणांच्या निमित्ताने लोक एकमेकांना फराळाच्या वस्तू देतात तसेच चीनमध्ये फराळ-खाऊ यांच्यासोबत उत्तमपैकी सिगारेटी भेट म्हणून देण्याची प्रथा आहे. उंची सिगारेटच्या एका पाकिटाला सुमारे २५ डॉलर्स पडतात. २०२४ साली सिगारेटवरच्या महसुलापोटी चीन सरकारला ११९० कोटी डॉलर्स एवढे प्रचंड उत्पन्न मिळाले. याचा अर्थ दुष्परिणाम नाहीत असे नव्हे. सिगारेट किंवा एकंदर तंबाखू सेवनामुळे चीनमध्ये दरवर्षी सरासरी १० लाख लोक मरण पावतात.

आता जागतिक आरोग्य संघटनेच्या तंबाखू विरोधी करारावर सही केल्यामुळे चीनला सिगारेट पाकिटावर धोक्याचा इशारा छापणे बंधनकारक झाले आहे. पण काही सिगारेट उत्पादक इतके धोकेबाज आहेत की, ते हा इशारा बारीक अक्षरात छापतात आणि ऑर्गेनिक अशी अक्षरे मोठ्या छापात टाकतात. आता तंबाखू जर ऑर्गेनिक असेल तर उद्या जहाल विषालासुद्धा ऑर्गेनिक म्हणायला हरकत नाही. पण अशा रीतीने कायद्यातून पळवाट काढली जाते आणि त्यात सरकारही सामील असते. कारण तंबाखूतून मिळणारा महसूल, लोक मेले तरी बेहत्तर पण पैसा मिळाला पाहिजे. यालाच म्हणतात आसुरी संपत्ती! (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)